


■ अब की बार शंभरीपार; जिल्ह्यात १०८ टँकर.. /- शेवटचे पान

उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक
# गांवकरी



■ वृक्षगणना केलेल्या संस्थेला न्यायालयाचा दणका../- शेवटचे पान

■ gavakari.in ■ gavkarinews.com ■ वर्ष ८६ ■ अंक : २१७ ■ नाशिक, मंगळवार, दि. ६ मे २०२५ ■ किंमत रु. ५.०० ■ पाने = १२ ■ नाशिक ■ शहर-जिल्हा

# बारावीत मुलीच चमकल्या ; राज्याचा निकाल 91.88 टक्के

## कोकण विभाग नंबर वन, नाशिक विभागाचा टक्का घसरला

**नाशिक/पुणे : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य परीक्षा मंडळातर्फे घेण्यात आलेल्या बारावीच्या परीक्षेचा राज्याचा निकाल ९१.८८ टक्के लागला. यंदाही विद्यार्थ्यांपेक्षा विद्यार्थिनींनीच बाजी मारली आहे. सन २०२७-२८ पासून नवीन शैक्षणिक धोरणानुसार अभ्यासक्रम लागू करण्यात येणार आहे. त्यानुसार दहावी-बारावीच्या परीक्षेची कार्यपद्धती ठरविण्यात येईल, अशी माहिती राज्य परीक्षा मंडळाचे अध्यक्ष शरद गोसावी यांनी पुण्यात घेतलेल्या पत्रकार परिषदेत सांगितले.

गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा १.४९ टक्के निकाल कमी लागला आहे. राज्यात कोकण विभागाचा सर्वात जास्त, तर लातूर विभागाचा सर्वात कमी निकाल लागला आहे. पुनर्परीक्षेचा निकाल ३७.६५ टक्के लागला. दिव्यांगांना सवलतीचे गुण देण्यात आले आहेत. यंदाही परीक्षेत मुलींनी बाजी मारली असून, राज्यात ९४.५८ टक्के विद्यार्थिनी, तर ८९.५१ टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले. विद्यार्थ्यांपेक्षा ५.०७ टक्के अधिक विद्यार्थिनी उत्तीर्ण झाल्या आहेत.

बारावीच्या परीक्षेत यश मिळविलेले विद्यार्थी आणि त्यांचे पालक, विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारे शिक्षक यांचे शालेय शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांनी अभिनंदन केले आहे. देशाचे भविष्य असलेल्या या विद्यार्थ्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. या /-...४

नऊ विभागीय मंडळांची एकत्रित आकडेवारी

- नोंदणीकृत विद्यार्थी- १४ लाख २७ हजार ८५
- परीक्षा दिलेले विद्यार्थी- १४ लाख १७ हजार ९६९
- उत्तीर्ण विद्यार्थी- १३ लाख २ हजार ८७३
- उत्तीर्णतेचा टक्का- ९१.८८






**विदर्भकन्या राज्यात पहिली, मितालीला ९९ टक्के गुण**

राज्यात १२ वी परीक्षेच्या निकालात मुलींनी बाजी मारली असून, प्रथम येण्याचा मानदेखील विदर्भकन्येला मिळाला आहे. मिताली (५९४/६००) गुण मिळवत राज्यात प्रथम आली. तीन विषयांत तिला १०० पैकी १०० गुण मिळाले आहेत. मितालीने फिजिक्स, केमिस्ट्री आणि गणित या विषयांत १०० पैकी १०० गुण मिळवत १००% गुण प्राप्त केले आहेत.

**नऊ विभागांतील कॉपी प्रकरणे**

| | |
|---|---|
| पुणे | ४५ |
| नागपूर | ३३ |
| छ. संभाजीनगर | २१४ |
| मुंबई | ०९ |
| कोल्हापूर | ०७ |
| अमरावती | १७ |
| नाशिक | १२ |
| लातूर | ३७ |



"बारावीची परीक्षा हा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक जीवनातील महत्त्वाचा टप्पा आहे. या परीक्षेतील यशानंतर आपल्या आवडीनुसार विविध क्षेत्रांत वाटचाल करण्याचा मार्ग खुला झाला आहे. स्वतःसह देशाची प्रगती साधण्याची संधी मिळणार आहे. परीक्षा हे अंतिम ध्येय नाही. त्यामुळे ज्या विद्यार्थ्यांना यश मिळाले नाही त्यांनी उमेदीने अभ्यासाला लागावे आणि यश संपादन करावे.

**- दादाजी भुसे,** शालेय शिक्षणमंत्री

### १२४ केंद्रांची चौकशी

परीक्षेदरम्यान राज्यातील ३,३७३ पैकी ३७४ केंद्रांवर अनुचित प्रकार आढळले. त्यातील १२४ केंद्रांवर चौकशी सुरू करण्यात आली आहे. या चौकशीत दोषी आढळल्यास या केंद्राची मान्यता कायमस्वरूपी बंद करण्यात येणार आहे. परीक्षा काळात २७१ भरारी पथके नियुक्त करण्यात आली होती. काही ठिकाणी चित्रीकरण करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे कॉपीमुक्त अभियान राबविण्यात आले होते.

- नाशिक विभागाचा निकाल- ९१.३१ टक्के
- नोंदणी झालेले- १ लाख ५८ हजार ५९३
- परीक्षा दिलेले विद्यार्थी- १ लाख ५७ हजार ८४२
- उत्तीर्ण- १ लाख ४४ हजार १३६
- उत्तीर्णतेचा टक्का- ९१.३१

## भारत-पाकिस्तान युद्धाचे ढग!

# देशात उद्या मॉकड्रिल

**नवी दिल्ली :**

पहलगाम दहशतवाही हल्ल्यानंतर भारत-पाकिस्तानमध्ये तणाव वाढला आहे. भारत कोणत्याही क्षणी पाकिस्तानी दहशतवादाला त्याच्या भाषेत उत्तर देऊ शकतो, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यादृष्टीने भारताच्या तीनही सेना दलांनी तयारीही पूर्ण केली आहे. त्या पार्श्वभूमीवर केंद्रीय गृहमंत्रालयाने सर्व राज्यांना आणि केंद्रशासित प्रदेशांना ७ मे रोजी मॉकड्रील घेण्याचे आदेश दिले आहेत. आपत्कालीन परिस्थितीला तोंड देण्यासाठी प्रशासन किती सज्ज आहे याची चाचणी घेण्यासाठी हा मॉकड्रिल घेतला जाणार आहे.



राज्यांनी पोलिस, नागरी संरक्षण यंत्रणा, आरोग्य विभाग आणि अन्य आपत्कालीन सेवांशी संबंधित यंत्रणांना तत्पर ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. मॉकड्रीलमध्ये बॉम्बस्फोट, शस्त्रधारी हल्ले आणि नैसर्गिक आपत्ती यांसारख्या विविध परिस्थितींचा समावेश /-...४

### फिरोजपूरमध्ये आधीच सराव

पंजाबमधील फिरोजपूर छावणीत ४ मे रोजी ३० मिनिटांचा ब्लॅकआउट ड्रील पार पडला. रात्री ९ ते ९.३० या वेळेत लाइट बंद ठेवून युद्ध परिस्थितीतील सज्जतेचा आढावा घेण्यात आला.

### मॉकड्रिलदरम्यान उपाययोजना

सायरनद्वारे हवाई हल्ल्याचा इशारा जारी केला जाईल. शत्रूच्या हल्ल्याच्या बाबतीत स्वतःचे संरक्षण करण्यासाठी नागरी संरक्षण पैलूंवर सामान्य नागरिक आणि विद्यार्थी इत्यादींना प्रशिक्षण दिले जाईल. क्रॅश ब्लॅक आउट उपयांची तरतूद निर्वासन योजनेचे अद्ययावतीकरण आणि सराव केला जाईल.

# रशियाचा भारताला पाठिंबा

**मुंबई :**

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने आंतरराष्ट्रीय स्तरावर पाकिस्तानविरोधात पाठिंबा मिळवायला सुरुवात केली असून, त्यामध्ये आता रशियाचाही समावेश झाला आहे. दहशतवादाविरोधात लढण्यासाठी रशियाने भारताला पाठिंबा जाहीर केला असून त्यामुळे भारताच्या लढ्याला आता मोठे बळ मिळाले आहे. रशियाचे अध्यक्ष ब्लादिमीर पुतीन यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींना फोन करून पहलगाम हल्ल्याचा निषेध नोंदवला. नरेंद्र मोदींना पहलगामनंतर फोन करणारे रशियाचे पुतीन १८ वे जागतिक नेते आहेत.

भारतातील दहशतवादी हल्ल्यामध्ये जे कुणी सामील असतील त्यांना कठोर शिक्षा मिळावी असे मत पुतीन यांनी व्यक्त केले. दहशतवाद तसेच इतर अनेक गोष्टींवर भारत आणि रशिया एकत्र मिळून काम करतील असा विश्वासही पुतीन यांनी मोदींना दिला. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रशिचाच्या ८० व्या स्थापना दिवसाच्या पुतीन यांना शुभेच्छा दिल्या. या वर्षाच्या शेवटी भारतात शिखर संम्मेलन होणार असून त्यासाठी पंतप्रधान मोदी यांनी रशियाच्या पुतीन यांना आमंत्रण दिले आहे.




**अत्याधुनिक इग्ला-एस क्षेपणास्त्र मदतीला**

सातत्याने युद्धाची भाषा करत भारताविरुद्ध गरळ ओकणाऱ्या पाकिस्तानला भारताने आपल्या कृतीतून उत्तर दिलं आहे. भारताने थेट आपल्या संरक्षण क्षमतेत वाढ करत, पाकिस्तानचे दात घशात घातले. भारताला रशियाकडून अत्याधुनिक इग्ला-एस क्षेपणास्त्रे मिळाली आहेत. त्यामुळे शत्रूची लढाऊ विमाने, ड्रोन आणि हल्ला करणारे हेलिकॉप्टर अगदी जवळून पाडणे शक्य होणार आहे.

/-...४

# सातपूरला कामगाराचा निर्घृण खून

## दोन तासांत दोन संशयित जेरबंद

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

गेल्या आठवड्यातच अंबड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील कामटवाडे परिसरात एका तरुणाच्या खुनाची घटना ताजी असतानाच अवघ्या आठ दिवसांत पुन्हा खुनाची घटना घडली. नाशिक शहरात दिवसेंदिवस वाढत्या खुनाच्या घटनेमुळे नाशिककर पुरते भयभीत झाले आहेत. सातपूर परिसरातील प्रबुद्धनगर येथे राहणाऱ्या सीएट कंपनी कामगाराचा मध्यरात्री खून झाल्याची खळबळजनक घटना सोमवारी (दि. ५ मे) उघडकीस आली. ही घटना समजताच सातपूर पोलिसांनी तात्काळ तपास चक्रे फिरवत अवघ्या दोन तासांत दोघा संशयित आरोपींना अटक केली.

मृत व्यक्तीचे नाव संजय पुंडलिक जाधव (वय ४८, रा. प्रबुद्धनगर, नाशिक) असे असून, ते सीएट कंपनीत नोकरी करत होते. सोमवारी मध्यरात्री दीड ते अडीच वाजेच्या सुमारास, संजय जाधव हे प्रबुद्धनगर येथून जात असताना दोन अनोळखी इसमांनी त्यांचा रस्ता अडवला व तीक्ष्ण हत्याराने त्यांच्या पोटावर आणि छातीवर सपासप वार करत त्यांचा खून केला. घटनेनंतर आरोपी फरारी झाले. सकाळी सहोच्या सुमारास नागरिकांनी रस्त्यावर संजय जाधव यांचा मृतदेह पाहून पोलिसांना माहिती दिली. तत्काळ पोलीस उपायुक्त मोनिका राऊत, सहायक पोलीस आयुक्त शेखर देशमुख व सातपूर पोलीस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी करून अवघ्या दोन तासांत आरोपींचा माग काढत त्यांना ताब्यात घेतले. अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे अमित जाधव (रा. सातमाउली चौक, श्रमिकनगर) आणि अनिल गांगुर्डे (रा. महालक्ष्मी चौक, प्रबुद्धनगर) अशी आहेत. त्यांच्यावर पूर्वीही गुन्हे दाखल असल्याची प्राथमिक माहिती पोलिसांनी दिली.

ही यशस्वी कारवाई सातपूर गुन्हे शोध पथकातील सागर गुंजाळ, पोलीस हवालदार दीपक खरपडे, भूषण शेजवळ, अनिल आहेर, योगेश गायकवाड, रवी जाधव व सचिन गजबे यांच्या प्रयत्नांमुळे शक्य झाली. पोलिसांकडून या प्रकरणाचा अधिक तपास सुरू आहे.

### तुर्कस्तानची युद्धनौका कराची बंदरात

**नवी दिल्ली :**

तुर्कस्तानची युद्धनौका कराची बंदरात दाखल झाल्याचे समजते. ही युद्धनौका अत्याधुनिक सामरिक तंत्रज्ञानाने सुसज्ज आहे. तुर्कस्तानच्या या युद्धनौकेवर अँटी सबमरिन हेलिकॉप्टरसाठी डेक आणि अँटी शीप क्षेपणास्त्रे तैनात आहेत. तुर्कस्तानची ही युद्धनौका नेमकी आताच कराची बंदरात का दाखल झाली आहे, हा प्रश्न उपस्थित केला जात आहे. भारताकडून कोणत्याही क्षणी एअर स्ट्राईक किंवा वॉटर स्ट्राईक होण्याची भीती पाकिस्तानी लष्कराला वाटत आहे. त्यामुळेच कराची हे प्रमुख बंदर सुरक्षित करण्यासाठी पाकिस्तानने तुर्कस्तानची अत्याधुनिक तंत्रज्ञान असलेली युद्धनौका मदतीसाठी बोलावली असावी का, याविषयी तर्कवितर्क लढवले जात आहेत.

# बदलापूरप्रकरणी नव्याने एफआयआरची गरज नाही

## सुप्रीम कोर्टाकडून आदेशात बदल

**मुंबई :**

बदलापूर लैंगिक शोषण प्रकरणातील आरोपी अक्षय शिंदेच्या कथित बनावट एन्काउंटर प्रकरणी राज्य सरकारला सुप्रीम कोर्टाकडून मोठा दिलासा मिळाला आहे. याप्रकरणी नव्याने गुन्हा दाखल करण्याची गरज नाही. आहे त्याच एफआयआरवर एसआयटीने तपास करण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयानं जारी केले.

मुंबई क्राईम ब्रांचच्या अधिकाऱ्यांची सहआयुक्त लखमी गौतम यांच्या नेतृत्वात तयार करण्यात आलेल्या विशेष पथकाची सारी जबाबदारी आता राज्याच्या पोलीस महासंचालकांकडे सोपवण्याचे आदेशही सर्वोच्च न्यायालयानं जारी केले. मुंबई उच्च न्यायालयानं बदलापूर प्रकरणी अवमान कारवाईचा बडगा उगारत राज्य सरकारला चांगलेच धारेवर धरले



होते. तसेच शनिवारपर्यंत एन्काउंटरमध्ये सहभागी सर्व पोलिसांविरोधात स्वतंत्र गुन्हा दाखल करण्याचे आदेश जारी केले होते.

याप्रकरणी संबंधित पोलिसांवर नव्यानं गुन्हा दाखल करण्याबाबत मुंबई उच्च /-...४

# त्र्यंबकराजाचा लाडूचा प्रसाद वादाच्या भोवऱ्यात

## पुरातत्त्व खात्याकडून गुन्हा दाखल करण्याचे पोलिसांना पत्र

**त्र्यंबकेश्वर : प्रतिनिधी**

त्र्यंबकेश्वर मंदिरात गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर सुरू झालेला लाडूचा प्रसाद आता वादात सापडण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

त्र्यंबकेश्वर देवस्थान ट्रस्टतर्फे भाविकांना २० रुपयांत दोन बुंदीचे लाडू प्रसाद म्हणून देण्यात येत आहेत. मात्र, त्याबाबत भारतीय पुरातत्त्व विभागाच्या अधिकाऱ्यांनी आक्षेप घेतला आहे. बुंदीचे लाडू विक्रीसाठी मंदिर प्रांगणात दोन टपऱ्या ठेवल्या होत्या. त्र्यंबकेश्वर मंदिर वास्तू भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण खात्याच्या संरक्षित स्मारकांच्या यादीत असल्याने पुरातत्त्व खात्याची परवानगी घेतलेली नाही, या कारणास्तव लाडू विक्री थांबवण्याचे पत्र दिले होते. यामध्ये टपरी ठेवण्यास आक्षेप नोंदवला होता. त्यावर देवस्थान ट्रस्ट प्रशासनाने तातडीने टपऱ्या बंद केल्या व टेबल-खुर्ची ठेवून लाडू विकी सुरू ठेवली. यावर आता भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण, मंडल औरंगाबाद, उपमंडल नाशिक यांनी त्र्यंबकेश्वर पोलीस ठाण्यास पत्र पाठवले. त्यामध्ये संरक्षित स्मारकात लाडू विक्रीस मनाई केली असताना त्र्यंबकेश्वर देवस्थान ट्रस्टने ती सुरू ठेवली आहे. याबाबत त्यांच्यावर एफआयआर दाखल करावी, असे म्हटले आहे.

याबाबत त्र्यंबकेश्वर पोलिस आता काय निर्णय घेणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. भाविकांना बुंदीच्या लाडूचा प्रसाद बंद होणार की काय? अशी शंका व्यक्त होत आहे.



# त्र्यंबकेश्वरचा विकास आराखडा आज शिखर समितीसमोर सादर

**नाशिक : प्रतिनिधी**

अहिल्यानगर जिल्ह्यात मंगळवार (दि. ६) रोजी होणाऱ्या मंत्रिमंडळाच्या बैठकीसोबतच आयोजित सिंहस्थ शिखर समितीच्या बैठकीमध्ये त्र्यंबकेश्वरच्या विकास आराखड्यावर चर्चा होणार आहे. त्यामुळे त्र्यंबकेश्वरचा विकास आराखडा निश्चित होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.




सिंहस्थ कुंभमेळा अगदी तोंडावर आलेला असल्यामुळे गती द्यावी यादृष्टीने प्रशासनाने सातत्याने विविध विकासकामांचे आराखडे तयार करून शासनाला सादर केले आहेत. मध्यंतरी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीतही अनेक विषयांवर चर्चा करण्यात आली. त्यांनी सुचवलेल्या विषयांनुरूप नवा आराखडा/-...४

## महत्त्वाचे ▶▶▶▶

### पाकिस्तानात ४.२ तीव्रतेचा भूकंप

**इस्लामाबाद :** जम्मू-काश्मीरच्या पहलगाममध्ये २२ एप्रिल रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर केंद्रातील मोदी सरकार ॲक्शन मोडमध्ये आले आहे. भारत आणि पाकिस्तान या दोन देशांत तणाव वाढला आहे. याचदरम्यान, काल सोमवारी पाकिस्तानमध्ये अचानक आलेल्या भूकंपामुळे तिथल्या नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. दरम्यान, या भूकंपाची तीव्रता रिश्टर स्केलवर ४.२ मोजण्यात आली.

### पूंछमध्ये दहशतवाद्यांचे तळ केले उद्ध्वस्त

**जम्मू काश्मीर :** पहलगाम हल्ल्यानंतर दहशतवाद ठेचून काढण्यासाठी जम्मू-काश्मीरमध्ये भारतीय लष्कराने युद्धपातळीवर कारवायांना सुरुवात केली आहे. जम्मू काश्मीरमध्ये लपून बसलेल्या एक-एक दहशतवाद्याला शोधून त्यांना यमसदनी पाठवण्याच्या प्रयत्नांना वेग आला आहे. भारतीय सैन्याने पूंछमध्ये लपून बसलेल्या दहशतवाद्यांवर हल्ला करत, त्यांचे तळ उद्ध्वस्त करण्यात यश मिळविले आहे. जम्मूमधील तुरुंगावर हल्ला करण्याचा हे दहशतवादी कट रचत होते, असा अंदाज गुप्तचर विभागाने व्यक्त केला आहे.

### कानपूरमध्ये अग्नितांडव सहा जणांचा मृत्यू

**कानपूर :** उत्तर प्रदेशच्या कानपूरमध्ये इमारतीला भीषण आग लागल्याची घटना घडली. या आगीते सहा जणांचा होरपळून मृत्यू झाला. मृतांमध्ये एकाच कुटुंबातील पाच जणांचा समावेश आहे. कानपूरच्या चमनगंज पोलिस ठाण्याच्या हद्दीत असणाऱ्या पाचमजली इमारतीला अचानक भीषण आग लागली. अग्निशमन दलाच्या ५० पेक्षा जास्त गाड्यांच्या सहाय्याने या आगीवर नियंत्रण मिळवण्यात आले.

### वैभवीला बारावीत ८५.३३ टक्के गुण

**बीड :** वडिलांचा खून, न्यायासाठी गावोगावी मोर्चे, आंदोलन, पोलिस अन् लोकप्रतिनिधींचे दौरे, गावातील घरासमोर दररोज भेटायला आलेली माणसं या सगळ्या गदारोळात आणि दुःखद प्रसंगातही दिवंगत सरपंच संतोष देशमुख यांच्या कन्येने बाजी मारली. इयत्ता १२ वीच्या परीक्षेत देदीप्यमान यश मिळवत पुढील स्वप्नांची वाट धरली आहे. राज्यात १२ वी बोर्ड परीक्षेचा निकाल आज जाहीर झाला. त्यात यंदाचा राज्याचा निकाल ९१.८८ टक्के लागला. यंदा बारावीच्या निकालात कोकण विभागाने बाजी मारली आहे. बारावीच्या निकालात यंदाही मुलींनीच बाजी मारली आहे. ९४.५८ टक्के मुली उत्तीर्ण झाल्या आहेत. मुलांच्या निकालाची टक्कवारी ८९.५१ टक्के आहे. मुलांपेक्षा मुलींचा निकाल ५.०७ टक्क्यांनी अधिक आहे. याच मुलींमध्ये कन्या वैभवी देशमुख हिनेही ८५.३३ टक्के गुण मिळवत यश प्राप्त केले.

### कळवण तालुक्यात शेतकरी आत्महत्या

**अभोणा : प्रतिनिधी**

अभोणा पोलीस ठाणे हद्दीतील आमदर शिवारातील झोपडीत एका शेतकऱ्याने गळफास घेऊन आत्महत्या केली, या घटनेमागील कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. एकनाथ जयराम गायकवाड (वय ३८) यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, ४ मेस रात्री घरातील सर्व सदस्य सोबत जेवले आणि रात्री झोपले. ५ मेस सकाळी मी आमचे बैल घेऊन शेतामधील झोपडीत बैल बांधण्यासाठी गेलो असता, वडील जयराम गोविंदा गायकवाड (वय ६२) गळफास घेतलेल्या अवस्थेत दिसले.

## महत्त्वाचे



### कुरडया, पापड्या बनवण्याची ग्रामीण भागात महिलांची लगबग

**लासलगाव : वार्ताहर** परिसरातील गावांमध्ये महिला वर्गाची वाळवणी पदार्थ बनवायची लगबग सुरू आहे. लोणचे, विविध प्रकारचे पापड, कुरडया, शेवया आणि मसाले पदार्थ तयार करण्यात महिला व्यस्त आहेत. गव्हापासून शेवया, कुरडया, बाजरी, ज्वारी तसेच तांदळाचे पापड, हरभरा डाळीचे वडे, चकल्या, उडीद डाळीचे वडे, बटाट्याचे चिप्स आदी वाळवणाचे पदार्थ तयार केले जात आहेत. ग्रामीण भागात महिला गावातील शेजारपाजारच्या बायकांना बोलावून कुरडया, पापड्या बनवण्यासाठी एकमेकींना मदत करतात. शेवया तयार करण्याचे यंत्र आल्याने रोजगार तयार झाला आहे. काही महिला रोजंदारीवर मदत करत आहेत. शिवाय अनेक महिला या व्यवसायात सोशल मीडियाचा चांगला वापर करून घेत आहेत. व्हॉट्सअॅपच्या माध्यमातून उन्हाळी वाळवण बनविण्याची ऑर्डर घेत आहेत. त्यातून चांगल्या प्रकारे मोबदला मिळत आहे.

### देवगाव फाट्याजवळ अपघातात एक ठार

**दिंडोरी : वार्ताहर** नाशिक ते गुजरात या राष्ट्रीय महामार्गावर करंजाळी ते पेठदरम्यान देवगाव फाटानजीक पुलाजवळ वळणावर चालकाचा ताबा सुटल्याने अवजड वाहतूक करणारा ट्रक उलटल्याने अपघातात जखमी झालेल्या चालकाचा मृत्यू, तर एकजण गंभीर जखमी झाला. नाशिकहून गुजरातकडे जाणारा ट्रक (टीएन-५२-एल-१०८५) देवगाव फाट्यानजीक उतारावर चालकाचा ताबा सुटल्याने पुलाच्या पुढील वळणावर पलटी झाला. यात चालक कलईसेलवन शिवलिंगम (रा. सेलम, तामिळनाडू) गंभीर जखमी झाल्याने त्याचा मृत्यू झाला, तर अन्य एकजण गंभीर अवस्थेत आहे. अपघातात वाहनाचेही मोठे नुकसान झाले. याबाबत पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. पोलिस तपास करीत आहेत.



### योगेश अडसरेंना साई कलारत्न पुरस्कार

**निफाड : प्रतिनिधी** ओम साई विकास प्रतिष्ठान व बीबीसी फिल्म प्रोडक्शन महाराष्ट्र राज्यनिर्मित साई कलारत्न समाजभूषण पुरस्कार २०२५ सोहळ्याचे आयोजन शिर्डी येथील हॉटेल शांतिकमल येथे करण्यात आले होते. ग्रामीण पत्रकार व सामाजिक क्षेत्रातील दिलेल्या योगदानाबद्दल योगेश अडसरे यांना हा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. या भव्य व दिव्य पुरस्कार सोहळ्यास समाजसेवक किशोर कालडा शेठ (संगमनेर), दिग्दर्शक अल्ताफ शेख (पुणे), प्रसिद्ध अभिनेत्री वंदना गव्हाणे आदी मान्यवर उपस्थित होते.



### दिक्षी येथे सैनिकाच्या हस्ते ध्वजारोहण

**दिक्षी :** येथील जिल्हा परिषद शाळेत महाराष्ट्रदिनी भूमिपुत्र भारतीय सैन्यात कार्यरत लहू मुकुंदा आगळे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर चावडीवाचन झाले. अनेक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवत चावडीवाचन केले. सरपंच डॉ योगेश्वर चौधरी, उपसरपंच अनिल मोर, साहेबराव चौधरी, एन. डी. चौधरी, मुकुंदा आगळे, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष सोमनाथ चौधरी, उपाध्यक्ष उमेश गांगुर्डे, सदस्य अरुण मोरे, दिंगबर धुळे, सुदाम आगळे, शशी पवार, गौरी पवार, सुरेखा जाधव, कविता रहिरे, ललिता डबके, कोमल उघड, कुंदा आगळे, मुख्याध्यापक रघुनाथ वाघ, सुधाकर खरे, किरण दंडगव्हाळ, नीलिमा कानड, रेखा खरवट, सोनाली भागवत आदी उपस्थित होते.

# नाफेडची कांदा खरेदी लांबण्याची शक्यता

## बाजारभाव दबावात, खरेदी कोणाला द्यायची यावर उशिरा निर्णय

**लासलगाव : वार्ताहर**

यंदा मे महिन्यात नाफेड आणि एनसीसीएफची सरकारी कांदा खरेदी सुरू होणार अशी शक्यता वर्तविली जात होती. नाफेडच्या सूत्रांनीही ही शक्यता व्यक्त केली होती. मात्र आता ही खरेदी लांबण्याची शक्यता असून, त्याचा परिणाम सध्याच्या कांदा बाजारभावावर होण्याची शक्यता आहे. आधीच दबावात असलेले बाजारभाव खरेदी सुरू झाली नाही, तर आणखी दबावात येऊ शकतात, असे कांदा व्यापारी आणि निर्यातदारांचे म्हणणे आहे.

नाफेडच्या कांदा खरेदीच्या अवास्तव अटी असून, त्यांची पूर्तता करण्यासाठी अनेक सहकारी संस्थांची दमछाक होत आहे. काहींकडे अटीत नमूद केलेल्या ५ हजार मे. टन कांदा चाळीची एकत्र सुविधाच नसल्याचे दिसत आहे. त्यातच यंदा नाफेड आणि एनसीसीएफच्या कांदा खरेदीत घोटाळा बाहेर आल्याने शेतकऱ्यांच्या उत्पादक कंपन्या आणि त्यांचे फेडरेशन यांच्याकडून कांदा खरेदी होणार नाही, तर ती कांदा खरेदी सहकारी विकास सोसायट्यांच्या माध्यमातून होणार आहे. अशात भ्रष्टाचार केलेल्या कंपन्या सत्ताधारी पक्षाशी व राजकीय नेत्यांशी संबंधित असल्याने त्यांचाही या खरेदीत हस्तक्षेप होत असल्याची माहिती आहे. त्याचा परिणाम खरेदी कोणाला द्यायची याचा निर्णय उशिरा होणार असण्यात होणार आहे.



**खरेदी प्रक्रियेत पारदर्शकतेसाठी उपाययोजना**

यंदा केंद्र सरकारने भाव स्थिरीकरण निधींतर्गत कांद्याचा साठा निर्माण करण्यासाठी देशभरातून ३ लाख मेट्रिक टन कांदा खरेदी करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यापैकी १.५ लाख टन कांदा नाफेडकडून खरेदी केला जाणार आहे. त्यातील बहुतांश म्हणजेच १ लाख टन कांदा नाशिक जिल्ह्यातून खरेदी करण्याचे उद्दिष्ट आहे. कांदा खरेदी प्रक्रियेत पारदर्शकता राखण्यासाठी नाफेडने विविध उपाययोजना केल्या आहेत. खरेदी केंद्रांवर सीसीटीव्ही निगराणी, कांदा वाहतूक करणाऱ्या ट्रकना ट्रॅकिंग, तसेच माजी लष्करी अधिकाऱ्यांच्या फ्लाइंग स्क्वॉडद्वारे तपासणींचा समावेश आहे.

दरम्यान, नाफेडने कांदा खरेदीसाठी महाराष्ट्रातील १५ प्राथमिक कृषी सहकारी संस्थांच्या निवडीसाठी जाहीर केलेल्या अभिरुची पत्रात सहभागी संस्थांनी अपूर्ण कागदपत्रे सादर केल्याचे आढळले आहे. त्यामुळे अशा संस्थांना ३ मे २०२५ पर्यंत नाशिकमधील नाफेड कार्यालयात उर्वरित कागदपत्रे सादर करण्याची अंतिम संधी दिली होती.

नाफेडने ७ एप्रिल २०२५ ला जाहीर केलेल्या पत्रकानुसार महाराष्ट्रातील कांदा उत्पादक भागांमध्ये कार्यरत सहकारी संस्थांना कांदा खरेदी,साठवण,देखभाल आणि वाहतूक यांसारख्या कामांसाठी निवडले जाणार होते.या प्रक्रियेत सहभागी झालेल्या संस्थांनी २३ एप्रिल २०२५ पर्यंत तांत्रिक आणि आर्थिक प्रस्ताव सादर केले होते. मात्र, बहुतेक संस्थांनी आवश्यक कागदपत्रे अपूर्ण स्वरूपात सादर केल्यामुळे त्यांना ही अतिरिक्त संधी देण्यात आली आहे. त्यानंतर कागदपत्रांची छाननी आणि इतर प्रक्रियेला आणखी वेळ लागून नाफेडची खरेदी अपेक्षित वेळेपेक्षा लांबण्याची शक्यता आहे.

# जगताना आनंद शोधा, हसत जगा : डॉ. निकम

## ज्येष्ठ नागरिक संघ अक्षय व्याख्यानमाला



**मालेगाव : प्रतिनिधी**

सेवानिवृत्तीनंतर प्रत्येकास आनंदाने जगावे असे वाटते. ज्याला पेन्शन नाही त्याला टेन्शन आहे. तेव्हा प्रत्येकाने परिस्थितीनुसार जगत असताना आनंद शोधा व हसतहसत जगा, असे प्रतिपादन डॉ. सुभाष निकम यांनी केले.

ज्येष्ठ नागरिक संघातर्फे आयोजित अक्षय व्याख्यानमालेच्या चौथ्या पुष्पप्रसंगी ते बोलत होते.

व्यासपीठावर अध्यक्ष डी. आर.हिरे, सचिव देवीदास वाल्हे, सहसचिव नाना इंगळे, खजिनदार शिवराम मोरे व सल्लागार निंबाजी सूर्यवंशी उपस्थित होते. गोपीनाथ सूर्यवंशी यांनी सूत्रसंचालन केले.

डॉ. निकम म्हणाले की, प्रत्येकाचे आयुर्मान हे साधारणतः सत्तर ते पंचाहत्तर वर्षे असते. यात शालेय जीवन, महाविद्यालयीन जीवन नंतर वैवाहिक जीवन येते. माणूस विवाहबंधनात अडकल्यानंतर खऱ्या अर्थाने त्याच्या जबाबदाऱ्या सुरू होतात व त्या वाढतच जातात. आहे ते वास्तव स्वीकारून प्रत्येकाने त्यास हसतहसत सामोरे जावे व समाधान मानावे, हीच खरी जीवनशैली आहे.

दुसऱ्याचे आनंदात आपला आनंद माना, असे डॉ. निकम यांनी उदाहरणांसह स्पष्ट केले. जगदीश निकम यांनी आभार मानले. कार्यक्रमास शिल्पकार भय्या जाधव, काशीनाथ कापडणीस, संजय पांडे, दिनकर हिरे, प्रा. महेश बाविस्कर, प्रा. अरुण पाटील, डॉ. विनोद गोरवाडकर, पोपट कोठावदे, बाबुलाल वाणी, प्रभाकर वारुळे, शिवाजी पवार, घनःश्याम आहिरे, सीताराम खैरनार, धर्मराज देवरे, वसंत भुसे, विष्णू गुमाडे, बाबुलाल आहिरे, डॉ. मंगला देवरे, लीलाबाई देवरे, मंगला मिसर, रोहिणी शिंत्रे, मंदा वाडेकर, नलिनी माळी, नलिनी पाटील, रेखा पवार आदी उपस्थित होते.



# जलजीवनसह समस्यांवर माकपचा हल्लाबोल

## त्र्यंबकेश्वर तहसीलमध्ये बैठक, विविध प्रश्नांवर चर्चा

**त्र्यंबकेश्वर : प्रतिनिधी**

रखडलेल्या जलजीवन मिशन पाणीपुरवठा योजना, घरकुल लाभार्थींना रोजगार हमीचा निधी मिळण्यास झालेला विलंब, या प्रलंबित समस्यांवर माकपचे जिल्हा सचिव इरफान शेख यांनी आवाज उठवला.

तालुक्यातील सर्वसामान्य नागरीक दैनंदिन जीवनाशी निगडीत समस्यांनी त्रासले आहेत. शासनाच्या लाभाच्या योजना जनसामान्यांपर्यंत पोहचत नाहीत. याबाबत माकपचे जिल्हा सचिव शेख यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन केले होते. त्यावेळी उपस्थित अधिकाऱ्यांच्या आश्वासनाने आंदोलन तात्पुरते स्थगित केले. त्यानंतर दिलेल्या आश्वासनांची कितपत पूर्तता झाली, याचा आढावा घेण्यासाठी प्रांताधिकारी ओमकार पवार यांच्या अध्यक्षतेखाली त्र्यंबकेश्वर तहसील कार्यालयात बैठक झाली. यावेळी तहसीलदार श्वेता संचेती, निवासी नायब तहसीलदार सुनील पवार उपस्थित होते. माकप सचिव इरफान शेख यांनी प्रलंबित समस्यांचा लेखाजोखा मांडला. यावेळेस काही महत्त्वाच्या विभागाचे अधिकारी अनुपस्थित राहिल्याने प्रांताधिकारी यांनी कडक शब्दांत नाराजी व्यक्त केली. आढावा बैठकीदरम्यान ठळकपणे काही बाबी समोर आल्या आहेत. यात हरसूल व त्र्यंबकेश्वर येथील शासकीय रुग्णालयात स्त्रीरोग चिकित्सकपद रिक्त असल्याने ते तातडीने भरावे, हरसूल येथे ट्राम केअर सेंटर उभारण्यात यावे, त्र्यंबकेश्वर व हरसूल येथे शववाहिका उपलब्ध करून द्यावी. जलजीवन मिशनअंतर्गत मंजूर असलेल्या पाणीपुरवठा योजनांची अपूर्ण कामे त्वरित पूर्ण करून गाव, वाडी-पाड्यांचा शुद्ध पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यात यावा.

# खर्डे आरोग्य केंद्रास नवीन रुग्णवाहिका

## आमदार डॉ. आहेर यांच्या हस्ते महाराष्ट्रदिनी लोकार्पण

**देवळा : प्रतिनिधी**

तालुक्यातील खर्डे येथील प्राथमिक आरोग्य केंद्रास जिल्हा परिषद आरोग्य विभागातर्फे मिळालेल्या नवीन रुग्णवाहिकेचे आमदार डॉ. राहुल आहेर यांच्या हस्ते विधिवत पूजा करून महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधत लोकार्पण करण्यात आले,

तालुक्यातील पश्चिम भागातील अतिदुर्गम खर्डे प्राथमिक आरोग्य केंद्रास नवीन रुग्णवाहिका मिळाल्याने परिसरातील रुग्णांना चांगली सुविधा उपलब्ध झाल्याने समाधान व्यक्त होत आहे,

खर्डे प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत खर्डे, कनकापूर, वाजगाव, मटाणे, रामेश्वर, सुभाषनगर आदी गावांतील सहा उपकेंद्रे, तर १५ गावांचा समावेश आहे. याप्रसंगी सरपंच जिभाऊ मोहन, उपसरपंच भाग्यश्री पवार, माजी उपसरपंच सुनील जाधव, राहुल देवरे, जितेंद्र पवार, हर्षद मोरे, रामदास गांगुर्डे, समाधान देवरे, ग्रामपंचायत पदाधिकारी, ग्रामस्थ अदिसह तालुका आरोग्य अधिकारी डॉ सुधिर पाटील, वैद्यकीय अधिकारी डॉ संतोष आडे, डॉ. जितेंद्र पवार, व प्राथमिक आरोग्य केंद्रातील कर्मचारी उपस्थित होते.



देवळा : रुग्णवाहिका लोकार्पणप्रसंगी आ. डॉ. राहुल आहेर, सरपंच जिभाऊ मोहण, उपसरपंच भाग्यश्री पवार, डॉ सुधीर पाटील आदी.

खर्डे प्राथमिक आरोग्य केंद्राच्या नवीन रुग्णवाहिकेचे लोकार्पण सोहळा कार्यक्रमास ग्रामपंचायत वगळता प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत येणाऱ्या सहा उपकेंद्रातील रुग्ण कल्याण समितीचे सदस्य, परिसरातील ग्रामपंचायतींचे सरपंच, उपसरपंच व सदस्यांना साधे निमंत्रण देण्याची तसदी संबंधित विभागाने घेतली नाही. याबाबत रुग्ण कल्याण समिती व ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांनी नाराजी व्यक्त केली,

# उत्कृष्ट घरकुल बांधणी करणाऱ्यांचा गौरव

**नाशिक : प्रतिनिधी**

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेतर्फे वतीने दिंडोरी आणि कळवण तालुक्यात प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत नाविन्यपूर्ण पद्धतीने व उत्कृष्ट घरकूल बांधणी करणाऱ्या घरकुलल लाभार्थ्यांचा मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला.

या विशेष कार्यक्रमात १० घरकुल लाभार्थी,१ विस्तार अधिकारी सांख्यिकी, ४ ग्रामपंचायत अधिकारी आणि २ ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक प्रतिभा संगमनेरे उपस्थित होत्या.



प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीणच्या माध्यमातून नाशिक जिल्ह्यातील उत्कृष्ट घरकुल बांधणी करणाऱ्या घरकुल लाभार्थ्यांचा गौरव करण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत ग्रामीण भागातील अनेक कुटुंबांनी आधुनिक सुविधा आणि नाविन्यपूर्ण पद्धतींचा अवलंब करून आपली घरे अधिक टिकाऊ व सुंदर बनवली. लाभार्थ्यांनी घरकुल बांधताना पर्यावरणपूरक साहित्याचा वापर, आधुनिक डिझाइन आणि जागेचा प्रभावी उपयोग यासारख्या गोष्टींवर भर दिला असल्याने जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या वतीने अशा लाभार्थ्यांचा सन्मान करण्यात आला.जिल्हा प्रशासनाने लाभार्थ्यांच्या मेहनतीची दखल घेत आणि त्यांना प्रेरणादायी उदाहरण म्हणून गौरवले.

या उपक्रमात ग्रामपंचायत अधिकारी आणि ग्रामीण गृह अभियंते यांनीही महत्त्वाची भूमिका बजावली. त्यांनी लाभार्थ्यांना तांत्रिक मार्गदर्शन करून घरकुलांची गुणवत्तापूर्ण आणि वेळेत पूर्तता सुनिश्चित केली.

**गौरवण्यात आलेले लाभार्थी – दिंडोरी तालुका**

लहू गावीत – महाजे, विष्णू गावीत – महाजे, रमेश गावीत – महाजे, लक्ष्मण गावीत – फोफळवाडे, कृष्णा गावीत, फोफळवाडे अंकुश झोमन – ग्रामीण गृहनिर्माण अभियंता, प्रवीण बहिरम – विस्तार अधिकारी सांख्यिकी, रामदास मोरे – ग्रामपंचायत अधिकारी, महाजे,छाऊ गायकवाड – ग्रामपंचायत अधिकारी, फोफळवाडे

**गौरवण्यात आलेले लाभार्थी – कळवण तालुका**

देविदास चव्हाण – वाडी बु.समाधान पवार – खेडगाव,पोपट चौधरी – पुनदनगर,राजेंद्र चोरे – कोसुर्डे,युवराज पवार – सावकी पाळे, विद्या खेरनार – ग्रामपंचायत अधिकारी, खेडगाव,सुजाता राजाराम बागूल – ग्रामपंचायत अधिकारी, कोसुर्डे, प्रतीक पगार – ग्रामीण गृहनिर्माण अभियंता ,ललित जाधव – डेटा एंट्री ऑपरेटर



# म्हाळसाकोरे उपसरपंचपदी जयश्री नागरे बिनविरोध

**कसबे सुकेणे : प्रतिनिधी**

निफाड तालुक्यातील म्हाळसाकोरे ग्रामपंचायत उपसरपंचपदी जयश्री नागरे यांची बिनविरोध निवड करण्यात आली

मावळत्या उपसरपंच सुनंदा ढोबळे यांनी आवर्तनानुसार उपसरपंचपदाचा राजीनामा दिल्याने सरपंच रघुनाथ ढोबळे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या ग्रामपंचायत सदस्यांच्या बैठकीत ही निवड करण्यात आली. ग्रामपंचायत कार्यालयात झालेल्या निवडणुकीत ग्रामपंचायत सदस्य जयश्री छगन नागरे यांचा एकमेव अर्ज निर्धारित वेळेत प्राप्त झाल्याने निवडणूक निर्णय अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी कल्पेश बरू यांनी जयश्री नागरे यांची उपसरपंचपदी निवड झाल्याचे जाहीर केले. यावेळी सरपंच रघुनाथ ढोबळे, ग्रामपंचायत सदस्य इंदूबाई मुरकुटे, आशा पडोळ, कविता बाजारे, सुनंदा ढोबळे, पद्मा राऊत, दत्तात्रय बाजारे, अशोक पठारे, नवनाथ मुरकुटे ग्रामविकास अधिकारी कल्पेश बरू, तंटामुक्ती अध्यक्ष भाऊसाहेब मुरकुटे, सुधीर शिंदे आदी उपस्थित होते.

# चारा-पाण्याअभावी मेंढपाळांची दाही दिशा भटकंती

## दिंडोरी तालुक्यात मेंढ्यांचे कळप

**दिंडोरी : प्रमोद ठेपणे**

तालुक्यात चारा-पाण्याच्या शोधात शेकडो मेंढ्यांसह मेंढपाळ बिऱ्हाडासह गावोगावी फिरताना दिसत आहेत. पशुधनाच्या चाऱ्यासोबत पाण्यासाठी दाही दिशा भटकंती करताना मोठी कसरत होताना दिसुन येत आहे.

दिंडोरी धरणांचा तालुका म्हणून ओळख आहे.सद्यस्थितीत पाण्याअभावी शेतकरी वर्गासोबत गावागावात पाणीटंचाई निर्माण होत आहे. विहिरींनी तळ गाठण्यास सुरुवात केली आहे. मेंढपाळ आपल्या पशुधनाच्या चाऱ्या व पाण्यासाठी आपले शेकडो पशुधन घेवुन फेब्रुवारीपासुन मे-जून महिन्यापर्यंत जिकडेतिकडे पाण्याच्या शोधार्थ वास्तव्यास येत आहे. शेतकऱ्यांच्या शेतातील काढणीस आलेले पीक त्याते टोमॅटो, वाल पीक चारण्यासाठी मेंढपाळ त्या पिकासाठी उभे केलेले तार, बांबूचे



फाउंडेशन जमा करून देत असतात.

त्या मोबदल्यात मेंढपाळ पशुधन त्या ठिकाणी दोन ते सहा दिवस मुक्काम ठोकत असतात,अशाच दिनक्रमानुसार दिवसामागे दिवस करीत काही दिवस काढीत असतात. मात्र जसजसा मार्च महिना सुरू होतो, तसतसे त्यांचे बिऱ्हाड दिवसागणिक बदलणे भाग पडते. या काळात मोठ्या प्रमाणावर आ-लेले मेंढपाळ हे पशुधनासाठी पाण्याच्या शोधात असतात आणि पर्यायानेच बरेच मेंढपाळ हे एकाच परिसरात थोड्याफार अंतरावर ठियया मांडतात.

त्याचा विपरीत परिणाम हा चाऱ्यावर होऊ लागतो, त्यांना शेकडो पशुधनाच्या चाऱ्यासाठी वाढत्या तापमानाची पर्वा न करता मैलोमैल भटकंती करावी लागत आहे. पुन्हा पाण्यासाठी तेवढीच पायपीट करुनही मुक्कामाच्या ठिकाणी रात्रीच्या वेळी आम्हाला जागे राहावे लागते, त्यात हिंसक जनावराची भीती असे एका मेंढपाळाने बोलताना सांगितले.

**वन्यप्राण्यांचा पशुधनाला फटका**

सध्याच्या परिस्थितीमध्ये जंगलात पाणी (पाणवठे) नसल्यामुळे हिंस्र प्राणीही रात्रीच्या वेळी पाण्याच्या शोधात मानवी वस्तीकडे फिरकत असतात. त्याचा फटका आमच्या पशुधनाला बसण्याची दाट शक्यता असते. त्यामुळे कितीही लाखो रुपयांची आमची संपत्ती असली तरी आमचे जीवन मात्र उघड्यावर आणि असह्य वेदनांनी भरलेलेच असते, असेही मेंढपाळांनी सांगितले आहे.

### जातनिहाय जनगणनेमुळे भाजपची स्थिती भक्कम

**मालेगाव : प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्षाने देशातील ५४ कोटी ५४ टक्के ओबीसी जनतेच्या भावनांची कदर करून जातनिहाय जनगणनेची घोषणा केल्यामुळे खऱ्या अर्थाने ओबीसींना न्याय मिळेल व त्यामुळे भाजपचे राजकीय भविष्य अधिक उज्ज्वल होणार आहे. या निर्णयामुळे मोदी सरकारने विरोधी पक्षांची हवाच काढून घेतली आहे. हा निर्णय दूरदर्शीपणाचा राजकीय भक्कमपणाचा पुरावा असल्याचे मत भगवान बागूल यांनी व्यक्त केले. येथील भाजप शहर कार्यालयात भाजपने जातनिहाय जनगणना जाहीर केल्यामुळे मोदी सरकारचा अभिनंदनाचा ठराव करण्यात आला. त्याप्रसंगी ते बोलत होते. शहराध्यक्ष देवा पाटील अध्यक्षस्थानी होते. देशातील ५४ टक्के ओबीसींची ही अनेक वर्षांपासूनची मागणी होती. साठ वर्षांहून अधिक काळ सत्तेत असलेल्या काँग्रेसने या मागणीकडे दुर्लक्ष केले होते.

## महत्त्वाचे

### नदीच्या पुलावरून पडून दुचाकीस्वार गंभीर जखमी

**सिडको विशेष प्रतिनिधी :** सातपूर-अंबड लिंक रोडवरील नंदिनी नदीवर नव्याने उभारण्यात आलेल्या सिमेंट पुलावरून एकजण दुचाकीसह नदीत पडल्याची घटना घडली. पुलाला कोणताही सुरक्षा कठडा नसल्याने ही दुर्घटना घडल्याचे समोर आले आहे. सातपूर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, नरेंद्र गौतम (वय ३७, रा. बजरंगनगर, लिंक रोड) दुचाकीवरून जाताना या पुलावरून सुमारे ३० फूट खोल नदीत पडले. पुलाला सुरक्षा कठडे नसल्याने आणि पुढील भागाचे काम सुरू असल्यामुळे ही दुर्घटना घडल्याचे प्रत्यक्षदर्शी सांगतात. या घटनेनंतर सातपूर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली आणि नदीपात्रात उतरून नरेंद्र गौतम यांना बेशुद्धावस्थेत बाहेर काढले. तत्काळ १०८ रुग्णवाहिकेच्या सहाय्याने प्राथमिक उपचार देण्यात आले. उपचारानंतर शुद्धीवर आलेल्या गौतम यांनी आपण कसे पडलो हेच कळले नाही, असे सांगितले. या अपघातात त्यांच्या पाठीच्या मणक्याला व पायाला गंभीर दुखापत झाली आहे. त्यांच्यावर नाशिकच्या शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत. घटनास्थळी सातपूर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक राजू पठाण, उपनिरीक्षक शिवराम खांडवी, पूजा भांगरे, पोलीस कॉन्स्टेबल राहुल खांडबहाले, राजू जाधव तसेच अंबड पोलीस ठाण्याचे पोलीस कॉन्स्टेबल रमेश पवार, अशोक श्रीकांडे व १०८ रुग्णवाहिकेचे डॉक्टर व वाहनचालक चंद्रशेखर जोशी यांनी मदतकार्य केले.



### प्रियकराची दुसऱ्या प्रियकराकडून हत्या

**शहापूर प्रतिनिधी:** एखाद्या हिंदी चित्रपटप्रमाणे शहापूर तालुक्यातील मुंबई- नाशिक महामार्गावरील उंबरखांड गावच्या हद्दीत एका अनोळखी व्यक्तीचा मृतदेह ३० एप्रिलला आढळून आला होता. शरीरावरील जखमांमुळे शहापूर पोलिस ठाण्यात हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन ठाणे ग्रामीण पोलीस दलाचे पोलीस अधीक्षक डॉ. डी. एस. स्वामी, उपविभागीय पोलीस अधिकारी मिलिंद शिंदे, पोलीस निरीक्षक जितेंद्र ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली शहापूरच्या तपास पथकातील पोलीस उपनिरीक्षक वारुंगसे, पोलीस हवालदार शशिकांत पाटील, विकास सानप, रमेश नलावडे, मोहन भोईर, दशरथ देसले, कमलाकर शिरोसे, अनिल भोसले यांच्यासह ठाणे ग्रामीण स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे महेश कदम, कोळी, विभुते यांनी प्रकरणाचा तपास सुरू केला. एकाच मुलीवर दोघे प्रेम करत होते. परंतु ती प्रेमिकाच दगाबाज निघते. तसाच काहीसा प्रकार शहापूर पोलिसांच्या हद्दीत उघड झाला आहे. एका महिलेने तिच्या दुसऱ्या प्रियकराच्या मदतीने पहिल्या प्रियकराची हत्या केल्याचा प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी शहापूर पोलिसांनी तिघांना अटक केली आहे. या पथकाकडून तपास सुरू असतानाच, मृताचे छायाचित्र समाजमाध्यमाद्वारे प्रसारित झाले होते. दरम्यान, हा मृतदेह नाशिक जिल्ह्यातील पांढुर्ली येथील एका व्यक्तीचा असल्याचे समोर आले. शहापूर पोलिसांनी पांढुर्ली येथे जाऊन चौकशी करण्यास सुरुवात केली. चौकशीअंती अशोक मधे असे मृत व्यक्तीचे नाव असल्याचे समोर आले. दरम्यान, एका महिलेसह तिघांनी त्याची हत्या केल्याची माहिती समोर आल्यानंतर पोलिसांनी महिलेसह तिघांना ताब्यात घेतले.

# अनकवाडे शिवारात विहिरीत उतरले इंधन

## भारत पेट्रोलियमच्या पाइपलाइन गळतीमुळे नुकसानीचा दावा

**मनमाड : आमिन शेख**

शहरानजीक असलेल्या अनकवाडे हद्दीतील शेतकरी संपत चव्हाण यांच्या विहिरीत डिझेल व पेट्रोल उतरल्याने एकच खळबळ उडाली आहे. भारत पेट्रोलियम कंपनीच्या पाइपलाइन गळतीमुळे ते उतरले की, कोणीतरी खोडसाळपणा करून डिझेल-पेट्रोल विहिरीत सोडले, याबाबत शोध सुरू आहे.

या घटनेची माहिती मिळताच भारत पेट्रोलियमच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली व शोधमोहीम सुरू केली. मात्र, सायंकाळपर्यंत या विहिरीत पेट्रोल-डिझेल कुठून आले, हे समजलेच नाही. पेट्रोलियम कंपनीच्या पाइपलाइन गळतीमुळेच विहिरीत इंधन उतरल्याने माझे नुकसान झाल्याचा दावा चव्हाण यांनी केला आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, मनमाड येथे इंडियन ऑइल व हिंदुस्थान पेट्रोलियम या इंधन कंपन्यांचे प्लांट आहेत. यात मुंबईवरून थेट मनमाडला पेट्रोल, डिझेल व केरोसीनचा पुरवठा करण्यात येतो. मनमाडजनीक असलेल्या अनकवाडे शिवारात संपत चव्हाण यांच्या शेतालगत भारत पेट्रोलियमची इंधन पुरवठा करणारी पाइपलाइन गेलेली आहे. चव्हाण यांच्या शेतातील विहिरीत उन्हाळा असल्याने जेमतेम पाणी शिल्लक आहे. यात जवळपास चार ते साडेचार फूट पेट्रोल व डिझेलचा थर आढळला. याबाबत चव्हाण यांनी पेट्रोलियम कंपनीशी संपर्क साधून माझ्या विहिरीत इंधन उतरल्याचा दावा केला. मात्र, इंधन कंपन्यांकडून ही गोष्ट शक्य नाही. गळती असेल तर अत्याधुनिक मशिनरीद्वारे तत्काळ समजले असते. तरीही सखोल तपास करून निर्णय घेऊ, अशी भूमिका घेतली.या घटनेची माहिती मिळताच भारत पेट्रोलियम कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट दिली.

सुरुवातीला विहिरीची तपासणी करून तीत उतरलेले पेट्रोल, डिझेल व्हॅक्यूम गाडीद्वारे काढून घेण्यात आले. यानंतर पाइपलाइन व विहिरीच्या आजूबाजूला पोकलेनद्वारे दहा फूट खोल खड्डा खोदून खरोखर पाइपलाइनला गळती आहे का, असेल तर कोणत्या दिशेने पेट्रोल-डिझेल विहिरीत झिरपले, याचा तपास कंपनीचे अधिकारी व कर्मचारी यांच्याकडून करण्यात येत आहे. पाइपलाइन गळतीमुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाले असेल, तर आम्ही भरपाई देऊ, असे अधिकाऱ्यांतर्फे सांगण्यात आले.



**मनमाड : अनकवाडे शिवारात शेतकरी संपत चव्हाण यांच्या विहिरीत उतरलेले डिझेल व पेट्रोल. (छायाचित्र : आमिन शेख)**

### भारत पेट्रोलियमने भरपाई द्यावी

मनमाडला भारत पेट्रोलियम कंपनीच्या पेट्रोल, डिझेल व केरोसीन पुरवठा करणारी पाइपलाइन आमच्या शेतातून गेली आहे. याआधी अनेकदा पाइपलाइनला गळती झाली होती. या गळतीमुळेच माझ्या विहिरीत पेट्रोल– डिझेल उतरले. शिल्लक सर्व पाणी दूषित झाले. आम्हाला प्यायला व जनावरांना पिण्यासाठीदेखील आता पाणी नाही. भविष्यात हा प्रकार कधी थांबेल, याची शाश्वती नाही. भारत पेट्रोलियम कंपनीने मला भरपाई द्यावी.

**– संपत चव्हाण, शेतकरी**

# नांदगाव तालुक्यात अवकाळीची हजेरी

## मनमाड, आमोदे परिसरात गारपीट, पिकांचे नुकसान

**मनमाड : प्रतिनिधी**

शहर परिसरात सोमवारी (दि. ५) विजांच्या कडकडाटासह गारांचा पाऊस झाला. या पावसाने छोट्या-मोठ्या व्यापाऱ्यांची धावपळ झाली, तर शेतकऱ्यांचे कांदा पिकासह इतर नुकसान झाले. या अवकाळी पावसामुळे आधीच संकटात असलेला बळीराजा अडचणीत सापडला आहे.

हवामान खात्याने येत्या १० मेपर्यंत राज्यात विजांचा कडकडाट, वादळी वाऱ्यासह गारपिटीची शक्यता वर्तवली होती. मनमाड शहरासह परिसरात सोमवारी दुपारी एकच्या सुमारास आभाळ भरून आले. त्यानंतर विजांचा कडकडाट व वादळी वारा सुरू झाला आणि पावसाला सुरुवात झाली. काही वेळ पाऊस झाल्यानंतर गारा पडायला लागल्या. पावसामुळे व्यापारी वर्गाची धावपळ झाली. शेतकऱ्यांनी काढून ठेवलेल्या कांद्याचे काही ठिकाणी नुकसान झाले.अवकाळी पावसामुळे बळीराजा आणखी संकटात सापडला आहे.



**कांदा, मका पिकांचे नुकसान**

**नांदगाव प्रतिनिधी :** नांदगाव तालुक्यातील आमोदे परिसरात सोमवारी बेमोसमी पावसाने जोरदार हजेरी लावल्याने शेतकऱ्यांची तारांबळ उडाली. पावसासह गारपिटीमुळे पिकांचे मोठे नुकसान होणार असल्याचा अंदाज वर्तवला जात आहे. परिसरात दुपारी तीननंतर हवामानात अचानक बदल होत पावसाचे वातावरण तयार झाले. अचानक आलेल्या या पावसाबरोबरच गारपिटीमुळे हाता-तोंडाशी आलेला घास हिरावून नेण्याची वेळ शेतकऱ्यांवर येऊन ठेपली. सध्या आमोदे परिसरात कांदाकाढणीसह मका सोगणीला वेग आला आहे. त्यात बेमोसमी पावसाने वादळी वाऱ्यासह जोरदार हजेरी लावल्याने पिके पूर्ण भिजली.

# नाशिकला टाउन ऑफ एक्स्पोर्ट एक्सलन्स म्हणून मान्यता मिळावी

## उद्योजकांची मागणी : झूमअंतर्गत निर्यातविषयक उपसमितीची बैठक

**नाशिक : प्रतिनिधी**

नाशिकला टाउन ऑफ एक्स्पोर्ट एक्सलन्स म्हणून मान्यता मिळावी, अशी मागणी झूम अंतर्गतच्या पहिल्याच निर्यातविषयक उपसमितीच्या बैठकीत उद्योजकांनी केली.

जिल्हाधिकारी जलज शर्मा यांनी झूमअंतर्गत येणारे विविध प्रश्न व औद्योगिक विकासासाठी उपसमित्या स्थापन करून त्याद्वारे सोडवावेत, असे सूचित केले. त्यानुसार पहिलीच निर्यातविषयक उपसमितीची बैठक जिल्हा उद्योग केंद्र कार्यालयात झाली. तीत निर्यातवाढीबाबत करावयाच्या विविध उपाययोजनांबाबत चर्चा झाली. या बैठकीस जिल्हा उद्योग केंद्राचे सह संचालक संदीप पाटील, एमआयडीसीचे प्रादेशिक अधिकारी दीपक पाटील, निमाचे अध्यक्ष आशिष नहार, आयमाचे अध्यक्ष ललित बूब, स्टाइसचे अध्यक्ष नामकर्ण आवारे, निमा सचिव राजेंद्र अहिरे, खजिनदार राजेंद्र वडनेरे, सी. एस. सिंग उपस्थित होते. नाशिकच्या निर्यातवाढीला प्रोत्साहन द्यायचे असेल, तर नाशिकला टाउन ऑफ एक्स्पोर्ट एक्सलन्स म्हणून मान्यता मिळावी, अशी मागणी निमा अध्यक्ष आशिष नहार यांनी यावेळी केली. एअर कार्गो कॉम्प्लेक्स जानोरी हे आंतरराष्ट्रीय कुरिअर हब म्हणून अधिसूचित आहे, आतापर्यंत येथून कोणतीही कुरिअर व कार्गो सेवा सुरू नाही. नाशिक परिसरात असलेल्या लोकांसाठी मोठ्या प्रमाणात रोजगाराची संधी उपलब्ध होईल, असे आयमा अध्यक्ष ललित बूब यांनी सांगितले.निफाड तालुक्यात होऊ घातलेला ड्रायपोर्ट कार्यान्वित करण्याच्या मार्गातील शासकीयसह सर्व अडथळे त्वरित दूर होण्याची गरज बैठकीत आवारे यांनी व्यक्त केली. निर्यातदारांसाठी समृद्धी महामार्ग व वाढवण बंदर गेमचेंजर ठरू शकेल, असा विश्वासही नहार यांनी व्यक्त केला.



### कस्टम कार्यालय २४ तास खुले हवे

निर्यातदारांचे आर्थिक नुकसान होऊ नये म्हणून कस्टमचे कार्यालय २४ तास सुरू ठेवण्याची मागणी कस्टम विभागाकडे करण्यात आली होती. पणु अजूनही ते कार्यालय मर्यादित कालावधीपुरते खुले राहत नाही. कार्यालय २४ तास सुरू करावे, अशी मागणी निमा इंटरनॅशनल बिझनेस समितीचे अध्यक्ष सी. एस. सिंग यांनी केली

# के के वाघ तंत्रनिकेतनतर्फे माजी विद्यार्थी मेळावा उत्साहात

**नाशिक : प्रतिनिधी**

के के वाघ शिक्षण संस्था संचलित के के वाघ तंत्रनिकेतन, नाशिक तर्फे नुकतेच माजी विद्यार्थी मेळाव्याचे आयोजन करण्यात आला. या मेळाव्यास गेल्या २५ वर्षांतील तीनशेहून अधिक माजी विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

प्राचार्य प्रा. पी टी कडवे यांनी सर्व माजी विद्यार्थ्यांचे स्वागत करत त्यांना संस्थेने आजवर केलेली प्रगती व राबविले जात असलेल्या उपक्रमांबद्दल माहिती दिली. निवडक माजी विद्यार्थ्यांनी महाविद्यालयीन जीवनातील जुन्या आठवणींना उजाळा देत मनोगत व्यक्त केले.

अध्यक्ष समीर वाघ, माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष अजिंक्य बाळासाहेब वाघ, सचिव प्रा. के एस बंदी, प्राचार्य प्रा. पी टी कडवे, प्रा. एम बी झाडे, प्रा. व्ही एस कलमाणी, प्रा. एस बी चांदवडकर व सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. वाय बी गायधनी यांनी केले. कार्यक्रम समन्वयक प्रा. एस के महाजन व प्रा. ए टी करंजकर यांनी कामकाज केले.

# सीतासरोवरात अज्ञात व्यक्तीचा मृतदेह

**नाशिक : प्रतिनिधी**

म्हसरूळ परिसरातील सीतासरोवरात अज्ञात व्यक्तीचा मृतदेह आढळल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. मृताच्या तोंडातून फेस आल्याचे आढळल्याने हा नैसर्गिक मृत्यू नसून घातपात असावा, असा अंदाज व्यक्त केला जात आहे.

पोलिसांना घटनेची माहिती मिळताच म्हसरूळ पोलिस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी मृतदेह ताब्यात घेऊन पंचनामा केला व शवविच्छेदनासाठी जिल्हा रुग्णालयात पाठवला आहे. पोलिसांना मृताची ओळख अद्याप पटलेली नाही. मृतदेहाच्या आसपास ओळख पटवण्यासाठी पोलिसांकडून परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्याचे काम सुरू आहे. दरम्यान, पोलिसांकडून मृतदेहाची ओळख पटवण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

शनिवारी (दि.३) रात्री पाच ते सहा जण सीतासरोवर परिसरात मद्यपान करताना दिसले होते. त्यानंतर काही वेळात गोंधळ झाला होता. यादरम्यान काहीतरी गंभीर प्रकार घडल्याची चर्चा परिसरात सुरू आहे. नागरिकांच्या म्हणण्यानुसार, मद्यधुंद अवस्थेत झालेल्या वादातून ही घटना घडली असण्याची शक्यता आहे.



### प्राचीन सीतासरोवराला नशेबाजांचे ग्रहण

म्हसरूळ परिसरातील या अतिप्राचीन सीतासरोवरास अनन्यसाधारण असे पौराणिक महत्त्व आहे. मात्र, या वास्तूला मद्यपी व नशेबाजांचे ग्रहण लागल्याचे दिसते. सीतासरोवर येथील सभामंडपाचा आडोसा घेत अनेक मद्यपी व नशेबाज सर्रास पावित्र्यहनन करताना दिसत आहेत. पूर्वी येणारे–जाणारे वाटसरू सीतासरोवरावर टवाळखोरांना टोकत असत. मात्र, आता सभामंडपामुळे असे टवाळखोर दिसत नाहीत.

### पोलिसांनी गस्त वाढवावी

या सरोवरावर महादेवाची पिंडी, मारुतीची पुरातन मूर्ती आहे. काही भक्त–भाविक याठिकाणी नित्य पूजेसाठी येतात. मात्र, या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या परिसरात विजेचे खांब, तसेच पथदीप वाढवून सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. रात्री गस्त वाढविण्याची मागणीदेखील केली आहे.

पोलिसांनी याबाबत कोणत्याही निष्कर्षापर्यंत पोहोचण्याआधी शवविच्छेदन अहवालाची प्रतीक्षा असल्याचे सांगितले. ही घटना घातपात आहे की अपघात, हे शवविच्छेदन अहवालानंतर स्पष्ट होईल. याबाबत म्हसरूळ पोलिस ठाणे तपास करत आहे.

# कसारा येथील हल्लाप्रकरणी नऊ जणांची निर्दोष मुक्तता

**शहापूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील कसारा येथील शिवाजीनगरमधील नागरी वस्तीमधील कुटुंबीयांवर २० ते २५ जणांनी अचानक लाकडी दांडके, लोखंडी सळया घेऊन दहा वर्षांपूर्वी हल्ला केला होता. या हल्ल्यात कुटुंबीयांतील महिलांना हल्लेखोरांकडून बेदम मारहाण झाली होती, अशी तक्रार कसारा पोलीस ठाण्यात पीडित महिलेकडून दाखल करण्यात आली होती. या प्रकरणात आरोपींविरुद्ध सबळ पुरावे उपलब्ध करून देण्यास तपास यंत्रणा कमी पडल्याने कल्याण जिल्हा व सत्र न्यायालयाच्या अतिरिक्त जिल्हा न्यायाधीश मंगला मोते यांनी नऊ आरोपींची सबळ पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता केली.

सुलोचना साधू जाखेरे (वय ६३), विकास साधू जाखेरे (३६), प्रकाश यशवंत भारमल (५४), महेस नामदेव गिलांडे (३९), अशोक यशवंत भारमल (४७), दिनकर साधू जाखेरे (४२), सीताराम काशीनाथ कोरडे (६८), कैलास गोविंद मराडे (४३), लिलाबाई यशवंत भारमल (८६) अशी निर्दोष सुटका झालेल्या आरोपींची नावे आहेत. हा खटला न्यायालयात चालू असतानाच्या काळात साधू संतू जाखेरे यांचे निधन झाले होते. जनाबाई जगन जगताप यांनी या हल्लाप्रकरणी कसारा पोलिस ठाण्यात सप्टेंबर २०१४ मध्ये तक्रार केली होती. पोलिसांनी गुन्हा दाखल करून आरोपींना अटक केली होती. कल्याण जिल्हा व सत्र न्यायालयात हा खटला मागील दहा वर्षांपासून सुरू होता. तक्रारदार महिला जनाबाई जगताप यांनी पोलिस ठाण्यातील तक्रारीत म्हटले होते, की सप्टेंबर २०१४ मध्ये आपण कसारा शिवाजीनगर भागात घरी असताना अचानक गावातील २० ते २५ जणांनी आपल्या घरात घुसून कुटुंबीयांवर हल्ला चढवला. हल्लेखोरांकडे सळया, दांडके होते. या मारहाणीत आम्ही घरातील आणि परिसरातील महिला जखमी झाल्या. या हाणामारीच्या वेळी आपल्या गळ्यातील सोनसाखळी चोरीला गेली. राणी जगताप यांना दगडाने मारहाण करण्यात आली.

कसारा पोलिसांनी दाखल गुन्ह्याप्रमाणे आरोपींना अटक करून तपास केला होता. याप्रकरणी कल्याण जिल्हा न्यायालयात हा खटला सुरू होता. न्यायालयाने या प्रकरणातील तपासात अनेक त्रुटी काढल्या. तीन साक्षीदारांच्या साक्षीत एकवाक्यता आढळून आली नाही. सोनसाखळी चोरीविषयीची साद्यंत माहिती तक्रारदार देऊ शकल्या नाहीत.उलट तपासणीवेळी तक्रारदार, साक्षीदार यांच्या माहितीत सातत्य आणि एकवाक्यता दिसली नाही. त्यामुळे आरोपींविरुद्ध सबळ पुरावा नसल्याने न्यायालयाने नऊ आरोपींची या हल्ला प्रकरणातून निर्दोष मुक्तता केली.

# त्र्यंबकेश्वर, विसापूर, मातोरीच्या तीन बैलजोड्यांची निवड जाहीर

**त्र्यंबकेश्वर : प्रतिनिधी**

श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर ते पंढरपूर पायी आषाढवारीसाठी १० जून २०२५ रोजी संत निवृत्तिनाथ महाराज पालखी प्रस्थान होत आहे. श्री संत निवृत्तिनाथ संजीवन समाधी मंदिर संस्थान विश्वस्त मंडळाने यंदा बैलजोडी निवड पारदर्शक प्रक्रिया राबवली. या स्पर्धेचा निकाल विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष ॲड. सोमनाथ घोटेकर यांनी सोमवारी (दि. ५) सायंकाळी जाहीर केला.

संत निवृत्तिनाथ मंदिरातून पालखी प्रस्थान होताना माजी नगराध्यक्ष सुनील अडसरे,अजय अडसरे यांची यंदाही मानाची बैलजोडी राहणार आहे. त्यानंतर पुढील प्रवासासाठी निवड करताना निरीक्षक, परीक्षक आणि विश्वस्त या सर्वांच्या समितीने तीन बैलजोड्या निवडलेल्या आहेत.

त्यात निवृत्ती दगू भुजाडे (विसापूर), सचिन सुधीर शिखरे (त्र्यंबकेश्वर), मातुलेश्वर भजनी मंडळ मातोरी या तीनजोड्या क्रमाने सेवा देतील, असे जाहीर केले आहे. ही निवडप्रक्रिया राबवण्यासाठी विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष ॲड. घोटेकर, श्रीपाद कुलकर्णी, पालखी सोहळाप्रमुख नवनाथ महाराज गांगुर्डे, माजी अध्यक्ष व विश्वस्त नीलेश गाढवे पाटील, हभप कांचनताई जगताप, नारायणबाबा मुठाळ, हभप माधवदास राठी, विश्वस्त मंडळ, संस्थानचे व्यवस्थापक गंगाराम झोले, संदीप मुळाणे, मनोज भांगरे यांनी परिश्रम घेतले.

पालखी प्रस्थान करताना असलेली मानाची जोडी माजी नगराध्यक्ष सुनील अडसरे यांची असते. यावर्षीची बैलजोडी खास देखणी मोठी खिल्लारी प्रकारातील आहे. याबाबत अजय अडसरे यांनी माहिती दिली.त्यांनी ही बैलजोडी जेऊर हायबती (ता. नेवासे) येथील कृष्णा मच्छिंद्र मस्के आणि संतोष बापूसाहेब मस्के यांच्याकडून मागवली आहे.



**त्र्यंबकेश्वर: माजी नगराध्यक्ष सुनील अडसरे, अजय अडसरे यांची मानाची बैलजोडी.**

**समता नागरी सहकारी पतसंस्था मर्या,कोपरगांव**

स्व.यशवंतराव चव्हाण,समता मार्ग,मेनरोड,खंदकनाला,कोपरगांव-४२३६०१

ता.कोपरगांव,जि.अहमदनगर-४२३६०१, संपर्क-(०२४२३)२२५५५७/५८

विश्वास + सुरक्षितता = समता

**नमुना झेड**

**(नियम १०७ पोट-नियम (११(ड-१))**

**स्थावर मालमत्तेचा ताबा घेण्याबाबतची नोटीस**

ज्याअर्थी खाली सही करणार वसुली अधिकारी **जे.एस.कदम** यांनी महाराष्ट्र संस्था नियम १९६१ अन्वये अनुक्रमे **दि.०८/०२/२०२५** रोजी मागणीची नोटीस खालील नमुद केलेल्या तपशिलामध्ये ऋणको यांना एकूण येणे असलेल्या थकबाकी रक्कम जमा करणेसाठी दिली होती.परंतु खालील नमुद ऋणको यांनी रक्कम भरणेसाठी कसुर केलेली आहे.

सदर नोटीस मिळाल्याच्या दिनांकापासून ऋणको याने रक्कम जमा करण्यास कसुर केली म्हणून,खाली सही कारणाऱ्याने **दि.२०/०३/२०२५** रोजी स्थावर जप्तीची नोटीस दिली असुन पुढे निर्दिष्ट केलेली मालमत्ता जप्त करण्यात आलेली आहे.

ऋणकोने रक्कम जमा करण्यास कसुर केल्यामुळे ऋणकोला याप्रमाणे नोटीस देण्यात येत आहे आणि सर्व नागरिकांना खाली निर्दिष्ट केलेल्या मालमत्तेचा खाली सही करणाऱ्याने त्याला महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ मधील नियम (नियम १०७ पोट-नियम (११(ड-१)अन्वये दिलेल्या अधिकारानुसार **दि.२६/०४/२०२५** रोजी दिवशी ताबा घेतला आहे.

विशेषकरून खाली नमुद ऋणकोला आणि सर्व नागरिकांना याव्दारे सावध करण्यात येत आहे की,मालमत्तेसंबंधी कोणताही व्यवहार करू नये आणि व्यवहार केल्यास कर्जदाराचे कर्जाची येणेबाकी रकमेस व त्यावरील व्याज याला अधीन रहावे लागेल.

**कर्जदार व स्थावर मालमत्तेचे वर्णन**

| नांव | थकबाकी रक्कम | स्थावर मिळकत |
|---|---|---|
| **श्री.विशाल उत्तम संगमनेरे**<br>**व्यवसाय पत्ता.** ३०१/३०१ हरी आंगण,ए विंग,स्वामी विवेकानंद नगर, आडकेनगरसमोर,जयभवानीनगर,ता.,जि.नाशिक ४२२१०५<br>**घरचा पत्ता.** ऐश्वर्या रो हाऊस नं.१/२,चेंबर नं.०१,ता.जि.नाशिक<br>**यांचे जामिनदार:-**<br>**१) सौ.सुनीता गुलाबराव पगार**<br>**घरचा पत्ता.** २०१,इंद्रप्रस्थ सोसायटी,त्रिवेणी पार्क,जेलरोड,नाशिक रोड,ता.जि.नाशिक<br>**२) श्री.राहुल लक्ष्मण बेरड**<br>**व्यवसाय पत्ता.** श्रीकृष्ण असोसिएट्स,फ्लॅट नं.१५,चंद्रमणी हौ.सो.,संत ज्ञानेश्वर नगर,जेलरोड,ता.जि.नाशिक<br>**घरचा पत्ता.** फ्लॅट नं.१५,चंद्रमणी हौसिंग सोसायटी,संत ज्ञानेश्वर नगर,जेलरोड, नाशिक रोड,नाशिक४२२१०१<br>**३) कोंडयाबाई उर्फ सुमन उत्तम संगमनेरे**<br>**रा.** ऐश्वर्या रो हाऊस नं.१/२,चेंबर नं.०१,नाशिक रोड,ता.जि.नाशिक४२२१०१<br>**४) श्री.राहुल गुलाबराव पगार**<br>**व्यवसाय पत्ता.** फ्लॅट नं.१०१,इंदिराप्रस्थ त्रिवेणी पार्क,शिवाजीनगर जेल रोड, नाशिक रोड,ता.जि.नाशिक<br>**घरचा पत्ता.** २०१,इंद्रप्रस्थ त्रिवेणी पार्क,जेलरोड मंजुळा मंगल कार्यालयजवळ, दसक,नाशिक रोड,ता.जि.नाशिक४२२१०१<br>**५) श्री.सुनील पोपटराव धोंगडे**<br>**व्यवसाय पत्ता.** ऐश्वर्या रो हाऊस नं.१/२,एन.टी.पी.एस कॉलनी,एकलहरे, नाशिक रोड,ता.जि.नाशिक<br>**घरचा पत्ता.** मंजुळा निवास,सप्तश्रुगी नगर-१,औरंगाबाद रोड,नांदुर, मांडसांगवी, नाशिक४२२००३<br>**६) श्री.चंद्रशेखर नारायण दंदणे**<br>**व्यवसाय पत्ता.** श्रध्दा रेस्टॉरंट अँड बार,दंदणे कॉम्पलेक्स,३रा मजला,सुभाष रोड, रेल्वे स्टेशनजवळ,नाशिक रोड,नाशिक<br>**घरचा पत्ता.** चंद्रनिल,लिंगायत कॉलनी,देवळाली गांव,नाशिक रोड, नाशिक | वसुली दाखला क्र.२३६३/२०२४-२५, दि.२३/१२/२०२४ रू.१,५९,७४,८८६/- + व्याज | तारण मिळकतीचे वर्णन- खालीलप्रमाणे तपशिल |

**तारण मिळकतीचे वर्णन:- अ)** मौजे **दसक** ,ता.**नाशिक**,जि.**नाशिक** येथील **सौ.सुनिता गुलाब पगार** यांची मालकीची मिळकत.

| स.नं. | प्लॉट नंबर | क्षेत्र.चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| ३१/१ब+२ब | १४ ब | २४४.५६ पैकी.१२२.२८चौ.मी | १८३.४२ |

येणेप्रमाणे मिळकतीवर बांधीव बंगले मिळकत क्षेत्र १७५०.००चौ.फुट म्हणजे १६२.६३चौ.मी.यांसी मॅन्युसिपल घर क्र.६२२/ए यांसी इंडेक्स ६२२०९१५८ यांसी वीज मीटर ग्राहक क्र.०४९०८४५५४०७२

**ब)** मौजे **पंचक**,ता.**नाशिक**,जि.**नाशिक** येथील महानगरपालिका हद्दीतील **श्री.राहुल लक्ष्मण बेरड** यांची मालकीची मिळकत.

| स.नं. | प्लॉट नंबर | क्षेत्र.चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| ४५/२/३ब पैकी | ०६ | २३०.८३ | ९९.२५ |

मिळकतीवर बांधलेल्या साईकृपा अपार्टमेंट मधील पहिल्या मजल्यावरील फ्लॅट नं.२,यांसी कारपेट एरिया ९०३चौ.फुट म्हणजेच बिल्टअप एरिया ११७५.००चौ.फुट (१०९.२०चौ.मी.)

**क)** मौजे **एकलहरे**,ता.**नाशिक**,जि.**नाशिक** येथील **कोंडयाबाई उर्फ सौ.सुमन लक्ष्मण संगमनेरे** यांची मालकीची मिळकत.

| स.नं. | क्षेत्र.हे.आर | आकार रु.पै. |
|---|---|---|
| ३२२ | ०.६२ | ३.०० |

**ड)** मौजे **एकलहरे**,ता.नाशिक,जि.**नाशिक**,येथील **सर्व्हे नंबर ३९९+४००+४०१+४०२** या बिनशेती मिळकतीवर मा.जिल्हाधिकारी साहेब नाशिक यांनी क्रमश:/ कक्ष३/ बिनशेती प्र.क्र.३४८/८४ दि.२५/११/१९८६ अन्वये बिनशेती मिळकतीच्या ले-आऊट मधील **प्लॉट क्र.६२** यांसी क्षेत्र **४१२-८७ चौ.मी.** श्री.विशाल उत्तम संगमनेरे यांची मिळकत.

**या एकत्रित प्लॉट नंबर ६२ प्लॉट मिळकतीवर बांधण्यात आलेल्या बिल्डींग ऐश्वर्या मधील खाली वर्णन केलेले पाच रो - हाऊस.**

१) **ऐश्वर्या रो-हाऊस क्रमांक १** यासी प्लॉटचे क्षेत्र ७०-४२ चौ.मी.म्हणजेच ७५८ चौ.फुट व त्यावरील बांधीव क्षेत्र ८४७-९८ चौ.मी.म्हणजेच ७८-७८ चौ.मी.कारपेट क्षेत्र ६९९ चौ.फुट म्हणजेच ६४-९३ चौ.मी.

२) **ऐश्वर्या रो-हाऊस क्रमांक २** यासी प्लॉटचे क्षेत्र ६६-६४ चौ.मी.म्हणजेच ७१७-३१ चौ.फुट व त्यावरील बांधीव क्षेत्र ८४७- ९८ चौ.मी.म्हणजेच ७८-७८ चौ.मी.कारपेट क्षेत्र ६९९ चौ.फुट म्हणजेच ६४-९३ चौ.मी.

३) **ऐश्वर्या रो-हाऊस क्रमांक ३** यासी प्लॉटचे क्षेत्र ४४-९५ चौ.मी.म्हणजेच ४८३-८४ चौ.फुट व त्यावरील बांधीव क्षेत्र ७७९-७४ चौ.मी.म्हणजेच ७२-४४ चौ.मी.कारपेट क्षेत्र ६०४-८२ चौ.फुट म्हणजेच ५६-१८ चौ.मी.

४) **ऐश्वर्या रो-हाऊस क्रमांक ४** यासी प्लॉटचे क्षेत्र ४४-९५ चौ.मी.म्हणजेच ४८३-८४ चौ.फुट व त्यावरील बांधीव क्षेत्र ७७९-७४ चौ.मी.म्हणजेच ७२-४४ चौ.मी.कारपेट क्षेत्र ६०४-८२ चौ.फुट म्हणजेच ५६-१८ चौ.मी.

५) **ऐश्वर्या रो-हाऊस क्रमांक ५** यासी प्लॉटचे क्षेत्र ६८-१५ चौ.मी.म्हणजेच ७३३-५६ चौ.फुट व त्यावरील बांधीव क्षेत्र ७७९-६५ चौ.मी.म्हणजेच ७४-२९ चौ.मी.कारपेट क्षेत्र ६१८-९६ चौ.फुट म्हणजेच ५७-५० चौ.मी.

**जे.एस.कदम**

**विशेष वसुली व विक्री अधिकारी**

**समता नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, कोपरगाव,मो.९३७१३३३५५६**

# कृषिमंत्र्यांच्या आदेशानंतरही जिल्हा बँकेची सक्तीने वसुली

**नाशिक : प्रतिनिधी**

राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या कर्जवसुलीला स्थगिती देण्याची सूचना केल्यानंतरही बँकेकडून सक्तीने वसुलीचे सत्र कायम असल्याची तक्रार करीत सोमवारी (दि.५) शेतकरी समन्वय समितीने सक्तीची वसुली थांबवून कर्जमाफीसाठी श्री काळाराम मंदिरात आंदोलन केले. श्रीरामाच्या नावाने केंद्रात व राज्यात निवडून आलेल्या सरकारला सुबुद्धी द्यावी, असे साकडे घालण्यात आले.

सीतानवमीच्या दिवशी शेतकरी समन्वय समितीचे भगवान बोराडे, ९३८ आदिवासी सहकारी संस्थेचे राज्य अध्यक्ष कैलास बोरसे, धनाजी अहिरे आदी शेतकरी काळाराम मंदिराच्या प्रवेशद्वाराजवळ जमले.

यावेळी जिल्हा बँकेची सक्तीची कर्जवसुली बंद करावी, शेतकऱ्यांना कर्जमुक्त करावे, अशा घोषणांनी काळाराम मंदिर परिसर दणाणून गेला. ५६ हजार शेतकऱ्यांतूऩ कर्ज वसुलीसाठी जिल्हा बँक सक्तीने वसुली करीत आहे. शेतकऱ्यांच्या सातबारा खाते उताऱ्यावर बँकेसह कार्यकारी सहकारी संस्थेची नावे लावली जात आहेत. अनेक शेतकऱ्यांच्या जमिनीवर नावे लावली गेली असून, १५ हजार शेतकऱ्यांची नावे लावण्याची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे. ही प्रक्रिया तातडीने थांबविण्याची मागणी समितीने निवेदनातून केली.मुळात ११ एप्रिल रोजी जिल्हाधिकारी कार्यालयातील बैठकीत जिल्हा बँकेच्या कर्ज वसुलीस कृषिमंत्री कोकाटे यांनी स्थगिती दिली होती. तरीही बँकेकडून सक्तीची कर्जवसुली सुरूच आहे. प्रसारमाध्यमात नावे देणे आणि शेतकऱ्यांच्या जमिनीचे लिलाव करणे, ही प्रक्रिया अजूनही थांबलेली नसल्याकडे पदाधिकाऱ्यांनी लक्ष वेधले.

शेतकरी समन्वय समितीचे आंदोलन



# राज्य नाट्य स्पर्धेचे पारितोषिक वितरण

**नाशिक : प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागातर्फे आयोजित ६३ व्या महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धा आणि २१ व्या राज्य बालनाट्य स्पर्धेच्या प्राथमिक फेरीतील विजेत्या कलाकार, तंत्रज्ञ व संस्थांचा विभागीय पारितोषिक वितरण सोहळा परशुराम साईखेडकर नाट्यगृह येथे झाला. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून अभिनेत्री विद्या करंजीकर, प्रकाश होळकर, नाट्य परिषदेचे सुनील ढगे, सांस्कृतिक विभागाचे वसावे, समन्वयक राजेश जाधव उपस्थित होते.

बालनाट्य स्पर्धेतील अभिनय गुणवत्ता प्रमाणपत्रे (नाशिक केंद्र), प्राजंल सोनवणे (हॅपी बर्थ डे), श्रद्धा शिंदे (मला उत्तर हवंय), सानुजा कुळकर्णी (अंगाई), प्राची वाघ (म्याडम), सई दळवी (सरणार कधी तम..), सौरभ क्षीरसागर (हॅपी बर्थ डे), चैतन्य गांगुर्डे (नको ना रे ब्रह्मा), दुर्गेश सोनवणे (आला रे या), वैष्णवी निमसे (विसर्जन), साईराग सरडे (तेरा मेरा सपना). (जळगाव केंद्र): त्रिशा पठाळे (चिंगी), पूर्वा जाधव (एआय), मृणाली भामरे (कस्तुरी), ध्रुवी कारळे( वडाळा ब्रिज), भाग्यश्री ओगले (सावली), पार्थ चौधरी (शोध अस्तित्वाचा), प्रभुदत्त दुसाने (दित्वार्या), पारस पाटील (माणसा सावध हो), चिन्मय पाटील (आम्ही ध्रुव उद्याचे), शिवम पानपाटील (शहीद).

हौशी मराठी नाट्य स्पर्धा (नाशिक केंद्र) - रोहिणी जोशी (आवर्तन-लोकहितवादी मंडळ), रियाराज (गौतमी-हस्तलेख्यम मॅन्यूस्क्रीप्ट इन्स्टिट्यूट), आर्या प्रशांत (ऐश्वर्य ब्यूटीपार्लर- भडक दरवाजा बहुद्देशीय सेवाभावी संस्था), दर्शना कर्हु (पूर्णविराम-अथर्व ड्रॅमॅटक्स), वेदिका अंभोरे (मी आणि माझी कला- एचपीटी महाविद्यालय), अपूर्व इंगळे (दिल्लीची किल्ली-कविवर्य नारायण सुर्वे वाचनालय), मिलिंद कुलकर्णी (आवर्तन- लोकहितवादी मंडळ), सचिन रहाणे (थर्टीथ अमेन्डमेन्ट- मायको एम्प्लॉइज फोरम), अभिषेक गायकवाड (स्पायडरमॅन- दीपक मंडळ सांस्कृतिक विभाग), भरत कुलकर्णी (त्यानं आईचं ऐकलं- अमृततुल्य जीवन बहुद्देशीय सामाजिक संस्था.

(जळगाव केंद्र) : नेहा पवार (मर्म नातं- नाट्यरंग बहुद्देशीय संस्था), तन्वी काटकर (खेळ- नूतन मराठा महाविद्यालय), अश्विनी बेलेकर (वाघमार्या जानकीराम-केसीई सोसायटीचे कान्ह ललित कला केंद्र), प्रणिता शिंपी (कोहम- समर्थ बहुद्देशीय संस्था), श्रीराम जोग (खेळ पुन्हा खेळू- नाट्य भारती, इंदोर), प्रीतिश पाटील (कोहम- समर्थ बहुद्देशीय संस्था, जवखेड), डॉ. मुकुंद करंबेळकर(रा+धा- रंगगंध कलासक्त न्यास). (अहिल्यानगर केंद्र): रेणुका ठोकळे (प्रियंका आणि दोन चोर- स्व. गिरिधरी लाला चौधरी संस्था), शुभदा पटवर्धन (मर्म- रंगमुद्रा युवा प्रतिष्ठान, वडगाव), पूनम कदम व नानाभाऊ मोरे (राजर्षी- संगम ग्रामविकास मंडळ), पल्लवी दिवटे (तो तिचा दादला आणि मधला- वात्सल्य प्रतिष्ठान, प्रदीप वाळके (आता कसं करू- नाट्य मल्हार प्रतिष्ठान), संजय लोळगे (झिम पोरी झिम- जय बजरंग युवा सांस्कृतिक, क्रीडा, शैक्षणिक मंडळ), अथर्व धर्माधिकारी (आता कसं करू- नाट्य मल्हार प्रतिष्ठान).

# अक्षत भांडारकर, सायुज्य चव्हाण यांची शतके

**नाशिक : प्रतिनिधी**

येथे होत असलेल्या महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या, राज्यस्तरीय १६ वर्षांखालील वयोगटातील आमंत्रितांच्या साखळी क्रिकेट स्पर्धेच्या दोन दिवसीय कसोटी सामन्यात नाशिकने चंद्रोस क्लब, पुणे पाठोपाठ पूर्व विभाग संघाविरुद्धही विजय मिळवला.

पूर्व विभाग संघाविरुद्ध दुसऱ्या सामन्यात कर्णधार अक्षत भांडारकर, सायुज्य चव्हाण, देवांश गवळी व प्रिन्स पटेलने विजयात मोठा वाटा उचलला.

क्रिकेट मैदानावर पहिल्या दिवशी प्रथम फलंदाजी करत नाशिकने पहिल्या डावात कर्णधार अक्षत भांडारकर १९२, सायुज्य चव्हाण नाबाद १०२ व श्रेयस हेकरे ६१ धावा यांच्या फलंदाजीच्या जोरावर पाच बाद ४५२ धावा फटकवल्या. नाशिकच्या गोलंदाजांनी पूर्व विभाग संघाला पहिल्या डावात सर्वबाद ८७ व फॉलोऑननंतर दुसऱ्या डावात सर्वबाद १०२ इतकीच मजल मारून देत एक डाव व २६३ धावांनी दणदणीत विजय मिळवला.

पान १ वरून....

## राज्याचा निकाल ९१.८८ टक्के

परीक्षेत ज्या विद्यार्थ्यांना अपेक्षित यश मिळाले नाही त्यांनी हताश न होता पुन्हा उमेदीने अभ्यासाला लागावे आणि यश संपादन करावे, असे आवाहन मंत्री भुसे यांनी केले आहे.नाशिक विभागाचा निकाल ९१.३१ टक्के लागला. विज्ञान शाखेचा निकाल सर्वाधिक ९७.३५ टक्के, तर वाणिज्य शाखेचा निकाल ९२.६८ टक्के आहे.कला शाखेचा निकाल ८०.५२ टक्के लागला. व्यावसायिक अभ्यासक्रमाचा ८३.२६, आयटीआय ८२.०३ टक्के निकाल लागला आहे. एकूण नऊ विभागीय मंडळांचा ९१.८८ टक्के निकाल लागला आहे.खासगी विद्यार्थी म्हणून नोंदणी केलेल्या ३६ हजार १३३ पैकी ३५ हजार ६९७ विद्यार्थी परीक्षेला बसले होते. त्यांपैकी २९ हजार ८९२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. उत्तीर्णतेची टक्केवारी ८३.७३ टक्के आहे.नऊ विभागीय मंडळांत सर्व शाखांमधून एकूण ४२ हजार ३८८ पुनर्परीक्षार्थी विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती.

**नऊ विभागीय मंडळांतील उत्तीर्णतेचे प्रमाण**

**कोकण विभाग अव्वल पुणे ९१.३२ टक्के निकाल**

मुले- ८८.१३, मुली- ९५.०५,**नागपूर ९०.५२ टक्के निकाल,** मुले- ८७.४१, मुली- ९३.७६ **छत्रपती संभाजीनगर ९२.२४,** मुंबई ९२.९३ टक्के निकाल, मुले- ९१.६०, मुली- ९४.३३**कोल्हापूर ९३.६४ निकाल** मुले- ९०.७१, मुली- ९६.९२, **अमरावती ९१.४३ टक्के निकाल** मुले-८८.९७, मुली-९४.२९ **नाशिक ९१.३१ टक्के निकाल-** मुले- ८९.४४, मुली- ९३.५१ **लातूर ८९.४६ टक्के निकाल** मुले- ९५.५०, मुली- ९३.६३ **कोकण ९६.७४ टक्के निकाल** मुले-९५.५०, मुली- ९८.०३ **एकूण उत्तीर्णतेचे प्रमाण** -मुले : ८९.५१, मुली- ९४.५८ टक्के

## रशियाचा भारताला पाठिंबा

दोनच दिवसांपूर्वी पाकिस्तानच्या पंतप्रधानांनी रशियाकडे मदतीची याचना केली होती. भारताने घेतलेल्या आक्रमक भूमिकेविरोधात पाकिस्तानला पाठिंबा द्यावा अशी मागणी त्यांनी पुतीन यांच्याकडे केली होती. पण रशियाने पाकिस्तानच्या मागणीला कोणतीही भीक घातली नाही. त्याउलट रशियाने भारताच्या भूमिकेला जाहीर पाठिंबा दिला आहे. त्यामुळे पाकिस्तानसमोरील अडचणीत वाढ होण्याची शक्यता आहे.

## एफआयआरची गरज नाही

न्यायालयानं दिलेल्या आदेशांना राज्य सरकारनं सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिलं. या एसएलपीवर सोमवारी न्यायमूर्ती बेला त्रिवेदी आणि न्यायमूर्ती प्रसन्न वराळे यांच्या खंडपीठापुढं सुनावणी झाली. राज्य सरकारनं दाखल केलेली एसएलपी स्वीकारत सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकारला मोठा दिलासा दिला. न्यायमूर्ती रेवती मोहिते-डेरे आणि न्यायमूर्ती डॉ नीला गोखले यांच्या खंडपीठासमोर यावर दाखल सुमोटो याचिकेवर सुनावणी सुरू आहे. एखाद्या आरोपीचा कोठडीत मृत्यू झाल्यास नेमकं काय करावं?, यासाठी सर्वोच्च न्यायालयानं मार्गदर्शकतत्त्वे जारी केलेली आहेत. अक्षय शिंदेचा एन्काउंटर झाल्यानंतर या मार्गदर्शकतत्त्वानुसार कार्यवाही झाली आहे. तरीही याप्रकरणी स्वतंत्र गुन्हा नोंदवण्याचे आदेश न्यायालयानं दिले. मुळात याप्रकरणात पोलिसांची भूमिकाच संशायस्पद आहे. हा एन्काउंटर बनावट असल्याच्या आरोपात तथ्य असल्याचा निष्कर्ष न्यायालयीन अहवालात नोंदवण्यात आल्याची दखल मुंबई उच्च न्यायालयानं घेतली आहे.

## भारत-पाक युद्धाचे ढग!

असणार आहे.

**१९७१ च्या युद्धाआधी मॉकड्रिल**

या आधी १९७१ च्या भारत-पाकिस्तान युद्धाच्या काळात अशा प्रकारचा मॉकड्रील करण्यात आला होता. त्यानंतर पहिल्यांदाच देशपातळीवर अशा व्यापक स्तरावर युद्धजन्य स्थितीचा सराव होणार आहे. पहलगाम हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर सोमवारी दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि संरक्षण खात्याचे सचिव राजेश कुमार सिंह यांची महत्त्वाची बैठक पार पडली. पंतप्रधान मोदी यांच्या सात लोककल्याण मार्ग या निवासस्थानी ही बैठक झाली. दोघांमध्ये पाऊण तास चर्चा झाली.

## त्रंबकेश्वरचा विकास आराखडा सादर

तयार करुन सादर करण्यात आला होता. या पार्श्वभूमीवर अहिल्यानगर येथे होणार्या सिंहस्थ कुंभमेळा शिखर समितीची बैठकीत त्र्यंबकेश्वरमध्ये करावयाच्या विकास कामांचा आराखड्याला मुर्त स्वरुप येण्याची शक्यता आहे. त्र्यंबकेश्वरसाठी प्रत्यक्षात ११०० कोटी रुपयांचा आराखडा तयार करण्यात आला होता. प्रधान सचिवांच्या बैठकीमध्ये त्यातील काही विकास कामांना तीर्थक्षेत्र विकास योजनेत समाविष्ट करण्याची सूचना देर्यात आली होती. त्यानुसार सुमारे ३०० कोटी रुपयांची विकास कामे तीर्थक्षेत्र विकास कामांमध्ये समाविष्ट करण्यात आली आहेत. त्यात प्रामुख्याने शहरातील अतिक्रमण, पार्किंग, पूजा साहित्य विकणार्यांचे पुनर्वसन, नवीन रस्ते, कुंडांची उभारणी, दर्शन मार्गाचा विकास, मंदिरांचा विकास, मंदिरांची डागडुजी, काही ठिकाणी मंदिरांचे नूतनीकरण या कामांना समावेष करण्यात आला आहे.शिखर समिती समोर राज्याचे प्रधान सचिव हा आराखडा सादर करणार असून, या बैठकीला जिल्हाधिकारी व विभागीय महसूल आयुक्त यांच्या सहभागा बाबतचा अद्याप स्पष्टता आलेला नाही.या बैठकीमुळे दर मंगळवारी होणारी संस्था आढावा बैठक आज स्थगित राहणार असल्याचे बोलले जात आहे

**रिंग रोडचा प्रस्ताव जुनाच**

माजी पालकमंत्री छगन भूजबळ यांनी व्यक्त केलेल्या नाराजीवर शहरपरिसरात चर्चा रंगली होती. याबाबत जिल्हाधिकार्यांना छेडले असताना रिंग रोडचा प्रस्ताव हा २०१५ च्या सिंहस्थ कुंभमेळा विकास कामांमध्ये समाविष्ट केलेला होता. त्या वेळेपेक्षा यंदाच्या सिंहस्थ कुंभमेळा कार्यकाळापर्यंत वाहतुकीमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. नाशिकमध्ये येणारे पर्यटक हे रेल्वे, रस्ते मार्गाने अथवा विमानात सेवेतून नाशकात दाखल होणार आहे. त्यामुळे या सर्व सेवांचा लागणारा प्रवासाचा वेळ कमी व्हावा, नागरिकांची अडचणी कमी व्हाव्यात, या दृष्टीने रिंग रोडचे निर्मितीची करावयाचीच आहे, सिंहस्थ कुंभमेळा सोडला तर इतर वेळेला देखील हा मार्ग नाशिकच्या विकासाच्या दृष्टीने महत्त्वाचा राहणार आहे त्यामुळे या रस्त्याचे बळकटीकरण करणे हे या सिंहस्थात हाती घेण्यात आले असले तरी प्रत्यक्षात हा रस्ता आधीपासूनच ठरलेला आहे त्याचा विकास हा दूरगामी पायद्याचा असल्याचे जिल्हाधिकार्यांनी सागितले.

**संतमहंतांची आज नाशिकला बैठक**

सिंहस्थ पार्श्वभूमीवर विविध विकास कामांच्या गतीत संतांचा सहभाग नसल्याने व आखाड्यांच्या जागेचा प्रश्न अद्याप निकाली न निघाल्याने त्याबाबत सविस्तर चर्चा करण्यासाठी नाशिक व त्र्यंबकेश्वरच्या विविध आखाड्याच्या महंतांची बैठकआज नाशिक येथे होणार आहे.


**जाहीर नोटीस** नि.क्र. ०६

दिवाणी व फौजदारी न्यायालय,नांदगाव ता.नांदगाव जि.नाशिक.
दिवाणी किरकोळ अर्ज - १८/२०२५
१) सौ.पार्वताबाई बाबूलाल जाधव -वय-६२ वर्ष २) सौ. विमलबाई संजय पवार वय-४७ वर्ष ३) सौ. वैशाली आप्पा चव्हाण वय-३७ वर्ष रा- सोनेवाडी, पो-नागद, ता-कन्नड, जि- संभाजीनगर ४) श्री. विठ्ठल हंसराज राठोड वय - ४३ वर्ष ५) श्री. प्रताप हंसराज राठोड वय-४० वर्ष ... अर्जदार

[illegible]

सही/- क.लिपिक सही/-सहाय्यक अधिक्षक दिवाणी व फौजदारी न्यायालय नांदगाव,जि.नाशिक

**जाहीर नोटीस** नि.क्र. ०६

दिवाणी व फौजदारी न्यायालय,नांदगाव ता.नांदगाव जि.नाशिक.

[illegible]

... प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत स्वतः किंवा अधिकृत प्रतिनिधी अथवा प्राधिकृत अधिकारी अथवा वकीलामार्फत आक्षेप नोंदवावा. मुदतीत कोणताही आक्षेप/हरकत प्राप्त न झाल्यास सदरहू न्यायालय सदरहू अर्जदाराचे मागणीप्रमाणे पुढील कायदेशीर कामकाज पूर्ण करून निर्णय देईल याची नोंद घ्यावी. ही जाहीर नोटीस. दि.१७/४/२०२५ रोजी मा.न्यायालयाचे आदेशावरून आमचे सही व न्यायालयाचे शिक्यानिशी प्रसिद्धीस दिली असे.

सही/- क.लिपिक सही/-सहाय्यक अधिक्षक दिवाणी व फौजदारी न्यायालय नांदगाव,जि.नाशिक

**ग्रामपंचायत सांजेगाव, ता. इगतपूरी, जि. नाशिक**

**निविदा सूचना**

ग्रामपंचायत सांजेगाव, ता. इगतपूरी, जि. नाशिक यांना ग्रामनिधी अंतर्गत खालील काम करावयाचे असून इच्छुक ठेकेदार (पुरवठादारांकडून-) मोहोरबंद निविदा मागविण्यात येत आहेत. कामाचे नाव- पशुवैद्यकीय दवाखान्यावर सोलर सिस्टीम बसविणे. इच्छुकांनी पुरवठादारांनी आपल्या मोहोरबंद निविदा दि. ६ ते ८ मे २०२५ पर्यंत ग्रामपंचायत कार्यालयात कार्यालयीन वेळेत सादर कराव्यात. सर्व निविदा दि. ९ मे २०२५ पर्यंत रोजी उघडण्यात येतील कुठलीही अथवा सर्व निविदा स्विकारणे अथवा नाकारणेचा अधिकार ग्रामपंचायत स्वतःकडे राखून ठेवीत आहे.

**सही /- सरपंच** **सही/- ग्रामसेवक**

**ग्रामपंचायत कार्यालय, हिंगणवाडी, ता.नांदगाव, जि.नाशिक**

**जाहीर निविदा**

ग्रामपंचायत कार्यालय, हिंगणवाडी, ता. नांदगाव, जि.नाशिक

ग्रामपंचायत हिंगणवाडी, ता. नांदगाव, जि.नाशिक खालील कामाचे नोंदणी कृत ठेकेदार, पुरवठादार यांच्याकडून सीलबंद बी-१ निविदा दरपत्रके मागविण्यात येत आहे. वित्त आयोग व इतर निधी अंतर्गत (सन २०२५-२६) ०५/०४/२०२५ ते ०९/०४/२०२५ या कालमर्यादेत

**अटी व शर्ती-**१. निविदा फी व माहितीपत्रक कार्यालयात ग्रामपंचायत कार्यालयीन वेळेत मिळतील. २. सीलबंद निविदा ग्रामपंचायत कार्यालय येथे उघडण्यात येईल. ४. निविदा स्वीकारण्यात अथवा नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहेत.

**सही/- ग्रामसेवक** **सही/-सरपंच**

**ग्रा.पं.हिंगणवाडी, ता.नांदगाव,जि.नाशिक**

**ग्रामपंचायत कार्यालय टिटवे, ता. दिंडोरी जि. नाशिक प्रथम प्रसिद्धी**

**जाहीर ई निविदा सूचना २०२५-२६**

ग्रामपंचायत कार्यालय टिटवे ता. दिंडोरी जि. नाशिक येथे, १५ वा वित्त आयोग, पेसा निधी व ग्रामनिधी योजनेंतर्गत कामे करायचे असून सदर कामांची ई-निविदा मागविण्यात येत आहे व विविध विकास निधी योजनेंतर्गत करावयाच्या ग्रामपंचायत अंतर्गत कामांकरिता साहित्य पुरवठाकामी कामांची ई-निविदा मागविण्यात येत आहे. सदर ई- निविदा महाराष्ट्र शासनाच्या https://mahatenders.gov.in या वेबसाईटवरून दिनांक ०५/०५/२०२५ पासून ते १२/०५/२०२५ पर्यंत खरेदी व दाखल करता येतील ई- निविदा संबंधीची सविस्तर माहिती, अटी व शर्ती सदर संकेतस्थळावर पाहण्यासाठी उपलब्ध आहेत. निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे याबाबतचे अंतिम अधिकार ग्रामपंचायत कार्यालय टिटवे, ता. दिंडोरी, जि. नाशिक यांच्याकडे राखून ठेवण्यात आले आहेत.

**ग्रामपंचायत अधिकारी** **सरपंच**

**ग्रामपंचायत कार्यालय टिटवे, ता. दिंडोरी, जि. नाशिक**

**ग्रामपंचायत कार्यालय, विल्होळी ता. जि. नाशिक**

**जाहीर ई-निविदा सूचना क्र. ०१/२०२५-२६ (प्रथम प्रसारण)**

सरपंच, ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत विल्होळी ता. जि. नाशिक येथे विविध विकास कामांसाठी महाराष्ट्र शासनाच्या योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत पुरवठादार यांच्याकडून साहित्यासाठी ई-निविदा २ लिफाफा पद्धतीने मागविण्यात येत आहे. सदर ई- निविदा शासनाचा www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावरून दि. ०५/०५/२०२५ ते १२/०५/२०२५ पर्यंत खरेदी व दाखल करता येईल. इ निविदा संबंधीची सविस्तर माहिती अटी व शर्ती सदर संकेतस्थळावर पाहण्यासाठी उपलब्ध आहेत.

**ग्रामपंचायत अधिकारी** **सरपंच**

**ग्रामपंचायत विल्होळी ता. जि. नाशिक**

**टायटल व्हेरीफिकेशन नोटीस**

तमाम लोकांना सदर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

मौजे तुकडी जिल्हा नाशिक तालुका दिंडोरी पैकी **मौजे कोकणगांव बुद्रुक** या गावाचे शिवारातील शेतमिळकत यांसी **सर्व्हे नंबर/गट नंबर-२५२ क्षेत्र ०० हे. ६२ आर.** मिळकत **बंडू गोविंद पागे** यांचे स्वकष्टार्जीत मालकीचे व प्रत्यक्ष कब्जे वहीवाटीतील व उपभोगातील मिळकत असून इतर कोणत्याही प्रकारचा बोजारहीत असल्याचे खात्रीशीरपणे सांगून आमचे पक्षकाराशी व्यवहार करून इसाराची रक्कम स्विकारली आहे. सदर मिळकतीचा मालकी हक्क तपासणीकामी प्रस्तुत नोटीस प्रसिद्ध केलेली आहे.

सबब सदर शेतमिळकत मिळकतीवर कोणाचाही गहाण, दान, लिज, लिन, अन्नवस्त्र, बक्षीसपत्र, मृत्यूपत्र, मुखत्यारपत्र, साठेखत, खरेदीखत, कब्जा, जामीनकी वारस, करार, मदार कोर्टवाद अगर बँक पतसंस्था, खासगी वित्तीय संस्थेचे कर्ज असा कोणताही हक्क अधिकार, हितसंबंध अगर बोजा असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून **पंधरा (१५)** दिवसांचे आत साक्षांकित कागदपत्रांसह खालील पत्त्यावर लेखी हरकत नोंदवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे, असे समजून ना हरकत दाखला देण्यात येईल. मुदतीनंतर येणाऱ्या व परस्पर वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या अगर कागदपत्राशिवाय आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. कळावे, ही जाहीर नोटीस **दि. ०६/०५/२०२५**

**ॲडव्होकेट/- श्री. विक्रमसिंह राजेंद्र राजे**
**पत्ता-चेंबर्स नं. २१, मार्केट कमिटी कॉम्प्लेक्स निळवंडीरोड, बाजार समिती दिंडोरी, ता. दिंडोरी, जि. नाशिक**

**श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे नागरी सहकारी पतसंस्था मर्या. डुबेरे, शाखा-डुबेरे,ता.सिन्नर, जि.नाशिक.**

**- गहाण घेणेच्या मिळकतीबाबत जाहीर नोटीस -**

तमाम लोकांस या गहाण घ्यावयाच्या मिळकतीच्या संबंधाने जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,
१) मिळकतीचे वर्णन - मौजे सोनांबे, ता. सिन्नर, जि. नाशिक येथील शेतजमिन मिळकत गट नं. ४९४ यांसी क्षेत्र हे. ४-७४ आर. पो. ख. हे. ०-३६ आर. आकार रु. ९-६९पैसे. यापैकी श्री. रामचंद्र कुंडलीक बोडके यांचे मालकीचे खाते नं. १२२० वरील क्षेत्र हे. २-३७ आर. ...

[illegible]

विचार केला जाणार नाही याची संबंधितांनी नोंद घ्यावी, सदर जाहीर नोटीस कर्जदार यांचे सांगणेवरुन प्रसिध्द करणेकामी पतसंस्थेमार्फत जाहीर नोटीस.
स्थळ सिन्नर, दिनांक ०६/०५/२०२५ **आमचे मार्फत प्रसिध्द**

**श्री. प्रदिप लक्ष्मण वारुंगसे (ॲडव्होकेट )**
**ऑफीस-लहामगे बिल्डींग, सिन्नर न्यायालयासमोर, सिन्नर, जि. नाशिक.**

**श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे नागरी सहकारी पतसंस्था मर्या. डुबेरे, शाखा-सिन्नर,ता.सिन्नर, जि.नाशिक.**

**- गहाण घेणेच्या मिळकतीबाबत जाहीर नोटीस -**

[illegible]

स्थळ सिन्नर, दिनांक ०६/०५/२०२५ **आमचे मार्फत प्रसिध्द**

**श्री. प्रदिप लक्ष्मण वारुंगसे (ॲडव्होकेट)**
**ऑफीस-लहामगे बिल्डींग, सिन्नर न्यायालयासमोर, सिन्नर, जि. नाशिक.**

**टायटल व्हेरिफीकेशनकामी जाहीर नोटीस**

तमाम लोकांस कळविण्यात येते की,

मिळकतीचे वर्णन : तुकडी जिल्हा नाशिक, पोट तुकडी तालुका इगतपुरी, पैकी मौजे खंबाळे येथील, शेत भूमापन/गट क्र ४७० यांसी क्षेत्र हे १.२४.०० आर.चौ. मी. अधिक पो.ख. हे ०.०४.०० आर असे एकूण क्षेत्र १.२८.०० आर यांसी आकार रु. १.०० पैसे या पैकी लिहून देणार यांचे मालकीचे क्षेत्र हे. १.०८.०० आर चौ.मी. यांसी आकार रु. ०.९० पैसे. यांसी चतुःसिमा गाव नकाशा प्रमाणे. वर कलम १ यात वर्णन केलेल्या मिळकती हि श्री. रमेश जवाहरलाल गोठी व सौ. चंदनबाला सुरेश गोठी यांचे मालकीची मिळकत असुन मिळकतीचे रेकॉर्ड ऑफ राइटसला सदरहू मालकांचे नाव मालक व कब्जेदार सदरी दाखल आहेत. सबब सदरहू मिळकतीचे टायटल व्हेरिफीकेशन करणेकामी प्रस्तुतची जाहीर नोटीस प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सबब कलम १ मध्ये वर्णन केलेल्या मिळकतीबाबत कुठलाही कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध अथवा कोणताही दस्तऐवज अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा बोजा असल्यास अथवा कोर्ट वाद असल्यास त्यांनी सदरहू नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ०७ दिवसांचे आत खालील पत्यावर समक्ष येऊन पुराव्यासह लेखी हरकती नोंदवाव्यात. तोंडी किंवा परस्पर वर्तमान पत्रात प्रसिध्द झालेल्या नोटीस हरकतीची दखल घेतली जाणार नाही. तसेच मुदतीत हरकत न आल्यास मिळकत ही निर्वेध आहे असे समजण्यात येईल व मिळकत टायटल क्लिअर आहे असे सर्टीफिकेट देण्यात येईल. व मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत मिळकतीवर व मिळकत मालकांवर बंधनकारक राहणार नाही. सदरची नोटीस मिळकत मालकाचे सांगणेवरुन प्रसिध्द करण्यात येत आहे. याची नोंद घ्यावी.

कळावे ही टायटल व्हेरिफिकेशनकामी जाहीर नोटीस
नाशिक तारीख:- ०४.०५.२०२५

आमचे मार्फत प्रसिध्द

**सही/- भावना दिनेश गटणे, ॲडव्होकेट**
**कार्यालय - सदनिका क्र. १, माधव प्रसाद, अपार्टमेंट पि अँड टी कॉलनी नाशिक ४२२००५ मो. ७६६६९४२४३७**



**गांवकरी Classified** जाहिरातीसाठी संपर्क 9404434628

**पाहिजेत**

राणेनगर येथील टू व्हीलर व फोर व्हीलर शोरूमसाठी CRM/ DBM रिसेप्शनिस्ट, मेकॅनिक, सर्विस ॲडव्हायझर, स्पेअर पार्ट मॅनेजर, टेलीकॉलर, हाऊस कीपिंग, ऑफिस बॉय, वॉशिंग बॉय, अकाउंटंट त्वरित पाहिजेत. **संपर्क : ९२७२०९१४२५**

---

दुकान कामासाठी मुले व मुली पाहिजे.श्री गिफ्ट ॲण्ड टॉईज, कानडे मारुती लेन, नाशिक. **संपर्क- ९८९००१३१३६**

---

गंगापूररोड, पाईपलाईनरोडयेथील कन्स्ट्रक्शन कंपनीला कार्यालयीन कामकाजाकरिता १० वी-१२ वी पास-नापास ऑफिसबॉय पाहिजे. **८२३७३११२११**

---

नामांकित बँकेच्या वसुलीसाठी डीआरए परीक्षा पास झालेले महिला व पुरुष उमेदवार पाहिजेत: संपर्क ९९६०३५०००५

**पाहिजेत**

पंचवटीत कापड दुकानाकरिता पंचवटीतील स्थानिक मुले पाहिजेत. सकाळी ९ ते १. ७५८८६६४४९१

---

कोहिनूर ज्वेलर्स, पखाल रोड, अशोका मार्ग, १२ वी पास मुलगी पाहिजे. **संपर्क-९८६०१३६५३६**

**महिला व पुरूष पाहिजेत**

Draftsman part time आटोक्याड नॉलेज-१, ऑफिस कामासाठी-४, कोर्ट व महापालिकेच्या कामासाठी-२, ड्रायव्हर-१, वकील पार्ट टाइम-१, अकाऊंटंट पार्ट टाइम-१, भटजी देवपूजा करण्यासाठी-१ **एन.एन. असोसिएटस्**, तिसरा मजला, आय. डी.बी.आय. बँकेच्यावर, साठे बाग, एम.जी.रोड, नाशिक. वेळ- सकाळी १२ ते ५.
संपर्क- 8668862801

**Name change**

I, SONALI JANARDAN KADAM DECLARE THAT MY SON NAME CHANGED VIBHAV JANADHAN KADAM (OLD NAME) TO **VIBHAV JANARDAN KADAM AS** PER VIDE AFFIDAVIT NO. 35AB146592 & GAZETTE NO. (MR-24244464)

---

I, Deveshree Nandlal Shingvi, residing at Ghoti, Tal- Igatpuri, Dist- Nashik, hereby declare that my name has been mentioned as "Deveshree Nandlal Shingvi" in my old passport. However, in some documents, my name appears as **"Devshree Nandkumar Shingavi"**.

I confirm that both names refer to the same person, i.e., myself. Henceforth, I shall be known as Devshree Nandkumar Shingavi for all official and legal purposes.



**जाहीर सूचनेस उत्तर**

तमाम लोकांस विशेषतः **श्री. अरविंद रतिलाल पटेल,** ३०१, जानकी प्लाझा, द्वारका सर्कल, पुणे रोड, नाशिक ४२२ ०११, यांनी ॲड. अजय जाधव यांचेमार्फत दि. ०२/०५/२०२५ ही तारीख असलेल्या **दैनिक देशदूत**मध्ये जाहीर सूचना या मथळयाखाली प्रसिध्द केलेल्या नोटीसीस या प्रतिउत्तराद्वारे कळविण्यात येते की, आमचे पक्षकार **श्री. पिलु प्राणजीवन अमिन**, रा. देवळाली कॅम्प, ता. जि. नाशिक, यांचे मालकीची **भगुर** येथील **भुमापन क्र. ३०२/१** या मिळकतीबाबत तुम्ही घेतलेली हरकत ही पुर्णपणे बेकायदेशीर आहे. सदर नोटीसमध्ये लिहिल्यानुसार कोणतीही कागदपत्रे तुम्ही आमचे ऑफिसमध्ये आणून आमची खात्री पटवून दिलेली नाही. याकरीता तुम्ही पाठविलेल्या **ॲड. अजय जाधव** यांचे मार्फतचे नोटीस उत्तर व दैनिक देशदुतमध्ये प्रसिध्द केलेल्या जाहीर सूचना विचारात घेता येणार नाही. हे जाहीर सूचनेस उत्तर.

**नाशिक, दिनांक : ०५/०५/२०२५**

**सही/-ॲड. श्रीमती के. टी. मंत्री**
**ऑफिस : ४१५/१, मारूती चेंबर्स, जिल्हा न्यायालय, नाशिक ४२२ ००२.**

**टायटल व्हेरिफिकेशन नोटीस**

तमाम लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णनः-** जिल्हा - नाशिक, तालुका- निफाड, **पैकी मौजे-टाकळी विंचूर** ग्रामपंचायत हद्दीतील व शिवारातील बिनशेती मिळकत **गट नं. २६७/प्लॉट/११** यांसी **क्षेत्र १.४९८० आर.चौ.मी, यांसी आकार १४ रु ९८ पैसे**, या मिळकतीच्या चतु:सिमा मंजुर लेआउट नकाशाप्रमाणे.

वर नमूद केलेली मिळकत ही **श्री. अतुल रमेश देसाई** यांचे स्वतंत्र मालकीची व प्रत्यक्ष कब्जेवहीवाटीतील अशी आहे. त्यांनी सदर मिळकत ही निर्वेध व बिनबोजाची असल्याचे खात्रीने सांगून त्यांनी आमचे पक्षकार यांचेशी व्यवहार निश्चित केलेला आहे. त्याकामी सदर मिळकतीचे मालकी हक्कासंबंधाने खात्री करावयाची असलेने आमचे पक्षकार यांनी आमचेकडे टायटल सर्टिफिकेटची मागणी केलेली आहे. त्यामुळे सदर मिळकतीचे टायटल व्हेरीफिकेशनकामी सदरची नोटीस प्रसिद्ध केलेली आहे. सबब सदर मिळकतीवर कोणाचेही, कोणत्याही स्वरूपाचे हक्क व अधिकार अथवा कोणतेही दस्त, गहाण, दान, अन्नवस्त्र, मृत्युपत्र, बक्षिसपत्र, करारनामा, ज.मु, स्पे. मु, विसारपावती, साठेखत, खरेदीखत, जामीन, जप्ती, कोर्ट वाद अगर तत्सम स्वरूपाचा बोजा अगर हक्क अथवा हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आत आमचे खालील पत्त्यावर मुळ कागदपत्रासह समक्ष हजर राहुन लेखी स्वरूपात मुदतीत नोंदवावी, मुदतीनंतर व परस्पर वर्तमानपत्रात घेतलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. अथवा त्या हरकती आमचे पक्षकारावर व मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही. मुदतीनंतर वरील मिळकत निर्वेध व बिनबोजाची आहे, असे समजून टायटल व्हेरीफिकेशन सर्टिफिकेट दिले जाईल. कळावे. ही नोटीस

**दिनांक:०४/०५/२०२५**

**आमचे पक्षकार**
**आमचे मार्फत प्रसिद्ध**

**श्री. दिलीप शंकर शिंदे (ॲडव्होकेट)**
**२१७ न्यायालय आवार, निफाड, ता. निफाड, जि. नाशिक मो.नं-९४२३०७८०२४**

**टायटल व्हेरिफिकेशन जाहीर नोटीस**

तमाम लोकांस कळविण्यात येते की, **मिळकतीचे वर्णनः** तुकडी जिल्हा परिषद नाशिक पोट तुकडी तालुका पंचायत समिती दिंडोरी पैकी स्वतंत्र ग्रामपंचायत **मौजे-पिंपळगाव धुम** या गांवचे शिवारातील शेती जमीन मिळकत **गट नं. ३४८/२ यांसी क्षेत्र ०२ हे. ४० आर** यांसी **आकार रु.०२.४५ पैसे** यापैकी स्वतंत्र **क्षेत्र ०१ हे.६० आर** यांसी **आकार रू.१.६२ पैसे** चतु:सिमा गावनकाशाप्रमाणे.

वर उल्लेख केलेली मिळकत **श्री.दत्तात्रय पंढरीनाथ लहितकर,जगन पंढरीनाथ लहितकर**, रा.मु.पिंपळगाव धुम, पो.वणी खुर्द, ता.दिंडोरी, जि.नाशिक यांचे मालकी हक्काची, कब्जेवहिवाटीत अशी आहे. सदरील मिळकतीवर नळवाडी विविध कार्यकारी सोसायटी तसेच वणी कसबे आदि.सोसायटी यांचे कर्ज/बोझे व्यतिरिक्त सदरील मिळकत निर्वेध व बिनबोजाची आहे, असे सांगून सदर मिळकतीचे टायटल व्हेरिफिकेशनची मागणी केली आहे. त्यामुळे मिळकत निर्वेध व बिनबोजाची असलेबाबत खात्री करण्यासाठी सदरची नोटीस प्रसिध्द केली आहे. सबब उपरोक्त मिळकतीमध्ये कोणाचाही कोणतेही स्वरुपाचा हक्क, अधिकार जसे गहाण, दान, लीन, लीज, अनवस्त्र, जप्ती, जामिनकी, कोर्टवाद इ.स्वरुपाचा हितसंबंध असल्यास अगर मिळकतीबाबत कुठल्याही स्वरुपाचा वाद असल्यास संबंधीतांनी कागदोपत्री पुरावेनिशी नोटीस प्रसिध्द झालेपासून ०५ **(पाच)** दिवसांचे आत आमचे कार्यालयात लेखी हरकती नोंदवाव्यात, सदरच्या मुदतीत हरकत न आल्यास मिळकतीबाबत टायटल व्हेरिफिकेशनचा दाखला देण्यात येईल. मुदतीनंतर अथवा दैनिक वर्तमानपत्रात परस्पर प्रसिध्द होणाऱ्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत. कळावे. ही जाहीर नोटीस.

**दि:०५/०५/२०२५** **मिळकत मालक -जगन पंढरीनाथ लहितकर**
**आमचे मार्फत प्रसिध्द**

**ॲड.संतोष जनक जाधव (बी.एस.एल.एलएल.बी)**
**ऑफिस-ॲडव्होकेट चेंबर्स, मार्केट यार्ड गाळा नं. २६,२७ निळवंडी रोड, दिंडोरी, ता. दिंडोरी, जि.नाशिक**

गांवकरी



## महत्त्वाचे

### रविशंकर मार्गावर महिलेला लुटले; दोन अज्ञातांविरोधात गुन्हा दाखल

**सिडको :** रविशंकर मार्ग, आरण्येश्वर मंदिराजवळील रस्त्यावर सोमवारी सायंकाळी एका महिलेच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र दुचाकीवरून आलेल्या दोघा अज्ञात व्यक्तींनी खेचून लंपास केल्याची घटना घडली. याप्रकरणी उपनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत थोडक्यात माहीती अशी की, फिर्यादी रागिणी रवींद्र पाटील (वय ५३, रा. रविशंकर मार्ग, नाशिक) या आपल्या सुनेसोबत दळण घेऊन घरी परतत असताना सायंकाळी साडेसहा वाजेच्या सुमारास आरण्येश्वर मंदिराजवळील रस्त्यावर त्यांच्या पाठीमागून काळ्या रंगाच्या मोटारसायकलवरून आलेल्या दोघा अज्ञात व्यक्तींनी जवळ येऊन गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र जबरदस्तीने खेचून घेतले आणि वडाळा गावाच्या दिशेने भरधाव वेगात पलायन केले. या प्रकारामुळे परिसरात काही काळ खळबळ उडाली. फिर्यादी रागिणी पाटील यांनी तातडीने उपनगर पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला. उपनगर पोलीस तपास करत आहेत.

### गळफास घेत एकाची आत्महत्या

**सिडको :** पती-पत्नीमध्ये झालेल्या कौटुंबिक वादातून अंबड औद्योगिक वसाहतीतील चुंचाळे येथील घरकुल याठिकाणी राहणाऱ्या एका ३२



वर्षीय युवकाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याचा प्रकार घडला. बादल गायकवाड असे आत्महत्या केलेल्या युवकाचे नाव आहे. बादल गायकवाड हा अंबड येथील एका वजन काट्यावर हमालीकाम करत होता. सकाळी बारा वाजेच्या सुमारास त्याच्या पत्नीसोबत वाद झाल्याने बादल याने स्वतः गळफास लावून घेत आत्महत्या केली. त्याला जिल्हा रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. दरम्यान, याप्रकरणी चुंचाळे एमआयडीसी पोलीस चौकीत नोंद करण्यात आली आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक मनोहर कारंडे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. मयत बादल गायकवाड यांच्या पश्चात पत्नी, आई, भाऊ, दोन मुली, मुलगा असा परिवार आहे.

### घरासमोरून पार्क केलेल्या बुलेटची चोरी

**सिडको :** उपनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील दादासाहेब फाळके कॉलनी येथे घरासमोर पार्क केलेली एक रॉयल इनफिल्ड बुलेट मोटारसायकल चोरट्याने चोरून नेल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी उपनगर पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मयूर प्रतापराव तुरकणे (वय ३२, रा. दादासाहेब फाळके कॉलनी, नाशिक रोड) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार त्यांच्या घरासमोर पार्क केलेली काळ्या रंगाची रॉयल इनफिल्ड बुलेट (क्र. एमएच १५ ईवाय ६२८३) ही मोटारसायकल कोणीतरी अज्ञात चोरट्याने त्यांच्या संमतीशिवाय आणि लबाडीच्या इराद्याने चोरून नेली. या प्रकरणी गुन्हा नोंदवण्यात आला असून पुढील तपास उपनगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र सपकाळे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

### खूनप्रकरणी आणखी एक आरोपी अटकेत

**नाशिकरोड :** बोधलेनगरमागे असलेल्या आंबेडकरवाडी परिसरात उमेश भगवान जाधव आणि प्रशांत भगवान जाधव या दोन सख्ख्या भावांचा कोयत्याने निर्घृण खून केल्याच्या प्रकरणात उपनगर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला होता. या दुहेरी खुनाच्या प्रकरणात आतापर्यंत आठ आरोपींना अटक करण्यात आली असून आणखी एका फरार आरोपीला ठाण्यातून अटक करण्यात आली आहे. सदर गंभीर गुन्ह्याचा तपास सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे), नाशिक शहर हे करत असून, फरार आरोपीच्या शोधासाठी पोलीस आयुक्त संदीप कर्णीक, पोलीस उपयुक्त प्रशांत बच्छाव, सहाय्यक पोलीस आयुक्त संदीप मिटके यांच्या आदेशावरून गुंडा विरोधी पथकाला पाठवण्यात आले होते. ही कामगिरी पोलीस आयुक्त संदीप कर्णीक, पोलीस उपयुक्त प्रशांत बच्छाव, सहाय्यक पोलीस आयुक्त संदीप मिटके यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. यामध्ये सहा. पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर मोहिते, मलंग गुंजाळ, विजय सूर्यवंशी, प्रदीप ठाकरे, अक्षय गांगुर्डे, राजेश राठोड, कल्पेश जाधव, प्रवीण चव्हाण, अशोक आघाव यांनी संयुक्तरीत्या कामगिरी पार पाडली.

### मखमलाबाद विद्यालयात महाराष्ट्र दिन

**नाशिक :** मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या मखमलाबाद येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज विद्यालयात महाराष्ट्र दिन व कामगार दिन अनोख्या पद्धतीने साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी मविप्र संचालक रमेश पिंगळे होते. यावेळी सेवानिवृत्त तहसिलदार उदय मोरे, सेवानिवृत्त एसीपी राष्ट्रपती पदक सन्मानीत नंदकिशोर मोरे, सेवानिवृत्त क्रीडा शिक्षक विलास केशवराव मोरे या सर्व मोरे बंधुंतर्फे त्यांची आई कै.वत्सलाबाई केशवराव मोरे यांच्या स्मरणार्थ विद्यालयास साऊंड सिस्टीमसाठी २५ हजार रु.देणगी देण्यात आली. विद्यालयाच्या उपप्राचार्या विमल रायते यांनी सार्वजनिक वाचनालयासाठी पाच हजार रुपये देणगी वाचनालयाचे अध्यक्ष रामदास पिंगळे यांच्याकडे सुपूर्द केली.

# शांतीनगरची शांतता धोक्यात; युवकांचा भाईगिरीकडे कल

**पंचवटी : सुनील बुनगे**

**गेले काही दिवसांपासून मखमलाबाद रोडवरील शांतीनगर परिसरात चेनस्नॅचिंग, हाणामाऱ्या, भाईगिरी यामुळे शांतीनगरची शांतता धोक्यात आली आहे. परिसरातील युवक भाईगिरीकडे वळले आहेत. भविष्यात येणाऱ्या काळात या भागात टोळीयुद्धाचा भडकादेखील उडण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे आता पोलीस यंत्रणेनेदेखील याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे.**



पूर्वीचे मखमलाबाद गाव आता एक छोटे महानगरच झाले आहे. दिवसेदिवस या भागाची लोकसंख्या देखील वाढत चालली आहे. गाव सुद्धा आता गाव राहिले नसून गावात देखील जुन्या मोठ्या घराच्या जागांवर इमारती उभ्या राहिल्या आहेत. तर आजही गावात ग्रामविकास मंडळ कार्यरत आहे.

गावातील मंडळी आजूबाजूला विखुरली गेली असून बाहेरून आलेल्या लोकांनी गावचा परिसर गाव ओढला गेला आहे. पूर्वी किमान मोठ्या मंडळींचा आदर्श युक्त दरारा होता. परंतु आजच्या घडीला कोणीही कुणाला जुमानत नसल्याचे चित्र देखील बघायला मिळत आहे. याच मखमलाबाद गावातून अनेक उच्च पदापर्यंत अधिकारी पोहोचले आहेत. गावातील शेकडो युवक पोलीस दलातील शहर आणि ग्रामीण विभागात कार्यरत आहेत. पूर्वीची गावाची लोकसंख्या आणि आताची लोकसंख्या यात मोठी तफावत झाली आहे. जिल्ह्यासह राज्यातील विविध भागातून येणाऱ्या नोकरदार, व्यवसायांची संख्या लक्षणीय झाली आहे. एकेकाळी शहरातील शांत म्हणून समजले जाणारे मखमलाबाद गावचा परिसर मात्र आता धोक्याची घंटा बनू पहात आहे.

पंचवटी विभागात पूर्वी एकच पंचवटी पोलीस ठाणे होते. परंतु पंचवटी परिसराची लोकसंख्या वाढल्याने आडगाव, म्हसरूळ पोलिस ठाण्यांची निर्मिती झाली. लोकसंख्येच्या तुलनेत तिन्ही पोलिस ठाण्यांमध्ये कर्मचारी संख्या देखील कमी पडत असल्याचे दिसून येते. त्याचप्रमाणे म्हसरूळ, आडगाव परिसर मोठ्या प्रमाणात वाढला गेला आहे. हे गावदेखील महानगर म्हणून अस्तित्वात येताना दिसू लागले आहे. मखमलाबाद परिसराच्या हद्दीतील चाणक्यपुरी, स्वामी विवेकानंद नगर याभागात देखील यापूर्वी अनेकदा हाणामाऱ्या, गंभीर दुखापत अशा प्रकारचे गुन्हे घडले आहेत. स्वामी विवेकानंद परिसरात अजूनही काही जणांकडून दहशत माजविण्याचा प्रयत्न केला जात असून महिनाभरापूर्वी याच भागात तलवारी काढून हाणामाऱ्या करण्याचा प्रकार घडला होता. आपले वर्चस्व सिद्ध करण्याच्या प्रयत्नात अनेक युवक गुन्हेगारीकडे वळले आहेत. त्यातच शांतीनगर भागात मोठ्या प्रमाणात गुन्हेगारी, भाईगिरी वाढली आहे. या भागात भाजीबाजार, चायनिज गाड्या, इतर लहान-मोठे व्यवसाय करणारे व्यावसायिक दहशतीखाली वावरत आहेत. उगाच वाद नको म्हणून कोणीही तक्रार करण्यासाठी पुढे धजावत नाही. त्यातच भाईगिरी करणाऱ्यांकडून आता लहान-मोठ्या व्यावसायिकांकडून तर 'हप्तावसुली' सारखे प्रकार घडत आहेत. या व्यावसायिकांना तोंड दाबून बुक्क्याचा मार सहन करावा लागत आहे. त्यामुळे एकेकाळी शांत असलेला शांतीनगरचा परिसर आता धोकेदायक बनला आहे. या भागातील शांतता धोक्यात आली आहे.

#### भाईगिरीकडे वाढला कल

शांतीनगर भागात काही स्थानिक तर बाहेरून आलेले युवक गुन्हेगारीकडे वळताना दिसून येत आहेत. किरकोळ वाद झाले तरी हत्यार काढून हाणामाऱ्या तसेच लहान मोठ्या हातगाड्यांवर जाऊन दादागिरी करणे, हप्ता वसुली असे प्रकार गेल्या काही दिवसांत वाढले आहेत. दि.३ रोजी एका जणावर पाच ते सहा जणांच्या टोळक्याकडून अल्पवयीन युवकावर हल्ला झाल्याची घटना घडली. यात काही गावातील युवक असून शांतीनगर भागातील शंभू,भोलासारख्या इतर भाईंवर कडक कारवाई करण्याची गरज आहे.

#### पोलिसांसमोर भाईगिरी मोडीत काढण्याचे आव्हान

पंधरा ते वीस दिवसांपूर्वी नुकताच पदभार घेतलेले वरिष्ठ पोलिस निरीक्षक अंकुश चिंतामण यांच्या समोर आता मखमलाबाद परिसरातील शांती नगर, स्वामी विवेकानंद नगर आदी भागात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेली भाईगिरी मोडीत काढण्याचे आवाहन समोर उभे राहिले आहे. मखमलाबाद गावाचे नाव जिल्ह्यात आदर्श गाव म्हणून परिचित आहे. परंतु गेल्या काही दिवसांपासून नव्याने विकसित झालेल्या कॉलनी परिसरात वाढलेली गुंडगिरी, शाळेच्या परिसरात वावरणारे टवाळखोर यांच्यामुळे हे गांव नेहमी चर्चेत येऊ लागले आहे. त्यामुळे आता नव्याने आलेल्या अधिकाऱ्यांना मात्र गुन्हेगारी प्रवृत्तीच्या भाईगिरीवर 'अंकुश' ठेवावा लागणार आहे.

## फर्निचर खरेदी करताना दुकानात विसरलेली एक लाखाची बॅग चोरीला

### अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

शिंगाडा तलाव परिसरातील स्टार लाइन फर्निचर दुकानात फर्निचर खरेदीसाठी आलेल्या ग्राहकाची एक लाख रुपयांची बॅग चोरीला गेल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी अज्ञात चोरट्याविरोधात मुंबई नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी जनार्दन हरी खोटरे (वय ४० वर्षे, रा. महात्मानगर, पारीजातनगर, नाशिक) हे त्यांची पत्नी ज्योती खोटरे व मित्र महेंद्र देवचंद महाले यांच्यासह 'स्टार लाइन फर्निचर' या दुकानात फर्निचर खरेदीसाठी गेले होते. त्यांनी दुकानात सुमारे ३० हजार रुपये देऊन खरेदी केली. याचवेळी त्यांच्याकडील गुलाबी रंगाची बॅग, ज्यामध्ये एक लाख रुपयांची रोकड होती ती दुकानात विसरली गेली. बॅग हरवल्याचे लक्षात आल्यावर दुकानात शोध घेण्यात आला, मात्र, बॅग मिळून आली नाही. कोणीतरी अज्ञात चोरट्याने बॅग चोरून नेल्याचे स्पष्ट झाले आहे. या घटनेनंतर जनार्दन खोटरे यांनी मुंबई नाका पोलीस ठाण्यात अज्ञात इसमाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलिस नाईक जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

## वडाळागावातील खंडोबा चौकात किराणा दुकानदारावर कोयत्याने हल्ला

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

वडाळागाव येथील खंडोबा चौक परिसरात एका किराणा दुकानदारावर सात जणांच्या टोळीने कोयत्याने हल्ला करून ठार मारण्याचा प्रयत्न केल्याची गंभीर घटना घडली. या प्रकरणी इंदिरानगर पोलीस ठाण्यात गंभीर गुन्ह्यांची नोंद करण्यात आली आहे

आलम मकसूद खान (वय ३०, रा. खंडोबा चौक, वडाळागाव) असे हल्ल्यात जखमी झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. फिर्यादी आलम खान यांच्या म्हणण्यानुसार आरोपी तौसिफ, जावेद बाबा, सोनू व चार ते पाच अनोळखी इसम यांनी मोटारसायकलवर येत त्यांना दुकानाबाहेर बोलावले. त्यानंतर आरोपींपैकी एकाने कोयत्याने त्यांच्या अंगावर वार करत त्यांना ठार मारण्याचा प्रयत्न केला. या हल्ल्यात आलम खान थोडक्यात बचावले असून, त्यांनी तत्काळ इंदिरानगर पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दाखल केली. या तक्रारीवरून इंदिरानगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक अंकोलीकर यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.



## रिक्षा चोरी प्रकरणातील दोन सराईत गुन्हेगार गजाआड; एक लाख ३५ हजारांची रिक्षा जप्त

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

भद्रकाली पोलीस ठाणे हद्दीतील मोदकेश्वर मंदिराजवळून चोरलेल्या रिक्षा प्रकरणाचा छडा लावत गुन्हेशाखा युनिट-२ च्या पथकाने दोन सराईत गुन्हेगारांना मालेगाव येथून अटक केली आहे. त्यांच्याकडून एक लाख ३५ हजार रुपये किमतीची बजाज कंपनीची रिक्षा हस्तगत करण्यात आली आहे.

गुप्त बातमीदाराकडून मिळालेल्या माहितीनुसार, मालेगावमधील रमजानपुरा भागात दोन संशयित चोरीची रिक्षा लपवून ठेवत असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार सना गॅरेज परिसरात सापळा रचून आरोपी अजीजोद्दीन रहमान मोहमद अकिल (२४) व मुस्ताक शहा शिराज शहा (२०) यांना ताब्यात घेण्यात आले. चौकशीत त्यांनी नाशिकमधून दहा महिन्यांपूर्वी रिक्षा चोरल्याची कबुली दिली.

त्याच्या सांगण्यानुसार, अजून एक रिक्षा त्यांनी भद्रकाली परिसरातून चोरल्याचे निष्पन्न झाले. ती रिक्षा मालेगाव येथील अल कबीर इंग्लिश मिडीयम शाळेजवळ सापडली व ती देखील जप्त करण्यात आली.याप्रकरणी भद्रकाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल असून आरोपींना पुढील कारवाईसाठी पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. नाशिक पोलीस आयुक्त संदीप कर्णिक, गुन्हे शाखेचे उपायुक्त प्रशांत बच्छाव आणि सहाय्यक आयुक्त संदीप मिटके यांच्या मार्गदर्शनाखाली ही कामगिरी करण्यात आली. सहायक पोलिस निरीक्षक हेमंत तोडकर यांच्या नेतृत्वाखाली मुक्तारखान पठाण, गुलाब सोनार, अतुल पाटील, वाल्मीक चव्हाण, मनोज परदेशी यांच्यासह पथकाने ही कारवाई केली.

## दीपालीनगरमध्ये जबरी चोरीची घटना

### दुचाकीवरील दोघांकडून ४५ हजारांचे मंगळसूत्र लंपास

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

दीपालीनगर भागात एका गृहिणीच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र दुचाकीस्वार दोन अनोळखी चोरट्यांनी जबरीने खेचून लंपास केल्याची घटना रविवारी संध्याकाळी घडली. याप्रकरणी मुंबई नाका पोलीस ठाण्यात जबरी चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी संजीवनी संतोष सोनसकर (वय ४९, रा. विनयनगर, नाशिक) या दि. ४ मे २०२५ रोजी सायंकाळी साडेसहाच्या सुमारास दीपालीनगर येथील सिद्धिविनायक मंदिराजवळून उजव्या बाजूच्या गल्लीतून जात असताना ही घटना घडली. त्या वेळी काळ्या रंगाच्या पल्सर दुचाकीवर आलेल्या दोन अनोळखी इसमांनी त्यांच्या गळ्यातील अंदाजे दहा ग्रॅम वजनाचे, सुमारे ४५ हजार रुपये किंमतीचे सोन्याचे मंगळसूत्र जबरदस्तीने खेचून पळ काढला.

या घटनेनंतर घाबरलेल्या संजीवनी सोनसकर यांनी तत्काळ मुनाका पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली. त्यांच्या तक्रारीवरून मुंबई नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मुंबई नाका पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संतोष नरुटे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि एस. शिरसाठ आणि पोउनि एम.एल. शेख यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू आहे. दरम्यान, शहरात दिवसाढवळ्या चोरीच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. पोलिसांनी गस्त वाढवण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

## आदर्श इंग्लिश मीडियम स्कूलच्या विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती परीक्षेत यश

**नाशिक :** शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये झालेल्या इयत्ता पाचवी व आठवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेत सटाणा आदर्श इंग्लिश मीडीयम स्कूलने याहीवर्षी यशाची परंपरा कायम ठेवली. शिष्यवृत्ती परीक्षेत इयत्ता ५ वीतील स्वामिनी गौरव खैरनार (५६.३४%) व आराध्या हेमंत भामरे (४६.३०%) या विद्यार्थ्यांनी यश मिळविले. तर आठवीतील रिचा धनंजय जाधव (५१.३५%), सारंगी मनोहर भदाणे (५०.६७%), पुष्कर पंडित ठोके (४९.३२%), जान्हवी भानुदास काकूळते (४५.९४%) समर्थ सतीश रौंदळ (४३.२४ %) या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले. सर्व यशस्वी विद्यार्थी, त्यांचे पालक व मार्गदर्शक शिक्षक विनय सोनवणे व सारिका कदम यांचे मविप्रचे सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे, चिटणीस दिलीप दळवी यांनी अभिनंदन केले.

## पैशाचा पाऊस नाही पडला, पैशासाठी मंत्रिकालाच नडला!

### नांदगाव तालुक्यातील घटना

**मनमाड : प्रतिनिधी**

पैशांचा पाऊस पाडतो असे सांगून काही रक्कम घेतली. पाऊस पाडण्यासाठी स्मशानभूमीत पूजा देखील मांडली. बराच वेळ तंत्र मंत्र करून देखील पैशाचा पाऊस न पडल्याने आपली फसवणूक झाली असल्याचे लक्षात येताच मांत्रिकाचेच अपहरण करत तब्बल ४५ लाख रुपये खंडणी मागणाऱ्या दोघांना नांदगाव पोलिसांनी मोठ्या शिताफीने अटक करत मांत्रिकाची सुटका केली.यातील आणखी संशयिताचा पोलिस शोध घेत आहे

पैशाचा पाऊस पाडतो असा बनाव करून गुन्हेगारी स्वरूपाच्या जयेश दत्तात्रय शिंदे (२८, रा. सैनिक कॉलनी, चाळीसगाव) श्रावण पुंडलिक बागोरे (रा. स्वामी विवेकानंदनगर, नांदगाव), जनार्दन ऊर्फ राजू बाळू आवारे, (रा. मुंबई) आणि सोनू (रा. मुंबई, पूर्ण नाव गाव माहीत नाही) यांनी चाळीसगाव येथील कथित मांत्रिक गणेश ताराचंद राठोड (रा. वाघले) याला नांदगाव येथे आणले. त्यास ठराविक रक्कम देत पैशांचा पाऊस पाडण्यासाठी सांगितले. मांत्रिकाने देखील चौघांना नांदगाव येथील स्मशानभूमीत पैशांचा पाऊस पाडण्याचे आमिष दाखवत स्मशानभूमीत पूजा मांडली. राठोड याने बराच वेळ मंत्र-तंत्र जप केले. परंतु पाऊस काही पडलाच नाही. आपली फसवणूक झाल्याचे या चौघांच्या लक्षात आले. त्यांनी आपले पैसे परत मागितले. परंतु मांत्रिकाने पैसे परत केले नाहीत. या चौघांनी पैशांसाठी राठोड याचे अपहरण करीत त्यांच्या मुलाकडे ४५ लाखांची मागणी केली.

मांत्रिकाला मारहाण करण्याचा व्हिडीओदेखील मुलाच्या व्हॉट्सॲपला पाठवत पैसे घेऊन नांदगावला येण्यास सांगितले. पैसे देणे शक्य नसल्याने कथित मांत्रिक राठोड याच्या मुलाने जळगाव पोलिसांकडे धाव घेतली. जळगाव स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी तातडीने तपासाची चक्रे फिरवली. नांदगाव पोलिसांची मदत घेतली.व मोबाईल लोकेशन वरून त्यांना मांडवड परिसरातील एका शेतातून अटक करण्यात आली यातील चार पैकी दोन जण कारसह शेतात लपले होते तर दोघे जण मांत्रिकाला घेऊन जंगलात गेले असताना सापळा रचून अटक केली.

## फूड फॉरेस्टमधून साकारली सेंद्रिय शेती

### वसंत व्याख्यानमाला: समीर व सचिन अधिकारी यांची यशोगाथा

**नाशिक : प्रतिनिधी**

दिवसेंदिवस वाढत चालणारे विविध आजार हे मुख्यतः पिकांवर तसेच अन्नधान्यावर, भाज्यांवर फवारल्या रासायनिक खतांपासून निर्माण होत असतात. मुंबईसारख्या महानगरामधून सुखी जीवन सोडून नैसर्गिक शेतीची कास धरून फूड फॉरेस्ट निर्माण करणारे समीर व सचिन या जुळ्या भावंडांनी शहापूर येथील सेंद्रिय शेतीची यशोगाथा नाशिककरांनी अनुभवली.

गोदा घाटावरील देव मामलेदार यशवंत महाराज पटांगणावर सुरू असलेल्या वसंत व्याख्यानमालेच्या पाचव्या दिवशीच्या सोमवारी (ता.५) स्व.शांताराम पाटील गडाख स्मृती व्याख्यानात मोहाकडून मोहरानाकडे या विषयावर समीर व सचिन अधिकारी या जुळ्या भावंडांनी मुंबई महानगरातले सुखी जीवन सोडून नैसर्गिक शेती कशी



विकसित केली याची सविस्तर माहिती दिली. आपल्या लहान मुलीची सकस आहाराअभावी खुंटलेली उंची एवढ्या एका घडलेल्या प्रकारावरून सेंद्रिय शेतीकडे वळलेल्या समीर आणि सचिन या भावंडांनी आपल्या वडिलोपार्जित असलेल्या शेतीत सुमारे चार हजार खाद्य वनस्पतीची लागवड केली तसेच ८० प्रकारच्या रानभाज्या तिथे निर्माण केल्या मुंबई शहराच्या तसेच देशभरातील विविध भागांमध्ये शहापूर मधील त्यांच्या या मोहरानातील आंबे पाठवले जातात. या ठिकाणी केवळ शेतीच नसून एक उत्कृष्ट पर्यावरण तसेच ॲग्रो टुरिझम विकसित झालेले आहे असेही अधिकारी बंधूंनी यावेळी सांगितले.

व्याख्यानमालीच्या प्रारंभी स्व. शांताराम पाटील यांच्या जीवनावर आधारित चित्रफीत दाखवण्यात आली. तसेच प्रमुख मान्यवरांचे उपस्थितीत शांताराम पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. समीर व सचिन या बंधूंचा सत्कार किशोर अहिरे यांनी केला तसेच किरण चव्हाण यांचा सत्कार डॉ. कृष्णा शहाणे यांनी केला हेमंत देवरे यांनी जयंत पाटील यांचा सत्कार केला.

नाशिक पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता सोनल शहाणे यांचा सत्कार कार्याध्यक्ष संगीता बाफणा यांनी केला.

राज्याचे माजी सांस्कृतिक सचिव अजय आंबेकर यांचा सत्कार गणेश भोरे यांनी केला. प्रमुख मान्यवरांचे स्वागत व आभार व्याख्यानमालेचे अध्यक्ष श्रीकांत बेणी यांनी केले. अधिकारी बंधूंच्या व्याख्यानानंतर रेखा महाजन, संजय किल्लेदार प्रस्तुत कवितेचे झाले गाणे हा कार्यक्रम सादर झाला.

#### आजचे व्याख्यान

स्व. ॲड. द. तु.जायभावे स्मृतिव्याख्यान

१) चकोर बाविस्कर, न्यायाधीश, मुंबई

२) सरगम म्युझिक अकादमी प्रस्तुत नंदकुमार देशपांडे निर्मित गर्जतो मराठी (मराठमोळी गाणी)

## रामदास स्वामी हनुमानाचे अवतार, स्थापत्यशास्त्राचे जनक : प्राचार्य तरटे



**नाशिक :** रामदास स्वामी हनुमानाचे अवतार तसेच स्थापत्यशास्त्राचे जनक होते, असे प्राचार्य अतुलशास्त्री तरटे म्हणाले.

प्रौढ मित्रमंडळाच्या वसंत व्याख्यानमालेचे दुसरे पुष्प गुंफताना प्रमुख वक्ते म्हणून अतुलशास्त्री तरटे यांनी गुंफले. ते म्हणाले की, समर्थ रामदासांनी १,१०० मठ बांधले होते, ज्यात योगासनांचे प्रशिक्षण दिले जात होते. देशकार्यासाठी त्यांनी हे कार्य केले. धर्मकार्य आणि धर्मरक्षण करण्यासाठी व निःष्काम कर्मयोग करून त्यांनी जीवन अर्पण केले. वेनास्वामी मठ त्यांनी उभा केला. हिंदवी स्वराज्याच्या कार्यात त्यांनी असंख्य वीर, कल्याणस्वामींसारखे शिष्य त्यांनी प्रशिक्षण देऊन देशाला पुरविले. योगशक्तीने त्यांनी देह ठेवला. प्रमुख पाहुणे तरटे यांचे स्वागत व सत्कार अध्यक्ष डॉ. शरद पाटील यांनी करून प्रौढ मंडळाचा अहवाल सांगितला. पाहुण्यांचा परिचय सचिव सुरेश कादी यांनी केला. सूत्रसंचालन चंद्रकला जोशी यांनी केले.आभार प्रदर्शन अनुराधा अमृतकर यांनी केले. या कार्यक्रमात शंखनाद मंदाकिनी येवले यांनी केला.

## किशोर बळींनी प्रेक्षकांना केले अंतर्मुख

**नाशिकरोड : वार्ताहर**

अतिशयोक्ती, विसंगती, अपेक्षाभंग व आपल्या अवतीभोवती घडणाऱ्या गोष्टीतून, प्रसंगातून विनोदाची निर्मिती होते असे सांगतानाच ग्रामीण भागातील अनेक गोष्टी, शेती, शिवार, जंगल आणि शाळा यातील विनोदाचे वेगेवगळे किस्से किशोर बळी यांनी सांगून रसिकांना हसवत श्रोत्यांच्या डोळ्यात झणझणीत अंजन घालून प्रबोधनही केले.

नाशिक रोड-देवळाली व्यापारी सहकारी बँकेच्या वसंत व्याख्यानमालेत गझलकार किशोर बळी यांनी 'हास्यबली डॉट कॉम' या विषयावर तिसरे पुष्प गुंफले. पंडित भीमराव पांचाळे यांचे सोबत गझल मैफिलीचे सुत्रसंचालन करणारे अकोला येथील गझलकार किशोर बळी यांनी आपल्या भाषणाची सुरुवातच गझल गावून केली. ती लगबग भल्या पहाटे, ते सडा सारवण नाही. देखणी इमारत आहे पण समोर अंगणच नाही यातुन ग्रामीण आणि शहरी भागातील विरोधाभास त्यांनी दाखविला. सर्वत्र लागु झालेल्या नवीन शैक्षणिक धोरणामुळे शिक्षक मुलांना कायद्याने मारू शकत नाही. मुले मात्र शिक्षकांना सहज मारतात. हा शैक्षणिक क्षेत्रातील पूर्वीचा आणि आताचा विरोधाभासही त्यांनी हसत हसत श्रोत्यांना अंतर्मुख करायला लावला. त्यामुळे पूर्वीच्या शिक्षकांनी केलेल्या शिक्षेचे विविध प्रकार आता लुप्त होत आहे असेही त्यांनी अनेक विनोदातुन सांगितले. प्रेम ही बस आहे, तर लग्न हे विमान आहे. बसमधून वाटेल तेव्हा आपण उतरू शकतो. मात्र, विमानातून मनात आले तेव्हा उतरू शकत नाही असे सांगत त्यांनी लग्न ही अशी जखम आहे की ज्यामध्ये लग्नापूर्वीच हळद लावली जाते असे हास्य विनोदाचे वास्तव किस्से सांगितले.

**नाशिकरोड वसंत व्याख्यानमाला**

## महत्त्वाचे

### जिजामाता गर्ल्सचा ९३ टक्के निकाल

**सटाणा :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा मंडळातर्फे झालेल्या एच.एस.सी परीक्षेत जिजामाता गर्ल्स हायस्कूल ज्युनिअर कॉलेजच्या २०७ विद्यार्थिनी प्रविष्ट झालेल्या होत्या. त्यापैकी १९४ विद्यार्थिनी उत्तीर्ण झाल्या.महाविद्यालयाचा ९३.७३ टक्के निकाल लागला. त्यात माधवी राजेंद्र शिंदे (७९.८३ टक्के) प्रथम, यामिनी महेंद्र निकम (७७) द्वितीय, पायल मच्छिंद्र गवळी (७६.३३)तृतीय, नूतन प्रकाश सोनवणे (७४.८३), भारती छोटू माळचे (७४.८३)संयुक्त चौथा व कल्याणी कैलास गवळी (७३.३३) पाचव्या क्रमांकाने उत्तीर्ण झाली. यशस्वी विद्यार्थिनींचे मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे, चिटणीस दिलीप दळवी, महिला संचालिका शालनताई सोनवणे, तालुका संचालक डॉ. प्रसाद सोनवणे, स्कूल कमिटी अध्यक्ष बी.एस. सूर्यवंशी, प्राचार्या संगीता सोनवणे यांनी अभिनंदन केले.

### दिंडोरी जनता शाळेत वैष्णवी खांदवे प्रथम

**दिंडोरी :** येथील जनता इंग्लिश स्कुल व उच्च माध्यमिक विद्यालयाचा




बारावीचा निकाल ९८ टक्के लागला. विज्ञान शाखेत ३१५ पैकी ३१५ विद्यार्थी उत्तीर्ण झाल्याने १०० टक्के निकाल जाहीर झाला. वाणिज्य शाखेत (९८ टक्के) २७७ पैकी २७२ विद्यार्थी, कला शाखेत (९५ टक्के) १८४ पैकी १७५ विद्यार्थी, व्यवसाय अभ्यासक्रमात (९० टक्के) ४१ पैकी ३७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. विद्यालयात वैष्णवी निवृत्ती खांदवे हिने वाणिज्य शाखेत ८४.५० टक्के (५०७ गुण) मिळवून प्रथम क्रमांक पटकावला.अन्य गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये द्वितीय निकिता शरद कोरडे(८३.८३), तृतीय ऋतुजा वैतुकू थेटे(८२.१७ टक्के), चौथा क्रमांक प्रांजल प्रशांत वडजे (८१.१७ वाणिज्य शाखा), तर पाचवा नंदू गोतिराम बोरस्ते (८० विज्ञान शाखा) आला.

### खेडलेझुंगे महाविद्यालयात मुलींची बाजी

**निफाड :** मविप्र संचलित खेडलेझुंगे येथील योगीराज परमपूज्य तुकारामबाबा ज्युनिअर कॉलेजचा निकाल १०० टक्के लागला असून, यंदाही उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम ठेवली. विशेष म्हणजे पहिल्या पाचमध्ये सर्व मुलींचाच समावेश आहे. महाविद्यालयात सानिया फिरोज शाह ८१.३३ गुण मिळवून प्रथम, सृष्टी बाळासाहेब घुमरे (७७.५०) द्वितीय,शीतल नानासाहेब वर्पे (७७.३३) तृतीय, प्राची शांताराम साबळे (७६.८३) चौथी, तर वैष्णवी ज्ञानेश्वर गवळी (७५.८३) पाचवी आली. यशस्वी विद्यार्थ्यांना प्राचार्य एस. एन. कोटकर, प्रा.के. एस. केदार, प्रा.आर. बी. चित्ते, प्रा.व्ही. एस. आघाव, प्रा.एस. जी. वैद्य यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल मविप्र समाज संस्थेचे सरचिटणीस ॲड नितीन ठाकरे, निफाड तालुका संचालक शिवाजी गडाख, उच्च माध्यमिक व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सोमनाथ गोरडे, माध्यमिक व्यवस्थापन समिती अध्यक्ष दिलीप घोटेकर, शालेय समितीचे सदस्य व संस्थेचे ज्येष्ठ सभासद शिवनाथ सदाफळ, कैलास साबळे, प्राचार्य शिवाजी कोटकर, पर्यवेक्षक चव्हाण आदींनी अभिनंदन केले.

### 'वर्धमान'ची निकालाची परंपरा कायम

**मालेगाव :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण



मंडळाच्या इयत्ता १२ वीच्या परीक्षेचा निकाल सोमवारी (दि. ५) ऑनलाईन जाहीर झाला. या निकालात दरवर्षीप्रमाणे यंदा देखील शहरातील वर्धमान शिक्षण संस्था संचलित वर्धमान उच्च माध्यमिक विद्यालयाने विज्ञान शाखेत शंभर टक्के निकालाची परंपरा कायम राखली आहे. यासह वाणिज्य शाखेचा निकाल ९८.३१ टक्के तर कला शाखेचा निकाल ८३.०० टक्के इतका लागला आहे. यंदाच्या बारावीच्या परीक्षेत विज्ञान शाखा : - प्रथम हर्षदा मंडळ (८५.३३टक्के ), द्वितीय कोमल पाटील ( ८४.५० टक्के), तृतीय रितू जाधव (८४.१७ टक्के) यांनी पटकावला. वाणिज्य शाखा:- प्रथम हर्ष शाह (८८.८३ टक्के), द्वितीय खुशी सोनग्रा (८४.६७ टक्के ), तृतीय रिया बागडे (८४.३३ टक्के ) यांनी पटकावला. तर कला शाखा :- प्रथम चेतना अग्निहोत्री (७८.१७ टक्के), द्वितीय तनुजा चौधरी (७३.०० टक्के), तृतीय क्रमांक आचल माळी (७०.३३ टक्के ) यांनी मिळवला आहे. यशस्वी विद्यार्थ्यांना प्राचार्य मंगेश सूर्यवंशी, पर्यवेक्षिका स्मिता देशपांडे, एम. एम. पवार यांच्यासह सर्व प्राध्यापक वृंद यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष कीर्तिकुमार शाह, उपाध्यक्ष परेश शाह, शिरीष पटणी, प्रताप शाह, गौतम प्रकाश शाह, गौतम रमेशचंद्र शाह, पद्मेश मेहता, भाग्येश पटणी यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

### मौजे सुकेणे महाविद्यालयात मुलींचे वर्चस्व

**कसबे सुकेणे :** मौजे सुकेणे ता निफाड येथील कर्मवीर रावसाहेब थोरात कनिष्ठ महाविद्यालयाचा निकाल शंभर टक्के लागला असून टॉप टेन पैकी नऊ मुलींनी बाजी मारली आहे. विज्ञान शाखेचा निकाल १०० % तर कला शाखेचा निकाल ९९.१० % लागला असून, दोन्ही विभागात मुलींनीच बाजी मारली आहे कनिष्ठ महाविद्यालयात कला शाखेत११२ विद्यार्थ्यांपैकी १११ विद्यार्थी उत्तीर्ण झाले मयूरी सुरेश पेढेकर ७९.५० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाली.

## निधन वार्ता

### कमळाबाई कुडके



**नगरसूल :** येथील पत्रकार भाऊलाल कुडके यांच्या मातोश्री, ग्रामपंचायतीच्या माजी सदस्या गं.भा. कमळाबाई रामभाऊ कुडके (वय ८६) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात चार मुलगे, दोन मुली, चार सुना, नातू, नाती व पणतू असा परिवार आहे.

# जिल्ह्यात बारावीच्या निकालात मुलींची अव्वल कामगिरी

## येवला शहरातील एन्झोकेम माध्यमिक विद्यालयातील चार विद्यार्थिनी संस्कृतमध्ये राज्यात प्रथम

**येवला : प्रतिनिधी**

**फेब्रुवारी २०२५ मध्ये झालेल्या बारावी परीक्षेचा निकाल सोमवारी (दि. ५) जाहीर झाला. जिल्ह्यातील बहुतांश कनिष्ठ महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांनी कौतुकास्पद यश मिळविले. मात्र, एकूण निकालात मुलींनी सर्वाधिक गुण मिळवून आम्ही हुशार असल्याचे दाखवून दिले.**



येथील येथील सेनापती तात्या टोपे शिक्षण प्रसारक मंडळ संचलित एन्झोकेम हायस्कूल व श्रीमान गंगाराम छबिलदासशेठ उच्च माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी एच. एस. सी. परीक्षा फेब्रुवारी- मार्च २०२५ मध्ये घवघवीत यश संपादन केले. विद्यालयातील चार विद्यार्थिनी संस्कृतमध्ये १०० पैकी १०० गुण मिळवून राज्यात प्रथम आलेल्या आहेत. सिद्धी मढवई, सानिका खोडके, पल्लवी ठोंबरे व श्रुती भावसार या विद्यार्थीनींनी संस्कृत विषयात १०० पैकी १०० गुण मिळवून राज्यात प्रथम येण्याचा मान मिळवला.

विद्यालयाच्या विज्ञान, कला व वाणिज्य तीनही शाखांचा निकाल १०० टक्के लगला आहे. विज्ञान विभागाची कलाश्री पावटेकर हिने शेकडा ९१.८३ गुण मिळवून येवला ब केंद्रात प्रथम आली आहे. सिद्धी मढवई ९१.३३ टक्के, तेजल गुजराथी ९०.८३टक्के, ओम सोनवणे व जिव्हेश धारणकर ८९.८३ टक्के गुण मिळवून अनुक्रमे द्वितीय, तृतीय व चतुर्थ क्रमांकाने उत्तीर्ण झाले आहेत. वाणिज्य शाखेतून गायत्री आवारे ८७.३३ टक्के, वैष्णवी काळे ८६.८३ टक्के व सायली देशमुख ८५.५० टक्के गुण मिळवून केंद्रात अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाल्या आहेत.

कला शाखेतून अश्विनी संजय लभडे ८६.५० टक्के, अश्विनी समाधान लभडे ८५.१७ टक्के व अश्विनी साबळे ८२.६७ टक्के मिळवून अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाल्या आहेत. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थाध्यक्ष पंकज पारख, उपाध्यक्ष डॉ. मनीष गुजराथी, सरचिटणीस सुशील गुजराथी, कोषाध्यक्ष अशोक शाह व संस्थाचालक, प्रशासनाधिकारी दत्ता महाले, प्राचार्य दत्तकुमार उटवाळे, उपप्राचार्य कैलास धनवटे, पर्यवेक्षक अनिल शेलार, उच्च माध्यमिक विभागप्रमुख कैलास पाटील व कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले. यशस्वी विद्यार्थ्यांना उपप्राचार्य धनवटे, कैलास पाटील, सतीश विसपुते, किशोर सोनवणे, विजय साळुंके, डॉ. सुहासिनी शिंदे, सुनील कोटमे, जनार्दन भनगडे, अंकुश गाडेकर, शीतल शिंदे, स्वाती सानप, गोविंद सुंबे, गीताश्री शिंदे आदींचे मार्गदर्शन लाभले.

## लासलगाव महाविद्यालयाचे सर्वच विद्यार्थी उत्तीर्ण

**लासलगाव : वार्ताहर**

**फेब्रुवारी २०२५ मध्ये झालेल्या बारावी परीक्षेचा निकाल जाहीर झाला. त्यात येथील नूतन विद्या प्रसारक मंडळाच्या कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाने यंदाही शंभर टक्के निकालाची परंपरा कायम ठेवली.**



लासलगाव महाविद्यालयातून बारावी कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतून एकूण ५०८ विद्यार्थी परीक्षेला बसले होते. त्यापैकी ५०५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. महाविद्यालयाचा निकाल ९९.४० टक्के जाहीर झाला.

विज्ञान शाखा (१०० टक्के) : प्रथम- नम्रता रमेश गोडस (८९.०० टक्के), द्वितीय- गायत्री पोपट मोरे (८८.८३ टक्के), तृतीय-तेजस चंद्रशेखर श्रीवास्तव (८८.६७ टक्के), चतुर्थ- तुषार साहेबराव कोल्हे (८८.५० टक्के), पाचवा- सिद्धार्थ ओमहरी कुशवाह (८७.८३ टक्के). वाणिज्य शाखा (१०० टक्के) : प्रथम- नेतल नीलेश उपाध्ये (९०.५० टक्के), द्वितीय- यश गौरव जैन (८८.६७ ), तृतीय- वैष्णवी नंदू दरेकर (८७.१७), चतुर्थ- रमशा रफिक शेख (८६.८३), पाचवा- प्रणाली पोपट मोकळ (८६.५०).

कला शाखा-(९८.१९ टक्के) प्रथम- सोनवणे सलोनी ठकाजी (८५.०० टक्के), द्वितीय- सोनवणे हर्षदा चंद्रकांत (८३.६७ टक्के), तृतीय- गांगुर्डे प्रतीक्षा बाळकृष्ण (८१.८३ टक्के), चतुर्थ- जगताप श्रद्धा संतोष (७८.१७ टक्के), पाचवा- वडनेरे शंभो राजेंद्र (७७.३३ टक्के). यश विद्यार्थ्यांचे संस्थेचे चेअरमन प्रकाश पाटील, जनरल सेक्रेटरी गोविंदराव होळकर, खजिनदार अनिल डागा,नू.वि.प्र. मंडळाच्या मॅनेजिंग बोर्डाचे सदस्य व पदाधिकारी, तसेच प्राचार्य डॉ. आदिनाथ मोरे, उपप्राचार्य प्रा.भूषण हिरे, डॉ.सोमनाथ आरोटे, कनिष्ठ महाविद्यालयाचे पर्यवेक्षक उज्वल शेलार, परीक्षा विभाग, चेअरमन किशोर गोसावी कार्यालय अधिक्षक रवींद्र होळकर यांनी कौतुक केले.

## लोकनेते पाटील विद्यालयाचा 'विज्ञान'चा निकाल शंभर टक्के



**लासलगाव : वार्ताहर**

लासलगाव शिक्षण सहाय्यक मंडळ संचलित लोकनेते दत्ताजी पाटील उच्च माध्यमिक विद्यालयाचा विज्ञान शाखेचा निकाल शंभर टक्के, तर कला शाखेचा ९८.२७ टक्के लागला. कला शाखेत प्रथम क्रमांक तेजस्विनी मोरे (८१.५० टक्के),द्वितीय संस्कार पवार (७८.६७), तृतीय चेतन पालवे(७६.५०टक्के), चतुर्थ प्रगती शेजुळ( ७६.३३ टक्के), तर पाचवा क्रमांक जयश्री कदम (७४.६७ टक्के) या विद्यार्थिनीने पटकावला.

विज्ञान शाखेत प्रथम आदिती बिबे(८१.५०टक्के),द्वितीय यश मोरे (८१ टक्के), तृतीय ओम वेळांजे(७९.६७ ),चतुर्थ अनुराधा गांगुर्डे (७९.१७),तर पाचवा क्रमांक अक्षदा वाकचौरे व स्नेहल हिरे (७८.६७) यांनी पटकावला.

यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष नानासाहेब पाटील,सचिव संजय पाटील, उपाध्यक्ष निवृत्ती गायकर, संचालिका नीता पाटील, पुष्पा दरेकर, शंतनू पाटील, अभय पाटील, सीताराम जगताप, लक्ष्मण मापारी, कैलास ठोंबरे, प्राचार्य रमेश सोनवणे, पर्यवेक्षक अनिल सोनवण आदींनी अभिनंदन केले.

## चांदवड येथील होळकर महाविद्यालयाची निकालात भरारी



**चांदवड : वार्ताहर**

येथील पुण्यश्लोक देवी अहिल्या ग्रामविकास संस्था संचलित महाराणी उषाराजे होळकर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाने बारावीच्या परीक्षेत उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम राखली आहे. यावर्षी विज्ञान आणि वाणिज्य शाखांनी शंभर टक्के निकाल नोंदवत महाविद्यालयाचे नाव उज्वल केले आहे, तर कला शाखेनेही ९५.३४ टक्के प्रशंसनीय निकाल नोंदवला आहे.

विज्ञान शाखेत श्रेया दीपक पवार हिने ८२.८३ टक्के गुण मिळवून प्रथम, शौर्य केशव निखाडे ८१.१७ टक्के गुणांसह द्वितीय, तर मयुरेश सुनील ठाकरे ८०.३३ टक्के गुणांसह तृतीय क्रमांकावर राहिला. अजय नवनाथ काळे आणि सेजल दिलीप जाधव यांनी ७९.६७ टक्के गुण मिळवून चौथा क्रमांक विभागून घेतला, तर गायत्री शिवाजी कोतवाल ७७.१७ टक्के गुणांसह पाचव्या क्रमांकाची मानकरी ठरली.

वाणिज्य शाखेत सोनल काळूराम रबारी हिने सर्वाधिक ८७.५० टक्के गुण प्राप्त करून प्रथमस्थान मिळवले. ऋतुजा निवृत्ती ठोंबरे ८१.१७ टक्के गुणांसह द्वितीय, तर राणी ओमप्रकाश भंडारी आणि कांचन संतोष हिरे यांनी ७३.६७ टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक विभागून घेतला. नूतन देवधर निकाळे ७२.१७ टक्के गुणांसह चौथ्या, तर रोजमीन अन्वर शहा ७१.८३ टक्के गुणांसह पाचव्या क्रमांकावर राहिली. कला शाखेत चंचल यादव वानखेडे हिने ७६ टक्के गुण मिळवून अव्वल स्थान पटकावले. रुपेश नारायण जाधव ७५ टक्के गुणांसह द्वितीय, तर संध्या योगेश पवार ७४.५० टक्के गुणांसह तृतीय क्रमांकावर राहिली. महेश ठाकरे आणि रवींद्र सोनवणे यांनी ७२.१७% गुण मिळवून चौथा क्रमांक विभागून घेतला.



## व्ही.के.डी.ची यशाची परंपरा कायम

### विज्ञान शाखेचा निकाल १०० टक्के, मुलींची बाजी

**देवळा : प्रतिनिधी**

एस.के.डी. चॅरिटेबल ट्रस्ट नाशिक संचलित भावड येथील व्ही.के.डी. इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजचा बारावी निकाल जाहीर झाला.

यंदाही यशाची परंपरा कायम ठेवत, बारावी विज्ञान शाखेचा निकाल १०० टक्के जाहीर झाला. अपूर्वा शंकर पवार हिने ८०.१७ टक्के मिळवून प्रथम, तनिष्का जगदीश पवार (७८.म६७ टक्के) द्वितीय, तर आशिष रमेश सूर्यवंशी व मोनाली अशोक अहिरराव (७७.८३) तृतीय क्रमांक मिळवला. यशस्वी विद्यार्थ्यांना शिक्षक नितीन राऊत, अनिल भालेराव, तुषार नीलख, शाम रिठे, चिंतामण जगताप, निकम प्रियंका, सोनवणे आर.के., आर.बी. अहिरे, वाय.एस. आहेर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

> विद्यार्थ्यांना जेईई, नीट, एमएचटी–सीईटी व अन्य स्पर्धा परीक्षांसाठी शिबिरांचे आयोजन करण्यात येते. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण व सुविधा पुरवून त्यांचा सर्वांगीण विकास साधणे व सक्षम नागरिक घडवणे हाच संस्थेचा मुख्य उद्देश आहे.
>
> **– मीना देवरे,** सेक्रेटरी, एसकेडी

संस्थेचे अध्यक्ष संजय देवरे, सेक्रेटरी मीना देवरे प्राचार्य एन. के. वाघ आदींनी अभिनंदन केले.

## आशा आहेर वाणिज्य विभागात येवला तालुक्यात प्रथम



**येवला : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचा इयता बारावी परीक्षेचा निकाल ऑनलाईन नुकताच जाहीर झाला. त्यात येवला तालुक्यातील अंदरसूल येथील मातोश्री शांताबाई गोविंदराव सोनवणे ज्युनिअर कॉलेजचा निकाल शंभर टक्के लागला. या निकालाची परंपरा कायम राखत येवला तालुक्यात वाणिज्य विभागातून प्रथम येण्याचा मान मिळवला. येवला तालुक्यातून आमच्या उच्च माध्यमिक विद्यालयाची आशा अशोक आहेर वाणिज्य शाखेच्या विद्यार्थिनीने ५३१ गुण मिळवत ८८.५० टक्के गुण मिळवून प्रथम येण्याचा मान मिळवला.

विज्ञान विभागातून नूतन पवार या विद्यार्थिनीने ५३१ गुण मिळवत ८८.५० टक्के गुण मिळवून उच्च माध्यमिक विद्यालयात प्रथम येण्याचा मान मिळवला. कला शाखेतून रोहन लक्ष्मण बोठे याने ४१९ गुण मिळवत ६९.८३ टक्के गुण मिळवून कला शाखेत प्रथम येण्याचा मान मिळाला

कला वाणिज्य विज्ञान शाखेचा निकाल शंभर टक्के लागला असून यश संपादन करणारे विद्यार्थी

विज्ञान शाखा : . नूतन दगू पवार ८८.५० टक्के प्रथम आदित्य कृपाल इनामके ८५.३३ टक्के द्वितीय, निकिता योगेश माळी ८५.१७ टक्के तृतीय. धनश्री अनिल गुंजाळ ८४.६७% चतुर्थ कु. जानवी अमोल सोनवणे ८४.३३% पाचवा.

वाणिज्य शाखेत आशा अशोक आहेर ८८.५०% प्रथम, संध्या रंगनाथ कुऱ्हे ८३.८३% द्वितीय धनश्री समाधान उंडे ८२.००% तृतीय अपेक्षा जनार्दन जाधव ७७.१७% चतुर्थ, बाबासाहेब गुरुनाथ आवारे ७५.५०% टक्के पाचवा.

कला शाखेत रोहम लक्ष्मण बोठे ६९.८३% प्रथम, वैष्णवी मच्छिंद्र सोनवणे ६३.००% द्वितीय, अभिषेक भरत कुऱ्हे ६१.३३% तृतीय, अमृता कैलास माळी ६०.०० चतुर्थ, पवन संतोष पैठणकर ५७.००% पाचवा.

गुणवंत विद्यार्थ्यांचे अंदरसुल शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अरुण भांडगे, उपाध्यक्ष सुदाम सोनवणे, सरचिटणीस अमोल सोनवणे, खजिनदार मकरंद सोनवणे आदींनी अभिनंदन केले.

## निफाड महाविद्यालयाचे बारावीत कौतुकास्पद यश

**निफाड : प्रतिनिधी**

मविप्र संस्थेच्या येथील कर्मवीर गणपतदादा मोरे कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी कौतुकास्पद यश संपादन केले.

विज्ञान शाखेचे १८८ पैकी १८८ विद्यार्थी उत्तीर्ण होऊन १००टक्के निकाल लागला, वाणिज्य शाखेचे ९० पैकी ९० विद्यार्थी उत्तीर्ण होऊन १०० टक्के निकाल लागला, तर कला शाखेचे १७७ पैकी १७१ विद्यार्थी उत्तीर्ण होऊन ९६.६१, टक्के निकाल लागला.

यात अनुक्रमे विज्ञान विभागात कृष्णा कापसे (८८.१७ टक्के), प्रेरणा शिंदे (८५.३३), कावेरी जाधव (८४.३३), वाणिज्य विभागात जिशान शेख (८७ टक्के), कल्याणी कहाणे (८३.३३), साक्षी साळवे (७८.५०), कला विभागात शालिनी गवळे (८७.८३ टक्के), प्रिया मौर्य (८१), रोहित सोनवणे (७५.३३) हे विद्यार्थी प्रथम,द्वितीय व तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाले. या यशाबद्दल मविप्रचे अध्यक्ष डॉ. सुनील ढिकले, उपाध्यक्ष विश्वासराव मोरे, सभापती बाळासाहेब क्षीरसागर, उपसभापती देवराम मोगल, सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे, चिटणीस दिलीप दळवी, निफाड तालुका संचालक शिवाजी गडाख, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष डॉ. उत्तम डेरले, प्राचार्य डॉ. ज्ञानोबा ढगे, डॉ. प्रवीण ढेपले, प्रा. अभय वडघुले, प्रा. सुनील जाधव, प्रा. प्रकाश आहेर, प्रा. प्रवीण शेलार, प्रा. राजेंद्र जाधव, श्रीमती सविता कापसे यांनी अभिनंदन केले.



## टायटल व्हेरिफिकेशनकामी जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, **मिळकतीचे वर्णन :-** तुकडी जिल्हा नाशिक, पोट तुकडी तालुका निफाड पैकी, **मौजे महाजनपूर** या गावचे शिवारातील शेतजमीन मिळकत यांसी **गट क्र.व उपविभाग ४४ यांसी एकूण क्षेत्र ०३ हेक्टर ५८ आर अधिक पोट खराबा ०० हेक्टर ०५ आर असे एकूण क्षेत्र ०३ हेक्टर ६३ आर यापैकी पूर्वेकडील दक्षिणोत्तर ०२ हेक्टर ७९ आर अधिक पोट खराबा ०० हेक्टर ०४ आर असे एकूण क्षेत्र ०२ हेक्टर ८३ आर यांसी आकार रुपये ०७.२६ पैसे** यासी चतु:सीमा रेकॉर्ड ऑफ राईटप्रमाणे ही शेतजमीन मिळकत.

वर नमूद शेतजमीन मिळकत ही **सौ. सुशिला बाबुराव फड, सौ. आशा भगवान बोडके** व **चंद्रभागा देवराम सानप** यांच्या मालकी हक्कातील व कब्जा उपभोगातील मिळकत आहे असे सांगून त्यांनी आमचे पक्षकारांसोबत सदर शेतजमीन मिळकत विक्री करणेचा व्यवहार निश्चित करून सन २०१३ मध्ये विक्री करारनामा लिहून दिलेला आहे. **चंद्रभागा देवराम सानप** या स्वर्गवासी झाल्यानंतर त्यांचे कायदेशीर वारस **सौ.कमल वसंत शेळके, सौ. लता रामचंद्र भाबड, सौ. विमल भाऊसाहेब सांगळे, सौ. शारदा सोमनाथ उगले, सौ.सविता नितीन गंभीरे, श्री. उत्तम देवराम सानप** या सर्वांचे जनरल मुखत्यार **श्री. भाऊसाहेब बाबुराव सांगळे** आणि **सौ. सुशिलाबाई बाबुराव फड, सौ. आशाबाई भगवान बोडके** तो व्यवहार मान्य व कबूल करून, कायम ठेऊन सदर मिळकतीच्या व्यवहारापोटी **दिनांक ३०/८/२०२४** रोजी ठरलेल्या एकूण किमतीच्या मोबदल्यापैकी बरीच मोठी भरणा रक्कम स्वीकारून भरणा पावती दस्त आमचे पक्षकारांच्या लाभत लिहून देऊन सदर मिळकतीचा कब्जा आमच्या पक्षकारास दिलेला आहे. सदर मिळकतीबाबत निफाड येथील मे. दिवाणी न्यायालयात विशेष **दरखास्त क्र. १९/२०१२** ही प्रलंबित असून त्या व्यतिरिक्त कोणताही दिवाणी अगर फौजदारी वाद प्रलंबित नाही असे सांगून सदरची मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे आमचे पक्षकारास खात्रीने सांगितले आहे. सदर मिळकतीच्या निर्वेधपणाची खात्री करणे करिता प्रस्तुतची टायटल व्हेरिफिकेशनची जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यात येत आहे. सबब सदर मिळकतीबाबत कोणत्याही व्यक्तीचा कोणत्याही तऱ्हेने गहाण, दान, लीज, लीन, अन्न-वस्त्र, कोर्टवाद, कर्ज, बोजा, हितसंबंध वगैरे असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून **पंधरा (१५)** दिवसांच्या आत आमच्या कार्यालयांमध्ये येऊन संबंधित साक्षांकित दस्तांसह लेखी हरकत घ्यावी,असे न घडल्यास संबंधित कथीत हक्कदारांनी आपले हक्क सोडून दिलेले आहेत असे समजून सदर मिळकत ही निर्वेध, बोजारहित व तबदील करणेस योग्य आहे असे समजले जाईल व आमचे पक्षकार सदर मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. या मुदतीनंतर येणाऱ्या अथवा परस्पर वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या हरकती तसेच कागदपत्रांशिवाय घेतलेल्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत. ही जाहीर नोटीस. तारीख- ०२/०५/२०२५

**सही/-श्री सचिन बाळासाहेब सोनवणे**
ॲडव्होकेट व नोटरी भारत सरकार
पत्ता- द्वारा-गाळा नं.७," आनंद " भूविकास बँक बिल्डिंग,
डॉ. आंबेडकर पुतळ्यामागे, सीबीएस, नाशिक-४२२००२


# चांदवडच्या श्री नेमिनाथ जैन विद्यालयाची निकालात उत्तुंग भरारी



**चांदवड : वार्ताहर**

येथील श्री नेमिनाथ जैन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाने महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा २०२४-२५ मध्ये नेत्रदीपक यश संपादन केले आहे. विद्यालयाचा निकाल १००% लागला, अशी माहिती प्राचार्य शिवदास शिंदे यांनी दिली. या निकालामुळे विद्यालयाच्या घवघवीत निकालाच्या परंपरेत आणखी एका सोनेरी पानाची भर पडली आहे.

उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेत विज्ञान आणि किमान कौशल्य विभागातील एकूण १५५ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते आणि या सर्वांनीच यश मिळवले आहे. विज्ञान विभागात तनुजा शरद गांगुर्डे हिने ८६.६७% गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला, तर रोहिणी बापूराव देशमाने ८३.८३% गुणांसह द्वितीय आणि यश विजय शेळके ८०.१७% गुणांसह तृतीय क्रमांकावर राहिला.

याशिवाय, कीर्ती संजय उपासनी (७८%) आणि अजय विठ्ठल सोनवणे (७७%) यांनी अनुक्रमे चौथा आणि पाचवा क्रमांक मिळवला.

किमान कौशल्य विभागात मयूर संजय महाले याने ६२.१७% गुण मिळवून प्रथम क्रमांक प्राप्त केला.

विद्यालयामध्ये संलग्न असलेल्या प्राणीशास्त्र व दुग्ध व्यवसाय या अभ्यासक्रमातही विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट यश मिळवले. या अभ्यासक्रमात कल्याणी माधव जाधव हिने प्रथम क्रमांक, स्वाती प्रकाश निकम हिने द्वितीय, ईशा विजय कुंभार्डे हिने तृतीय, संजना प्रकाश बागुल हिने चौथा, गायत्री दत्तात्रय ठाकरे हिने पाचवा, कौमुदी प्रकाश मोरे हिने सहावा आणि समृद्धी मोतीराम शिंदे हिने सातवा क्रमांक पटकावला. या विद्यार्थ्यांसाठी उपशिक्षक आशिष शिंदे यांनी मार्गदर्शन केले.

या शानदार यशाबद्दल संस्थेच्या विश्वस्त समितीचे अध्यक्ष बेबीलाल संचेती, उपाध्यक्ष दिनेश लोढा, प्रबंध समितीचे अध्यक्ष अजित सुराणा, उपाध्यक्ष अरविंद भन्साळी, मानद सचिव जवाहरलाल आबड, विद्यालयाचे समन्वयक शांतीलाल अलिझाड, महावीर पारख, झुंबरलाल भंडारी आणि महेंद्र पारख यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

## महत्त्वाचे



### शेतकऱ्यांना वेळेत मुबलक बियाणे, खते उपलब्ध करून द्या : आमदार काळे

**वावी :** मागील काही वर्षीप्रमाणे याहीवर्षी चांगले पर्जन्यमान होईल, असा हवामान खात्याकडून अंदाज वर्तविण्यात आला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना बियाणे व खतांची मोठ्या प्रमाणात आवश्यकता भासणार असून त्यासाठी खरीप हंगामाचे योग्य नियोजन करून शेतकऱ्यांना वेळेत मुबलक बियाणे व खते उपलब्ध करून द्या अशा सूचना आमदार आशुतोष काळे यांनी कृषी विभागाला दिल्या. आमदार काळे यांनी सोमवारी कोपरगाव येथे पंचायत समिती कार्यालयात कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांसमवेत खरीप हंगाम आढावा व नियोजन बैठक घेतली. या बैठकीत कोपरगाव विधानसभा मतदार संघातील शेतकऱ्यांना खरीप हंगामातील येणाऱ्या संभाव्य अडचणी टाळण्याबाबत त्यांनी कृषी विभागाला मार्गदर्शन केले. यावेळी मार्गदर्शन करतांना ते म्हणाले की, मागील पाच वर्षात २०२३ चा अपवाद वगळला तर दरवर्षी समाधनकारक पर्जन्यमान झाले आहे व कृषी विभागानेदेखील आपली जबाबदारी चोखपणे पार पडल्यामुळे शेतकऱ्यांना अडचणी आल्या नाहीत. कृषी विभागाने जबाबदारीने दिलेल्या योगदानाची दखल घेऊन राज्यात दुसऱ्या क्रमांकाचे आयएसओ मानांकन मिळाल्याबद्दल त्यांनी कृषी विभागाचे कौतुक केले.

### बसमधून प्रवाशाचे दागिने लंपास

**सिन्नर :** सिन्नरकडून नाशिकडे बसमधून जात असताना आटकवडे येथील प्रवाशाच्या बॅगातून अज्ञात तीन महिलांनी एक लाख ७२ हजार २४२ रुपयांचे सोन्या-चांदीच्या दागिने चोरून नेल्याची घटना घडली. आडकवडे येथील महेश विठ्ठल आव्हाड (३४) हा युवक बसने प्रवास करीत असतांना त्याच्यासोबत बॅगेत ४ ग्रॅम सोन्याच्या मंगळसूत्राच्या वाट्या, २० ग्रॅमची सोन्याची तुकडा पोत, आठ ग्रॅम वजनाचे लहान मंगळसूत्र, चांदीचा छल्ला असे सुमारे एक लाख ७२ हजार २४२ रुपयांचे सोन्या-चांदीच्या दागिने होते. अनोळखी तीन महिलांची बॅगेतील दागिने लंपास केले. याप्रकरणी आव्हाड यांच्या फिर्यादीहून पोलिसांनी अज्ञात चोरट्यांच्या विरोधात चोरीचा गुन्हा दाखल केला आहे. पोलिस हवालदार महिरे तपास करीत आहेत.

### दुचाकी घसरून एकाचा मृत्यू

**सिन्नर :** औद्योगिक वसाहतीतून घरी जात असताना दुचाकी घसरून पडल्याने उपचारादरम्यान एकाचा मृत्यू झाला. सतीश वामन मोरे (वय ४९) हा औद्योगिक वसाहतीतून घरी जातांना दुचाकी घसरून पडला. त्यास उपचारासाठी नाशिक येथे नेण्यात आले होते. उपचार सुरू त्याचा मृत्यू झाला. याप्रकरणी पोलिसांत अपघाताची नोंद करण्यात आली.

### पाणीपुरवठा लवकरच पूर्ववत : आ. काळे




**वावी :** कोपरगाव शहरातील नागरिकांना पाणीपुरवठा करणाऱ्या चार व पाच नंबर साठवण तलाव जोडणीचे पंपिंग स्टेशनचे काम पूर्ण करण्यासाठी देण्यात आलेला कालावधी आठ दिवसांचा होता. त्या कालावधीत दिलेले काम पूर्ण झाले असून, सुरू असलेल्या आवर्तनातून सर्व साठवण तलाव पूर्णक्षमतेने भरतील व कोपरगाव शहरातील नागरिकांना पुन्हा नियमितपणे पूर्ववत पाणी पुरवठा होणार आहे अशी माहिती आमदार आशुतोष काळे यांनी दिली. कोपरगाव शहरातील नागरिकांच्या कोपरगाव नगर परिषदेच्या सबंधित असलेल्या अडचणी सोडविण्यासाठी आमदार आशुतोष काळे यांनी सोमवारी कोपरगाव तहसील कार्यालयात जनता दरबार आयोजित केला होता. यावेळी शहरातील विविध नागरी समस्या घेऊन आलेल्या नागरिकांनी जनता दरबारात मोठ्या संख्येने हजेरी लावली. या जनता दरबारात शहरातील नागरिकांनी अनेक समस्या मांडल्या. यामध्ये पाणीपुरवठ्याबाबतदेखील नागरिकांच्या आलेल्या तक्रारी ऐकून घेत त्यांनी सांगितले की, चार व पाच नंबर साठवण तलाव जोडणीचे पंपिंग स्टेशनचे काम पूर्ण झाले आहे.



### जातनिहाय जनगणना निर्णयाचे स्वागत

**सिन्नर :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली एनडीए सरकारने देशात जातनिहाय जनगणना करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला असून, या निर्णयाचे सिन्नर तालुका भाजपाच्या वतीने स्वागत करण्यात आले. भाजपाचे उत्तर मंडल ग्रामीण तालुकाध्यक्ष किरण लहाने यांच्यावतीने कार्यकर्त्यांसह ग्रामस्थांना लाडू भरवून मोठ्या उत्साहाने जल्लोष करण्यात आला. यावेळी भाजपाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### नाशिक रोडला एक लाखाची लूट

**सिन्नर :** बहिणीवर अत्याचार केल्याचा पोलिसांत गुन्हा दाखल करण्याची धमकी देऊन एक लाखांची लूट करण्यात आली. अजून तीन लाख रुपयांच्या मागणीसाठी धमकावण्यात येत असल्याची तक्रार सीताराम रामचंद्र निकम (५७), रा. ब्रिजनगर, जेलरोड, नाशिकरोड) यांनी चार संशयितांच्या विरोधात सिन्नर पोलिसांत केली आहे. सीताराम निकम यांना चार संशयितांनी बहिणीवर अत्याचार केल्याचे धमकावून सिन्नर बायपासवरील निसर्ग ढाब्याजवळ आणले. तेथे धमकी देऊन गुगल पेचा पासवर्ड घेतला व त्यातून एकूण ७० हजार रुपये संशयित याने स्वतःच्या खात्यावर घेतल्याचे तक्रारीत म्हटले आहे. तर सरदवाडी मार्गावर असलेल्या एटीएममधून २० व एका मोबाईल शाँपीमधून आधार क्रमांकावरून १० असे एकूण एक लाख रुपये काढून घेतले. अजून तीन लाख रुपये दिले नाही तर अत्याचाराचा गुन्हा नोंदवण्याची धमकी दिली. याबाबत पोलिसांनी चार संशयितांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. उपनिरीक्षक वाघमारे अधिक तपास करत आहेत.

### खंबाळेत ठिबक सिंचन साहित्य पेटवले

**सिन्नर :** तालुक्यातील खंबाळे येथे शेत गट क्रमांक ५३ मध्ये जनावरांसाठी असलेली वैरण व ठिबक सिंचन साहित्य जाळण्यात आले आहे. याबाबत दगडू रामदास भाबड यांनी दोघा संशयित यांच्या विरोधात तक्रार दिली आहे. नुकसानीबाबत विचारणा केली असता, दगडू भाबड यांना जिवे मारण्याची धमकी देण्यात आली.

# जल जीवन मिशन : छे, हे तर ठेकेदारांचेच पोषण !

## दोन वर्षे उलटूनही ८० पैकी केवळ ३७ योजना पूर्ण, ठेकेदारांच्या दिरंगाईमुळे पाणीटंचाई

**सिन्नर : भरत घोटेकर**

**कार्यारंभ आदेश दिल्यानंतर काम करण्याची मुदत उलटून सहा - सहा महिने होऊनही तालुक्यातील ४१ गावांच्या जलजीवन मिशन योजना अपूर्णावस्थेत आहेत. त्यामुळे कोट्यवधी रुपये खर्च होऊनही तालुक्यातील गावांना पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. हर घर जल, हर घर नल हा नारा देत केंद्र शासनाने राबवलेल्या या योजनेतून ठेकेदारांचे मोठ्या प्रमाणात पोषण झाले असून योजनेचा उद्देश मात्र सफल होत नसल्याचे चित्र आहे.**

तालुक्यात राबवण्यात आलेल्या ८० पैकी आतापर्यंत केवळ ३७ योजना पूर्ण झाल्या आहेत. त्यातीलही बहुतेक योजना केवळ कागदोपत्री पूर्ण झाल्या असून उद्भव चुकल्यामुळे योजना मृगजळ ठरल्या आहेत. २०२२ साली योजनांची कामे सुरू झाली. २०२५ चा मे महिना सुरू होवूनही यातील ४१ कामे अजूनही अपूर्णावस्थेत असल्याने या योजनांचे पाणी कधी मिळणार, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. त्यामुळे अजूनही बहुतेक गावांची, वाड्यावस्त्यांना तहान भागवण्यासाठी टँकरच्या पाण्याची प्रतीक्षा करावी लागत आहे.

**अशी आहे तालुक्यातील योजनांची स्थिती**

- एकूण मंजूर योजना - ८०
- पूर्ण झालेल्या योजना - ३९
- पाणीपुरवठा सुरू असलेल्या योजना -३७
- पाणीपुरवठा बंद असलेल्या योजना - ०२
- प्रगतीपथावरील योजना - ४१

जलजीवन मिशन योजनेअंतर्गत तालुक्यात एकूण ८० पाणीपुरवठा योजना राबवण्यात आल्या आहेत. पैकी आगासखिंड, आशापुरी, उजनी, एकलहरे, औंढेवाडी, कारवाडी, कीर्तांगळी, कोमलवाडी, खोपडी बुद्रुक, जयप्रकाशनगर, जामगाव, जोगलटेंभी, डुबेरे, दहिवाडी, दुसंगवाडी, देशवंडी, नळवाडी, पांढुर्ली, पाथरे बुद्रुक, पास्ते, पिंपरवाडी, पिंपळगाव, पिंपळे, फुलेनगर, ब्राह्मणवाडे, बेलू, मलढोण, मीठसागरे, वडझिरे, वडांगळी, वारेगाव, विंचूरदळवी, श्रीरामपूर, सरदवाडी, सुरेगाव, सोनांबे, सोमठाणे, हिवरे या ३७ गावांच्या योजना पूर्ण झाल्या आहेत. पैकी जोगलटेंभी आणि पांढुर्ली या दोन गावांचा पाणीपुरवठा बंद आहे.



लोणारवाडी येथे पूर्ण झालेली जल जीवन मिशन योजना.

**एक गाव, ३५ वाड्यांत टँकरने पाणीपुरवठा**

मे महिना सुरू झाल्याने पाणीटंचाई वाढली आहे. तालुक्यात निऱ्हाळे या एका गावासोबतच ३५ वाड्यांमध्ये सध्या ६ टँकरच्या माध्यमातून पाणीपुरवठा केला जात आहे. दररोज २४ खेपांच्या माध्यमातून एक लाख ८० हजार लिटर पाणीपुरवठा केला जात आहे. याशिवाय आणखी सहा गावांचे प्रस्ताव टँकर मंजुरीच्या अंतिम प्रतीक्षेत आहेत.

**जागांमुळे रखडली कामे**

अनेक ग्रामपंचायतीकडून जलकुंभासाठी जागा देण्यास उशीर झाला. याशिवाय केंद्र आणि राज्य शासनाकडून निधी येण्यासही विलंब होत असल्यामुळे कामे संथगतीने सुरू आहेत. ज्या ठेकेदारांनी दिरंगाई केली, त्यांना दंड ठोठावून मुदतवाढ देण्यात आली आहे.

**- अंकित जाधव,** उपअभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग.

**ठेकेदारांनीच बनवली अंदाजपत्रके**

पाणीपुरवठा विभागाचा शाखा अभियंता यांनी त्या - त्या गावातील सरपंच, ग्रामसेवक यांना हाताशी धरून गरजेनुसार योजनेचे आराखडे तयार करणे आवश्यक होते. मात्र ठेकेदारांनीच या योजनांचे आराखडे आपल्या सोयीनुसार बनून ते मंजूर करून घेतले. त्यामुळे बहुतेक गावांमध्ये आवश्यक असलेल्या वाड्यांवर जल जीवन मिशनची जलवाहिनी पोहोचली नाही. याशिवाय बहुतेक ठिकाणचे उद्भव चुकीच्या ठिकाणी झाल्याने कामे पूर्ण होऊनही पाणी नसल्यामुळे या योजना कुचकामी ठरल्या आहेत.

**पाइपलाइनची लाखो रुपयांची बिले उकळली**

जल जीवन मिशन योजनेत जलवाहिनी टाकण्यात अधिकचा नफा असल्याने अनेक ठेकेदारांनी जलवाहिन्या टाकून लाखो रुपयांची देयके पदरात पाडून घेतली. मात्र, जलकुंभ आणि इतर कामे करण्यात स्वारस्य नसल्याने या योजना रखडल्या आहेत. परिणामी, कामाची मुदत उलटूनही ठेकेदार प्रलंबित कामे करण्यास धजावत नसल्याचे चित्र आहे.

# नांदूरशिंगोटे परिसरात दोन बिबट्यांचा वावर

## शेतकऱ्यांमध्ये दहशत; पिंजरा लावण्याची मागणी

**सिन्नर : प्रतिनिधी**

तालुक्यातील नांदूरशिंगोटे परिसरामध्ये गेल्या काही दिवसांपासून दोन बिबट्यांचा मुक्त संचार असून, दोन ते तीन दिवसांच्या अंतराने शेतकऱ्यांना बिबट्यांचे दर्शन होत आहे. त्यामुळे पशुपालक शेतकऱ्यांमध्ये दहशतीचे वातावरण पसरले आहे.

डोंगराच्या पायथ्याशी असलेल्या बोडके वस्तीजवळ रुपेश शिवाजी शेळके हे रात्री ट्रॅक्टर घेऊन जात असताना त्यांना दोन बिबट्यांचे दर्शन झाले. त्यांनी ट्रॅक्टर जागेवर थांबवताच ट्रॅक्टरच्या मागे एक व पुढे एक, असे दोन बिबटे येऊन बसले होते. इतक्या जवळून दोन बिबटे दिसताच शेळके यांची भंबेरी उडाली. थोडा वेळ थांबून त्यांनी ट्रॅक्टर पुन्हा सुरू केला. त्यानंतर हे बिबटे शेळके वस्तीकडे गेल्याचे त्यांनी सांगितले.

दरम्यान, रात्री ११ वाजता बिबट्यांच्या या जोडीला शिवाजी नागरे यांच्या बंगल्याच्या संरक्षक भिंतीवरून उडी मारताना रुपेश शेळके यांनी पाहिले. एका रात्रीत तीनदा बिबट्यांनी दर्शन दिल्याचे रुपेश शेळके यांचे म्हणणे आहे. नांदूरशिंगोटे परिसरातील डोंगरदऱ्यांमध्ये बिबट्यांना भक्ष्य नसल्यामुळे ते मानवी वस्तीकडे येत आहेत.

वन विभागाने डोंगराच्या पायथ्याशी बिबट्यांसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था केल्यास ते वस्तीकडे येणार नाहीत, असे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. काही दिवसांपूर्वी याच भागातून वन विभागाने काही दिवसांपूर्वी बिबट्याला जेरबंद केले आहे. दुभती जनावरे बिबट्याच्या हल्ल्यापासून वाचवण्यासाठी रात्रीचा पहारा करण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली आहे. वन विभागाने पिंजरा लावावा, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली.

# केटीएचएम महाविद्यालयाचा बारावीचा ८७ टक्के निकाल

**नाशिक :** मराठा विद्या प्रसारक समाजाच्या केटीएचएम महाविद्यालयाचा बारावीचा निकाल ८७ टक्के लागला. विज्ञान शाखेचा निकाल ९८.५४ टक्के कला शाखेचा ६९.८९, तर वाणिज्य शाखेचा ९१.९३ टक्के लागला.

विज्ञान शाखेची रिया कैलास वाघ ही विद्यार्थिनी ८५.८३ टक्के मिळवून प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाली. वाणिज्य शाखेतून सार्थक राजेंद्र मांडगे हा विद्यार्थी ९१ .१७ टक्के मिळवून प्रथम तर कला शाखेतून सोहम बापूसाहेब साळुंके हा विद्यार्थी ९१.६७ टक्के मिळवून प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाला.

धनश्री विक्रम शिंदे या विद्यार्थिनीने अकाउंट विषयात, तर राजश्री ज्ञानेश्वर चव्हाण आणि सप्तमी संजय आंबेकर या दोन विद्यार्थिनींनी संस्कृत विषयात १०० पैकी १०० गुण मिळविले.




**शाखानिहाय पहिले पाच विद्यार्थी**

**विज्ञान-** रिया कैलास वाघ (८५.८३), कृष्णा अरविंद पाटील (८५.५०), सिद्धांत अनिल सुरवाडे (८५.१७), अनिकेत बाळू शेळके (८४.३३), श्रावणी राजाराम संधान (८४.००). **वाणिज्य-** सार्थक राजेंद्र मांडगे (९१.१७), स्नेहा विठ्ठल शेरे (९०.८३), अजिजूर अब्दुररहमान शेख (९०.५०), अपूर्वा अमोल पवार (८८.३३), गौरी गणेश खराटे (८७.३३). **कला -** सोहम बापूसाहेब साळुंके (९१.६७) मोहित अशोक पाटील( ८८.१६), आकाश भगवान गायकवाड(८६) , वैशाली मोहन ससे(८२.३३), तनुजा विष्णू वाघ (७७.८३).

# कुर-कुर पापड ब्रँडचे सीईओ मित्तल यांच्या हस्ते लाँचिंग

**नाशिक : प्रतिनिधी**

महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम) व निवजीवन फाउंडेशन, नवी मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने बचतगटाच्या माध्यमातून व्यवसाय सुरू करणाऱ्या महिला बचत गटांचा जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. तसेच सात बचत गटातील महिलांनी उत्पादित केलेल्या पापड, फरसाण, विविध सजावटीच्या वस्तूंचे उद्घाटन व महिला स्वयंसहाय्यता समूहाच्या वतीने तयार करण्यात आलेल्या कुर-कुर पापड ब्रँडचेदेखील उद्घाटन करण्यात आले.

याप्रसंगी महिला आर्थिक विकास महामंडळाचे विभागीय अधिकारी शैलेश पाटील, जिल्हा समन्वय अधिकारी संजय गायकवाड, निवजीवन फाउंडेशनचे प्रतीक कुंडू आदी उपस्थित होते.

नाशिक जिल्ह्यातील महिला स्वयंसहाय्यता समूहातील महिलांनी स्वतःच्या उत्पादनांचे ब्रँड तयार करावे, या उत्पादनांचा दर्जा टिकवून ठेवावा, विविध शासकीय यंत्रणांच्या वतीने राबवण्यात येणाऱ्या प्रदर्शनामध्ये सहभागी होऊन विक्री वाढवावी, जिल्हा परिषदेच्या नवीन इमारतीमध्ये देखील आपल्या उत्पादनांना विक्रीसाठी जागा उपलब्ध करून देणार असल्याचे जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांनी सांगितले.

जिल्हा समन्वय अधिकारी संजय गायकवाड यांनी महिला आर्थिक विकास महामंडळ कायम या स्वयंसहाय्यता समूहांच्या उत्पादनांच्या माध्यमातून आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी तयार असल्याचे सांगितले. उपक्रमांतर्गत महिलांना कौशल्य विकास प्रशिक्षण देऊन त्यांना स्थानिक पातळीवर उद्योजक बनवण्यात आले. सदर उपक्रमाची अंमलबजावणी १९ डिसेंबर २०२३ पासून सुरु झाली. सामनगाव, नवीन सामनगाव, एकलहरे, लाखलगाय, चेहडी गंगापूर, गोवर्धन येथील १७ बचतगटांमधील महिलांना व्यवसायाविषयी जागरूक करण्यासाठी प्राथमिक बैठकांचे आयोजन करण्यात आले. त्यानंतर इच्छुक महिलांना ३५ दिवसांचे प्रशिक्षण देण्यात आले. या माध्यमातून महिलांना पारंपरिक व्यवसायांच्या पलीकडे जाऊन आधुनिक व सृजनशील व्यवसायांची दारे खुली झाली. त्यांना व्यवसायासाठी आवश्यक असलेले लेबलिंग, पॅकेजिंग आणि बाजारपेठेशी जोडणी मिळाल्यामुळे त्यांच्या उत्पादनांना मागणी वाढली.




**या महिला स्वयंसहाय्यता समूहांचा सन्मान**

म्हाळसामाता स्वयंसहाय्यता समूह- सामनगाव, गार्गी स्वयंसहाय्यता समूह-सामनगाव, समर्थ स्वयंसहाय्यता समूह - नवीन सामनगाव, रमाई स्वयंसहाय्यता समूह- नवीन सामनगाव, कुबेर स्वामी स्वयंसहाय्यता समूह- गोवर्धन गंगापूर, संविधान स्वयंसहाय्यता समूह- गोवर्धन गंगापूर, श्रीकृष्ण स्वयंसहाय्यता समूह - एकलहरे, सरस्वती स्वयंसहाय्यता समूह - लाखलगाव. कार्यक्रमास वरील स्वयंसहाय्यता समूहातील महिलांची उपस्थिती होती.

# शेठ ब. ना. सारडा आरंभ महाविद्यालयाचा १००% निकाल


अथर्व जाधव


चंचल कांबळे


दिनेश सोनकुसरे


मोहम्मद मोमीन


प्रगती खर्जे


रोहित पवार

**सिन्नर : प्रतिनिधी**

येथील शेठ ब. ना. सारडा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाने आपली १००% निकालाची परंपरा कायम ठेवत या वर्षी देखील बाजी मारली आहे. वाणिज्य शाखेचा निकाल १०० टक्के तर कला शाखेचा निकाल ९०.६२ टक्के लागला आहे.

वाणिज्य शाखेतूनपवार रोहित योगेश ८५.०० टक्के (प्रथम), मोमीन मोहमदअली इम्रान ७६.५० टक्के (द्वितीय), कांबळे चंचल राजेश ७०.०० टक्के (तृतीय) कला शाखेतून खर्जे प्रगती सतीष ७५.०० टक्के (प्रथम), जाधव अथर्व किरण ६२.६७ टक्के (द्वितीय), सोनकुसरे दिनेश परसराम ६१.६७ टक्के (तृतीय) क्रमांकाने उत्तीर्ण झाले.

गुणवंत विद्यार्थ्यांचे शालेय समिती अध्यक्ष बापूसाहेब पंडित, प्राचार्य गोरक्षनाथ बागूल, प्रा. मनीषा दोंड, प्रा. प्रवीण शिंदे, प्रा. केशव रायते, श्रीमती पूनम मोटे, प्रा. अमोल गायकवाड आदींसह सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले. यशस्वी विद्यार्थ्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# कृषी सहाय्यकांचे काळ्या फिती लावून कामकाज

## विविध टप्प्यांद्वारे आठवडाभर करणार आंदोलन

**सिन्नर : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य कृषी सहाय्यक संघटनेच्या प्रलंबित मागण्या १५ दिवसांत सोडवण्याचे आश्वासन कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी फेब्रुवारी महिन्यात दिले होते. मात्र, त्याची पूर्तता न केल्याने महाराष्ट्र राज्य कृषी सहाय्यक संघटनेने आंदोलनाचे हत्यार उपसले आहे.

५ ते १५ मे या कालावधीत विविध टप्प्यांवर आंदोलन करण्यात येणार असून, यासंदर्भात कृषिमंत्र्यांना अवगत करण्यात आले आहे. सोमवारी (दि.५) पहिल्या दिवशी राज्यभरात काळ्या फिती लावून कामकाज करण्यात आले.

सिन्नरच्या कृषी कार्यालयात संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी तालुका कृषी अधिकारी ज्ञानेश्वर नाठे यांना विविध मागण्यांचे निवेदन दिले. जिल्हा कार्याध्यक्ष भास्कर आव्हाड यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात आले. याप्रसंगी सिन्नर तालुकाध्यक्ष श्याम गडाख, नितीन खिंडकर, हर्षल देसले, केवल पवार, तुषार काटे, संध्या दहे, कुसुम तांबे, संगीता दवंगे, नीता कांडेकर, दीपक कुसळकर, वनिता शिंदे, अर्चना चौधरी, रुपाली लावरे आदींसह पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

कृषिसेवक कालावधी रद्द करून कृषिसेवकांना नियमित कृषी सहाय्यक पदावर नियुक्ती देण्यात यावी, कृषी सहाय्यकांचे पदनाम बदलून सहाय्यक कृषी अधिकारी करावे, डिजिटल कामकाजासाठी कृषी सहायकांना लॅपटॉप देण्यात यावेत, ग्रामस्तरावर मदतीसाठी कृषी मदतनीसांची नेमणूक करावी, कृषी निविष्ठा वाटपात वाहन भाड्याची तरतूद करावी किंवा परमिट द्वारे वाटप करावे, कृषि विभागाच्या आकृतिबंधास तत्काळ मंजुरी देऊन त्यामध्ये कृषी पर्यवेक्षकांची पदे वाढवून कृषी सहाय्यकांच्या पदोन्नतीमधील कुंठितावस्था दूर करावी, महसूल विभागाप्रमाणे आकृतिबंध करावा, कृषी सहाय्यक कृषी पर्यवेक्षक यांचे प्रमाण ४:१ याप्रमाणे करावे, पोकरा योजनेमध्ये समूह सहाय्यकांची पदे पूर्वीप्रमाणे भरण्यात यावीत, रोजगार हमी योजनेंतर्गत लक्ष्यांक देताना क्षेत्रिय स्तरावरील अडचणीचा विचार करावा, नैसर्गिक आपत्तीच्या पंचनामे करणे व तद्नंतर करावयाच्या कामाबाबत महसूल, ग्रामविकास व कृषी विभागाच्या जबाबदाऱ्यांबाबत योग्य न्यायसंगत कार्यपद्धती तयार करण्यात यावी आदी मागण्यांसाठी कृषी सहाय्यक संघटनेने आंदोलन पुकारले आहे.

या मागण्यांची तात्काळ सोडवणूक न केल्यास कृषी सहाय्यक संघटना विविध टप्प्यांवर आंदोलन करणार असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.



विविध मागण्यांसाठी काळ्या फिती लावून आंदोलन केल्यानंतर तालुका कृषी अधिकारी ज्ञानेश्वर नाठे यांना मागण्यांचे निवेदन देताना सिन्नर तालुका कृषी सहाय्यक संघटनेचे पदाधिकारी.

**आंदोलनाचे टप्पे असे**

सोमवार, दि. ५ मे रोजी कृषी सहाय्यकांनी काळ्या फिती लावून निषेध नोंदवून कामकाज केले. ६ मे पासून कृषी सहाय्यक सर्व शासकीय व्हॉट्सअॅप ग्रुपमधून बाहेर पडतील. दि. ७ मे रोजी सर्व तालुका कृषी अधिकारी कार्यालयासमोर कृषीसहाय्यक धरणे आंदोलन करतील. दि. ८ मे रोजी एक दिवस कृषी सहाय्यक सामूहिक रजेवर जाणार आहेत. दि. ९ मे पासून सर्व ऑनलाइन कामकाजावर बहिष्कार टाकतील. यानंतरही कृषी सहाय्यक यांच्या प्रलंबित मागण्यांची सोडवणूक न झाल्यास दि. १५ मे पासून सर्व योजनांच्या कामकाजावर बेमुदत कामबंद आंदोलन करण्यात येईल.



नाफेडची कांदा खरेदी लांबण्याची शक्यता
पान २

उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक

# गांवकरी



चारा-पाण्याअभावी मेंढपाळांची दाही दिशा भटकंती पान २

■ gavakari.in ■ gavkarinews.com

■ नाशिक, मंगळवार, दि. ६ मे २०२५


# अब की बार शंभरीपार ; जिल्ह्यात १०८ टँकर

## पाणीटंचाई तीव्र, ३५२ गावांसाठी २२६ फेऱ्या

**नाशिक : प्रतिनिधी**



**जिल्ह्यातील पाणीटंचाईचे संकट दिवसेंदिवस अधिक गहिरे होत आहे. एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात जिल्ह्यात तीन टँकर सुरू करण्यात आले होते. आता ही संख्या १०८ टँकरवर पोहोचली आहे. जिल्ह्यातील १० तालुक्यांतील एक लाख ९७ हजार ५६६ लोकसंख्येसाठी १०८ टँकरद्वारे ३५२ गावांना २२६ टँकर फेऱ्यांद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत आहे.**

नाशिक जिल्ह्यातील ग्रामीण भागात गेल्या काही वर्षांत उन्हाळ्याच्या चार महिन्यांच्या कालावधीत भीषण पाणीटंचाई निर्माण होत असल्याचे चित्र आहे. मागील वर्षी पाणीटंचाई असलेल्या तालुक्यांना ३९९ टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत होता. यंदाही टँकरच्या फेऱ्यांची संख्या वाढण्याची शक्यता आहे. मे महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात २२६ टँकर फेऱ्या सुरू असून, येत्या महिनाभरात टँकरच्या फेऱ्यांत वाढ होण्याचा अंदाज आहे. उष्णतेच्या झळा तीव्र होत असल्याने ग्रामीण भागातील विहिरी, ओढे, नदी, तळे यातील साठ्याने तळ गाठल्याचे चित्र आहे. त्यामुळे दिवसेंदिवस विविध तालुक्यांतून टँकरची मागणी होत आहे. जिल्ह्याच्या येवला तालुक्यात सर्वाधिक पाण्याचे दुर्भिक्ष आहे. येवला तालुक्यात २९ टँकरद्वारे ३१ गावे व ४१ वाड्यांतील ५५ हजार १६९ लोकवस्तीला पाणीपुरवठा करण्यात येत आहे.

### ६३ विहिरींचे अधिग्रहण

ग्रामीण भागात टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यासाठी प्रशासनाकडून ६३ विहिरींचे अधिग्रहण करण्यात आले आहे. यात १५ गावांसाठी ४८ टँकरसाठी विहिरींचे अधिग्रहण केले आहे.

| तालुका | गाव | टँकर | टँकर फेऱ्या | लोकसंख्या |
|---|---|---|---|---|
| चांदवड | २३ | ९ | २२ | २४,४१९ |
| देवळा | १२ | ५ | १० | १०,२५९ |
| इगतपुरी | ७१ | १८ | ४३ | २४,२७० |
| कळवण | ८ | ० | ० | ७,२८३ |
| मालेगाव | ३७ | ११ | १८ | २२,६८९ |
| नांदगाव | ६७ | १५ | ३१ | २५,८६० |
| पेठ | २१ | ९ | १९ | १०,२२७ |
| सुरगाणा | ५ | ६ | १५ | ६,६३९ |
| सिन्नर | ३६ | ६ | १७ | १०,७५१ |
| येवला | ७२ | २९ | ५१ | ५५,१६९ |



**नशिक : गंगापूर धरणातून केलेल्या विसर्गामुळे ऐन उन्हाळ्यात सोमेश्वर परिसरातील दुधसागर धबधबा खळाळून वाहत असल्याने नाशिककरांची पावले आपसूकच तिकडे वळत आहेत.**
**(छायाचित्र : रविकांत ताम्हणकर)**

## महत्त्वाचे

### सोळाव्या वित्त आयोगाचे पथक शुक्रवारी महापालिकेत

**नाशिक :** नाशिक महापालिकेत शुक्रवारी (दि.९) केंद्राचे सोळाव्या वित्त आयोगाचे पथक येणार आहे. महापालिकेतील स्थायी समितीच्या सभागृहात या पथकाची महापालिका प्रशासनासमवेत बैठक होणार आहे. यावेळी १५ वा वित्त आयोग, तसेच राष्ट्रीय स्वच्छ हवा कृती कार्यक्रमांतर्गत नाशिक मनपाला मिळालेल्या निधी खर्चाचा आढावा घेतला जाणार आहे. केंद्र सरकारच्या अमृत-२ योजनेंतर्गत शहरामधील सुमारे २८६ कोटींच्या पाणीपुरवठा योजनेचे काम लवकरच सुरू होणार आहे. याव्यतिरिक्त १,६६४ कोटींच्या मलनिस्सारण केंद्रांचे अद्ययावतीकरण, तसेच विल्होळी येथे २७४ एमएलडी क्षमतेचे जलशुद्धीकरण केंद्र उभारण्याचे कामदेखील केंद्राच्या योजनेमधून पूर्ण करण्याचा प्रयत्न आहे. हे सर्व करत असताना आता सोळाव्या वित्त आयोगाचे पथक नाशिक महापालिकेत येऊन यापूर्वी दिलेला निधी कोठे कोठे खर्च झाला, त्याचा आढावा घेणार आहे. केंद्राच्या १६ व्या वित्त आयोगाचे पथक ९ मे रोजी नाशिक महापालिकेत येत असून, प्रशासनाची त्यादृष्टीने तयारी सुरू आहे. काही दिवसांपूर्वी महापालिकेत एन-कॅपचे पथक आले असता, त्यांनी अखर्चित निधीवरून महापालिकेच्या कारभारावर तीव्र नाराजी व्यक्त केली होती. मार्चअखेर या निधीचा तरी उपयोग करा. अन्यथा हा निधी पुन्हा वळता करू, असा इशारा दिल्याची चर्चा होती. दरम्यान, यापूर्वी महापालिकेला एन-कॅपसाठीचा निधी खर्च करण्यासाठी मुदतवाढ देऊनही यात महापालिकेला अपयश असल्याची ओरड होती. काही कामे पूर्ण करण्यात अपयश आल्याने निधी खर्चाच्या आकड्यांची जमवाजमव करताना महापालिका अधिकाऱ्यांची धावपळ होत आहे. एन-कॅपअंतर्गत इलेक्ट्रिक चार्जिंग स्टेशन, बस डेपो, चौदा कोटींचा सायकल ट्रॅक ही कामे केली जात आहेत. पंधराव्या वित आयोगाच्या निधीतून गंगापूर जलवाहिनीचे काम केले जात आहे.

### जिल्हा सहकार बोर्डावर राजेंद्र सोनवणे बिनविरोध

**नाशिक :** जिल्हा सहकार बोर्ड या अग्रगण्य जिल्हास्तरीय सहकार संस्थेच्या अत्यंत अटीतटीच्या निवडणुकीत भुसे येथील



सोसायटीचे संचालक व दिंडोरी लोकसभा मतदारसंघाचे शिवसेना संपर्कप्रमुख राजेंद्र चिंतामण सोनवणे यांची बिनविरोध निवड झाली. या निवडणुकीत जिल्ह्यातील अनेक दिग्गजांनी आपले नामनिर्दे शनपत्र दाखल केली होती. परंतु काल माघारीच्या अखेरच्या दिवशी अनेक तालुका संचालकांची बिनविरोध निवड झाली. तसेच विमुक्त जाती भटक्या जमातीच्या जागेवर सर्वानुमते निफाड तालुक्यातील दिग्गजांनी एकत्र येऊन राजेंद्र सोनवणे यांच्या नावाची घोषणा करून त्यांना बिनविरोध संधी दिली. त्यांच्या निवडीचे आमदार दिलीप बनकर, राजेंद्र डोखळे, दिलीप मोरे, भास्करराव बनकर, अनिल पाटील कुंदे आदींनी स्वागत केले. सहकार बोर्डाला उच्चस्तरावर नेण्यासाठी प्रयत्न करून जिल्हा बोर्डाचा नावलौकिक महाराष्ट्रभर करण्यावर संचालक मंडळाचा कौल असेल, असे नवनिर्वाचित संचालक राजेंद्र सोनवणे यांनी सांगितले.

### जिल्हा सुवर्णकार समाजातर्फे १८ मे रोजी सामुदायिक विवाह

**नाशिक :** जिल्हा अहिर सुवर्णकार समाज हरिओम सांस्कृतिक संस्थेची बैठक पार पडली. यावेळी संस्थेचे अध्यक्ष प्रकाश थोरात यांनी विवाहावर होणारा अवास्तव खर्च व वेळेची बचत टाळण्यासाठी संस्थेने सुवर्णकार समाजात सामुदायिक विवाह सोहळ्याचे रविवार, दि. १८ मे रोजी मल्हारवाडी लॉन्स येथे आयोजन केल्याचे सांगितले. अहिर सुवर्णकार समाजात ज्यांना कोणाला आपला मुलगा अथवा मुलीचे लग्न जमले असल्यास व सामुदायिक विवाह सोहळ्यात नाव द्यावयाचे असल्यास त्यांनी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांशी लवकरात लवकर संपर्क साधावा, असे आवाहन यावेळी संस्थेचे सामुदायिक विवाह सोहळाप्रमुख दंडगव्हाळ यांनी केले. याप्रसंगी संस्थेचे कामकाज संस्थाध्यक्ष प्रकाश थोरात, शशिकांत अहिरराव, योगेश दुसानीस, किरण दुसाने, मनोज जानोरकर, संतोष सोनार, चारुहास घोडके, प्रसन्ना इंदोरकर, श्याम सोनार, सुनील बाविस्कर, महेश घोडके, अनिल दुसाने, वृंदा जाधव, पूनम वानखेडे, सुवर्णा घोडके यांनी पाहिले. सभेच्या आयोजनात अशोक विभांडिक, प्रकाश वडनेरे, संदीप सोनार, हेमंत दंडगव्हाळ, योगेश विसपुते यांचे सहकार्य लाभले.

# अनधिकृत मांस विक्रेत्यांविरोधात मनपाची शोधमोहीम

## २२ जणांवर दंडात्मक कारवाई ; परवानगी घेण्याचे आवाहन

**नाशिक : प्रतिनिधी**

शहरात अनधिकृतपणे मांसविक्री करू नये. महापालिकेची परवानगी घेऊनच मांसविक्री करावी. यासाठी महापालिकेच्या पशुसंवर्धन विभागाने शहरात अनधिकृत मांस विक्रेत्यांविरोधात शोधमोहीम उघडली आहे. पशुसंवर्धनच्या पथकाने आतापर्यंत शहरात बावीस अनधिकृत विक्रेत्यांवर दंडात्मक कारवाई केली आहे. अनधिकृत मांसविक्री करणाऱ्यांचा शोध सुरू आहे.

महापालिका हद्दीतील मांस तसेच मासेविक्री करणाऱ्यांसाठी दरवर्षी जानेवारीत व्यावसायिकांना परवाना नूतनीकरण करणे बंधनकारक करण्यात आले आहे. मनपाने घालून दिलेल्या नियमानुसार मांस विक्रीची जागा स्वच्छ तसेच बंदिस्त असावी. परंतु शहरात अनेक ठिकाणी मांस विक्रीची दुकाने उघड्यावरच थाटली जात आहेत. त्यामुळे जागोजागी अस्वच्छता होत होऊन दुर्गंधी पसरते. नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न उद्‌भवण्याचा धोका आहे. मांसविक्री दुकानांमुळे परिसरात मोकाट कुत्र्यांचा वावर वाढला आहे. शहरातील पूर्व, पश्चिम, पंचवटी, सातपूर, नवीन नाशिक व नाशिकरोड या सहा विभागांत सुमारे पाचशे विक्रेत्यांनी परवाना नोंदणी व नूतनीकरण केलेले आहे. प्रत्यक्षात शहरात मांसविक्रेत्यांची संख्या जास्त आहे. याबाबत महापालिकेच्या पशुसंवर्धन विभागाकडे तक्रारी येत असल्याने याविरोधात शोधमोहीम हाती घेतली आहे. मांसविक्रेत्यांनी परवाना घेणे बंधनकारक आहे.

> मांसविक्रेत्यांना आवाहन आहे की, त्यांनी अधिकृतपणे विक्री केंद्राची परवानगी घ्यावी. अन्यथा महापालिकेतर्फे दंडात्मक कारवाई केली जाईल. अनधिकृत मांसविक्री केंद्राच्या शोधमोहिमेसाठी दोन पथके तयार केली आहेत. कारवाई टाळण्यासाठी शहरातील सर्व विक्रेत्यांनी मांसविक्री करण्याची परवानगी घ्यावी.
> – **डॉ. प्रमोद सोनवणे,** पशुसंवर्धन अधिकारी, मनपा

परवाना न घेता व्यवसाय करताना आढळून आल्यास पाचशे रुपयांची दंडात्मक कारवाई केली जात आहे. पशुसंवर्धन विभागाने अनधिकृत मांस, मासे विक्रेत्यांच्या शोधासाठी विशेष क्षेत्रीय निरीक्षकांची दोन पथके तयार केली आहेत.

# जिल्हाधिकारी कार्यालयात उद्या मॉन्सूनपूर्व आढावा बैठक

**नाशिक : प्रतिनिधी**

जून महिन्यात मॉन्सूनच्या आगमनाची शक्यता लक्षात घेत जिल्हा प्रशासनाकडून बुधवारी (दि. ७) सकाळी ११.३० वाजता जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी जलज शर्मा यांच्या अध्यक्षतेखाली मॉन्सूनपूर्व आढावा बैठक होणार आहे. या बैठकीस सर्व तालुक्यांचे तहसीलदार व संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित राहणार आहेत.

दरम्यान, जिल्हा प्रशासनाकडून संबंधित विभागांना मॉन्सून पूर्वतयारीचे सूक्ष्म नियोजन करत अलर्ट राहण्याच्या सूचना पत्र पाठवून दिल्या आहेत. या पत्रात १ जूनपासून २४ तास आपत्ती नियंत्रण कक्ष सुरू करावा. नियंत्रण कक्षात सक्षम कर्मचाऱ्यांची नियुक्ती करावी. सर्व विभागांनी विविध क्षेत्रांत मदतकार्य करणाऱ्या संस्थांची यादी तयार करून ठेवावी. पर्यटनस्थळे, धोकेदायक ठिकाणे, धरण परिसर, गड-किल्ले यांसारख्या जोखमीच्या ठिकाणांवर आवश्यकतेनुसार नागरिकांसाठी सूचनाफलक, तसेच जाण्यास मज्जाव करणारे फलक लावावेत. जाहिरात फलक, बॅनर्स यांचे संरचनात्मक परीक्षण करून धोकादायक फलक, होर्डिंग्ज, बॅनर्स तत्काळ हटविण्याबाबतची कार्यवाही करावी.

मॉन्सून कालावधीत कार्य करण्यासाठी मनुष्यबळाची आवश्यक भासते. त्याअनुषंगाने अधिकारी, कर्मचाऱ्यांचे नियुक्ती आदेश तयार करून ठेवावेत. त्याची जबाबदारी निश्चित करावी. आरोग्य विभागाने आपले अधीनस्त वैद्यकीय पथके, रुग्णवाहिका व आवश्यक औषधसाठा याबाबतचे नियोजन करून ठेवण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत. येत्या बुधवारी होणाऱ्या बैठकीत या सर्व मुद्द्यांवर चर्चा होईल.

# मनपाच्या पंचक शाळेचे रुपडे बदलणार

## सात कोटींचा खर्च ; महासभेवर प्रस्ताव

**नाशिक : प्रतिनिधी**

जेल रोड येथील प्रभाग १८ मधील शाळा क्र. ४९ ची दुरवस्था झाली असून, ही शाळा पन्नास वर्षांची झाल्याने ती धोकादायक बनली आहे. अनुचित प्रकार घडू नये म्हणून महापालिकेच्या बांधकाम विभागाने शाळानिर्मितीसाठी महासभेवर सात कोटी १९ लाखांच्या खर्चाचा प्रस्ताव मंजुरीसाठी ठेवला आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजनेंतर्गत पंचक शाळेचे बांधकाम केले जाणार आहे.

नाशिकरोड या शालेय आवारात पन्नास वर्षांपूर्वीची पत्र्याची छत असलेली जुनी शाळा इमारत धोकादायक झालेली आहे. या शाळेत काही अनुचित दुर्घटना घडून जीवितहानी होऊ शकते. त्यामुळे जीर्ण झालेली पत्र्याची इमारत पाडून तेथे नवीन शालेय इमारत बांधण्याची आवश्यकता आहे. सदर आरसीसी इमारतीत एकूण २० वर्गखोल्या असून, त्यांपैकी १८ खोल्यांचा वापर विद्यार्थ्यांसाठी करण्यात येतो. उर्वरित दोन खोल्या या मुख्याध्यापक कक्ष व संगणक कक्ष यासाठी वापरात आहेत. शालेय आवारातील जुनी जीर्ण इमारत तोडून त्याऐवजी त्याठिकाणी नवीन आरसीसी तळमजला इमारत बांधणे प्रस्तावित आहे. त्यांपैकी तळमजला बांधकाम क्षेत्र १९७३.९५ चौरसमीटर व पहिला मजला १९४५.५० चौरसमीटर असे एकूण ३९१९.४५ चौरसमीटर या क्षेत्राची नवीन शालेय इमारत बांधण्याचा प्रस्ताव तयार केलेला असून, यात तळमजला येथे आठ वर्गखोल्या, पाच प्रशासकीय खोल्या, दोन एव्ही खोल्या, इनडोअर स्पोर्ट, मुला-मुलींसाठी बाथरूम, प्रसाधनगृह, पिण्याच्या पाण्याची सोय करणे व पहिल्या मजल्यावर दहा वर्गखोल्या, संगणक कक्ष, नावीन्यपूर्ण विज्ञान कक्ष, वाचनालय, डिजिटल खोली आदी बांधणे प्रस्तावित आहे. भविष्यातील वाढीव विद्यार्थी क्षमतेचा विचार करून विषयांकित कामाचे सविस्तर प्राकलन, नकाशे, डिझाइन तयार करण्यात आलेले आहे. शालेय इमारतीस रेन वॉटर हॉर्वेस्टिंग व्यवस्था, रॅम्प, विद्युतीकरण व्यवस्था, अग्निप्रतिबंधक व्यवस्था इत्यादी बाबींचा समावेश असेल. या कामासाठी महासभेने मंजुरी द्यावी. याबाबतचा प्रस्ताव महासभेवर बांधकाम विभागाने ठेवला आहे.

# भाजप नेत्यांची विश्वासार्हता संपल्याची जाणीव : ॲड. छाजेड

**नाशिक : प्रतिनिधी**



भाजपचे नेते, मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा भाजपच्या नेतृत्वावर व त्यांच्या नेत्यांची विश्वासार्हता संपल्याची जाणीव झाली आहे, अशी टीका काँग्रेस शहराध्यक्ष ॲड. आकाश छाजेड यांनी केली आहे.

ते म्हणाले, की जनमानसात भाजपची प्रतिमा अत्यंत खराब झालेली आहे. राज्यातील बेरोजगारी, महागाई, लाडक्या बहिणींची नाराजी, शेतमालाला हमीभाव, शेतकरी आत्महत्या, दुष्काळ, अशा अनेक प्रश्नांवर अपयशी ठरलेल्या भाजप सरकारला आता भीती वाटायला लागली आहे.

याअगोदरच काँग्रेस पक्षातील संधिसाधू नेत्यांनी पक्षांतर केलेले आहे, पण त्याचा फारसा फायदा भाजपला झाला नाही. त्यामुळे आता काँग्रेस पक्षाच्या निष्ठावान व लढवय्या नेत्यांची, पदाधिकाऱ्यांची गरज भासायला लागली आहे. सदभावना यात्रा व आंदोलनाच्या माध्यमातून आवाज उठवत असल्यामुळे काँग्रेस पक्षाची जनसामान्यांमधील प्रतिमा उंचावलेली आहे. याआधीही भाजपने चुकीच्या पद्धतीने पक्ष फोडाफोडी करून सत्ता स्थापन केली. त्यामुळे सामान्य जनतेत आपली पत भाजपने गमावली आहे, हे त्यांच्या लक्षात आलेले आहे.बावनकुळे व अन्य भाजप नेत्यांनी कितीही प्रयत्न केले, तरी काँग्रेस पक्षाचा नेता, पदाधिकारी व कार्यकर्ता जो पक्षाच्या विचाराला बांधील आहे त्यांना कदापि फोडू शकणार नाही. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत काँग्रेस पक्ष अत्यंत यशस्वी कामगिरी करेल, असे मत शहराध्यक्ष ॲड. आकाश छाजेड यांनी व्यक्त केले.

# डांगसौंदाणेत शासन अनुदानित विहीर चोरीला !

## मकरंद अनासपुरे यांच्या चित्रपटातील कथानकाची पुनरावृत्ती

**नाशिक : प्रतिनिधी**

मराठीतील चतुरस्त्र अभिनेते मकरंद अनासपुरे यांच्या जाऊ तिथे खाऊ या चित्रपटात विहीर चोरीला जाण्याचे कथानक दाखवून शासकीय यंत्रणेतील भ्रष्टाचार कसा होतो, याचे वर्णन केलेले आहे. या चित्रपटातील कथेची पुनरावृत्ती डांगसौंदाणे (ता. बागलाण) येथे झाली आहे.

सन २००९-२०१० या वर्षात डांगसौंदाणे (ता. बागलाण) येथे जवाहर रोजगार योजनेंतर्गत शासन अनुदान असलेली खोदकाम करून बांधकाम केलेली विहीर चक्क चोरीला गेल्याची तक्रार गट नंबर ८७/२ मधील शेतकऱ्याने केल्याने खळबळ उडाली आहे. डांगसौंदाणे येथील शेतकरी स्व. शशिकांत चंद्रात्रे (कुलकर्णी) यांच्या सातवड पांधी येथील गट नंबर ८७/२ क्षेत्रात जवाहर रोजगार योजनेंतर्गत विहीर मंजूर करण्यात आली होती. तत्कालीन बागलाण गटविकास अधिकारी, उपअभियंता ल.पा. उपविभाग पंचायत समिती यांच्या माध्यमातून विहीर खोदकाम करण्याबाबतचा प्रशासकीय मंजुरी आदेश दिनांक ३०/१/२००९ रोजी तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांनी काढला होता. त्यानुसार २००९-१० मध्ये विहीर खोदकाम व बांधकाम पूर्ण झाल्यानंतर गट नंबर ८७/२ मधील जवाहर योजनेची विहीर नोंद करण्यासाठी जिल्हा परिषद ल.पा. उपविभाग, सटाणा यांनी तलाठी डांगसौंदाणे यांना २०१० मध्ये आदेश दिले होते. त्यानुसार सातबारा उताऱ्यावर नोंददेखील करण्यात आली. मात्र, आता १६ वर्षांनी या गटातील विहीरच चोरीला गेल्याची धक्कादायक बाब उघडकीस आली आहे. विहीर चोरी गेल्याप्रकरणी शासनस्तरावरून सहा संशयितांवरुद्ध गुन्हा नोंदवावा यासाठी हालचाली सुरू आहेत. तक्रार झाल्यानंतर गुन्हे नोंदविण्यासाठी बागलाण तहसीलदारांनी नोटिसा बजावून सुनावणी ठेवली आहे.

# वृक्षगणना केलेल्या संस्थेला न्यायालयाचा दणका

## अतिरिक्त पावणेदोन कोटींच्या बिलाला ब्रेक

**नाशिक : प्रतिनिधी**

**नाशिक महापालिका हद्दीत सन २०१६ मध्ये दिल्लीस्थित टेरेकॉन कंपनीने वृक्षगणना केली होती, परंतु ही गणना देयकावरून वादात सापडली होती. वृक्षगणनेचे पावणेचार कोटींचे बिल काढले असता, त्यास महापालिकेने सुरुवातीपासून नकार देत ठरल्याप्रमाणे दोन कोटींचे बिल देऊ, अशी भूमिका घेतली.**

याप्रकरणी टेरेकॉन कंपनीने न्यायालयाचे दरवाजे ठोठावत मनपाकडून अतिरिक्त पावणेदोन कोटींच्या बिलाची मागणी केली. महापालिकेनेदेखील याप्रकरणी न्यायालयात आपली बाजू मांडली. न्यायालयाने याप्रश्नी महापालिकेच्या बाजूने निर्णय देत महापालिकेचा तो अधिकार आहे, असे मत नोंदविले. यामुळे महापालिकेच्या पावणेदोन कोटींची बचत होणार आहे.

दर पाच वर्षांनी शहर हद्दीतील झाडांची गणना करणे आवश्यक असते. तत्कालीन आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम यांच्या कार्यकाळात महापालिकेने वृक्षगणनेचा निर्णय घेतला होता. त्यावेळी वृक्षगणनेसाठी दोन कोटींची रक्कम ठरली असताना, संबंधित ठेकेदाराने पावणेचार कोटींचे देयक महापालिकेला पाठवले. उद्यान विभागाने त्यास नकार दिल्यानंतर ठेकेदार न्यायालयात गेला होता. महापालिकेने निविदेनुसार दोन कोटींची देयके नियमानुसार बरोबर असल्याची भूमिका प्रारंभापासून घेतली होती, पण ठेकेदार वाढीव पावणेदोन कोटींच्या रकमेसाठी अडून बसला.



> शहरात वृक्षगणना केलेल्या संस्थेने पावणेदोन कोटी रुपये बिलासाठी न्यायालयात धाव घेतली होती, पण न्यायालयाने निविदेत ठरलेल्या रकमेनुसारच देयक अदा केले जाईल. याबाबत महापालिकाच निर्णय घेईल, असे मत नोंदवत संबंधित संस्थेचा दावा फेटाळून लावला.
> – **विवेक भदाणे,** उद्यान अधीक्षक, महापालिका



वाढीव रक्कम देण्यास महापालिकेचा स्पष्ट नकार होता. कंपनीने ते काम पूर्ण केले नाही. सर्वेक्षणातून प्राप्त झालेल्या अहवालानुसार ४९ लाख वृक्ष असल्याचा दावा संस्थेने केला होता. दोन कोटींची निविदा असताना ठेकेदाराने पावणेचार कोटींचे देयक महापालिकेला पाठवले. संबंधित ठेकेदाराने वृक्षांना जिओ टॅग न लावता ४९ लाख असल्याचा ढोबळ आकडा मनपाला सादर करत पावणेचार कोटींची देयके काढली. त्यामुळे सन २०१६ ची वृक्षगणना चांगलीच वादग्रस्त ठरली.

नाशिक आज गांवकरी

नाशिक, मंगळवार, दि. ६ मे २०२५



विजय निकम झाले 'टायगरभाई' पान ३



प्रशासकीय क्षमता विस्तारण्यासाठी टेकवारी मार्गदर्शक पान ३

# बारावीत यंदाही मुलीच अव्वल!

## नाशिक विभागाचा ९१.३१ टक्के निकाल

**नाशिक : प्रतिनिधी**

**विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील महत्त्वाचा टप्पा मानल्या गेलेल्या बारावीचा निकाल काल (दि. ५) जाहीर करण्यात आला. या निकालावर पुढील शैक्षणिक आवड आणि करिअरचे मार्ग अवलंबून असतात. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या नाशिक विभागामार्फत फेब्रुवारी-मार्च २०२५ मध्ये परीक्षा पार पडल्या होत्या. नाशिक विभागाचा निकाल ९१.३१ टक्के लागला. मागील वेळेपेक्षा यंदा निकालाचा टक्का घसरला आहे.**

या परीक्षेसाठी नाशिक विभागातील नाशिक, धुळे, जळगाव व नंदुरबार या चार जिल्ह्यांतील एकूण एक लाख ५८ हजार ५९३ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती.त्यांपैकी एक लाख ५७ हजार ८४२ विद्यार्थी परीक्षेला उपस्थित राहिले. त्यामधून एक लाख ४४ हजार १३६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले.

नाशिक जिल्ह्याचा निकाल सर्वाधिक ९५.६१ टक्के असून, त्यानंतर जळगाव ९४.५४ टक्के, नंदुरबार ८६.६२ टक्के, धुळे ७४.८८ टक्के लागला आहे. यंदाच्या निकालात घट झाली असून, मार्च २०२४ मध्ये विभागाचा निकाल ९४.७१ टक्के होता.

यावर्षी १२ गैरमार्ग प्रकरणे नोंदविण्यात आली.सर्वाधिक दहा प्रकरणे जळगाव जिल्ह्यातील आहेत.नाशिक, धुळे जिल्ह्यात प्रत्येकी एक, तर नंदुरबार जिल्ह्यात एकही प्रकरण आढळून आले नव्हते.

निकाल जाहीर झाल्यानंतर विद्यार्थ्यांना गुणपडताळणी, उत्तरपत्रिकेच्या छायाप्रती, तसेच पुनर्मूल्यांकनासाठी ऑनलाइन अर्ज करण्याची सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. हे अर्ज आज (दि. ६ मे) पासून २० मेपर्यंत http://mahahsscboard.in या संकेतस्थळावर भरता येणार आहेत. शुल्क डेबिट/क्रेडिट कार्ड, यूपीआय किंवा नेट बँकिंगद्वारे भरता येईल. विद्यार्थ्यांना निकालाची प्रिंट घेण्यास तसेच Digilocker ॲपमध्ये डिजिटल गुणपत्रिका ठेवण्याची सुविधादेखील उपलब्ध आहे.

बारावीच्या निकालानंतर विद्यार्थ्यांसमोर अनेक पर्याय उपलब्ध होतात. वैद्यकीय अभियांत्रिकी, फार्मसी, कृषी, विज्ञान, कला, वाणिज्य, विधी, अशा विविध क्षेत्रांमधील उच्च शिक्षणासाठी प्रवेशप्रक्रिया सुरू होणार आहे.

### गैरप्रकरणांत घट

यावर्षी १२ गैरमार्ग प्रकरणांची नोंद झाली. मागील वर्षी ५२ प्रकरणे होती, तर २०२३ मध्ये ७३ प्रकरणांच्या तुलनेत हे प्रमाण लक्षणीय घटले आहे.



**नाशिक विभागात एकूण ८५ हजार २०८ विद्यार्थी आणि ७२ हजार ६३४ विद्यार्थिनी परीक्षेला बसले होते. त्यांपैकी ७६ हजार २१४ विद्यार्थी आणि ६७ हजार ९२२ विद्यार्थिनी उत्तीर्ण झाल्या. एकूण ८९.४४ टक्के विद्यार्थी, तर ९३.५१ टक्के विद्यार्थिनी उत्तीर्ण झाल्या. यंदाही विद्यार्थ्यांपेक्षा उत्तीर्ण होण्यात विद्यार्थिनींचे प्रमाण जास्त आहे.**

### जिल्हानिहाय उत्तीर्णतेची आकडेवारी

नाशिक जिल्ह्यात ७३ हजार ४४३ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यांपैकी ७३ हजार १२० विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. ६९ हजार ९१२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. नाशिक जिल्ह्याची उत्तीर्णतेची टक्केवारी ९५.६१ आहे.

दुसऱ्या स्थानावर जळगाव जिल्हा असून, ४४ हजार ९२५ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. ४४ हजार ७३६ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. ४२ हजार २९५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. जळगाव जिल्ह्याचा निकाल ९४.५४ टक्के लागून विभागात जळगाव दुसऱ्या स्थानावर आहे.

तिसऱ्या स्थानावर नंदुरबार जिल्हा असून, निकालाची टक्केवारी ८६.६२ आहे. परीक्षेला १६ हजार ९९९ मुलांनी नोंदणी केली होती. १६ हजार ९१६ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. १४ हजार ६५४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले.

चौथ्या स्थानावर धुळे जिल्हा असून, निकालाची टक्केवारी ७४.८८ टक्के आहे. २३ हजार २२६ नोंदणी झालेले विद्यार्थी होते. त्यांपैकी २३ हजार ७० विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. १७ हजार २७५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले.

### जिल्ह्यातील शाखानिहाय विद्यार्थी

- **विज्ञान**........ ९७.६२
- **कला** ......... ७९.९८
- **वाणिज्य** ...... ९४.५३
- **व्यावसायिक अभ्यासक्रम** ................. ८०.६०
- **आयटीआय** .. ८४.६७

### जिल्हानिहाय टक्केवारी

- **नाशिक**....... ५.६१
- **धुळे** .......... ७४.८८
- **जळगाव** ...... ९४.५४
- **नंदुरबार**....... ८६.६२

### पुनर्परीक्षेसाठी उद्यापासून अर्ज

**ज्या विद्यार्थ्यांना श्रेणीसुधार अथवा पुरवणी परीक्षा द्यायची आहे, त्यांच्यासाठी ७ मे २०२५ पासून मंडळाच्या संकेतस्थळावर पुनर्परीक्षेसाठी अर्ज उपलब्ध असतील.**
**निकालासाठी संकेतस्थळे :** https://mahahsscboard.in, https://hscresult.mkcl.org, https://result.digilocker.gov.in, https://results.navneet.com

## राज्यात दीड लाख विद्यार्थ्यांना ७५ टक्क्यांहून अधिक गुण

### श्रेणीनिहाय मिळालेली टक्केवारी

**नाशिक : प्रतिनिधी**

राज्याचा एकूण उत्तीर्णतेचा टक्का ९१.८८ टक्के आहे. यावर्षी एकूण १४.२७ लाख विद्यार्थी नोंदणीकृत होते. त्यांपैकी १४.१७ लाख विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ट झाले होते. एक लाख ४९ हजार ९३२ विद्यार्थ्यांनी ७५ टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळविले आहेत.

उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी-मार्च २०२५ विभागीय मंडळनिहाय व श्रेणीनिहाय उत्तीर्ण झालेल्या नऊ विभागांतील (पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर, कोकण) कोकण विभाग ९६.७४ टक्के मिळवून अव्वल आला आहे. प्रथम, द्वितीय, तृतीय श्रेणीतील विभाग व श्रेणीनिहाय विद्यार्थ्यांनी गुण मिळवले आहेत.

राज्यभरात सर्वाधिक यश कोकण विभागाने मिळवले असून, ९६.७४ टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. त्यानंतर कोल्हापूर (९३.६४), मुंबई (९२.९३) आणि छत्रपती संभाजीनगर (९२.२४) या विभागांनी उत्तम कामगिरी केली आहे.

पुणे विभागात २,४२,६७१ पैकी २,२१,६३१ विद्यार्थी उत्तीर्ण होत ९१.३२ टक्के यश संपादन केले. नागपूर विभागाचा उत्तीर्णतेचा टक्का ९०.५२ असून, लातूर ८९.४६ आणि नाशिक (९१.३१ टक्के) विभागांनीही समाधानकारक कामगिरी केली आहे.

राज्यभरातील एकूण १३,०२,८७३ विद्यार्थी या परीक्षेत यशस्वी झाले आहेत.

- **नऊ विभाग** (पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर, कोकण) मिळून प्रथम श्रेणी (७५ टक्के आणि अधिक) ........................**एक लाख ४९ हजार ९३२**
- **प्रथम श्रेणी** (६० टक्के आणि अधिक)....**४ लाख ७ हजार ४३८**
- **द्वितीय श्रेणी** (४५ टक्के आणि अधिक)...**५ लाख ८० हजार ९०२**
- **उत्तीर्ण श्रेणी** (३५ टक्के आणि पुढे) ....**एक लाख ६४ हजार ६०१**
- **एकूण उत्तीर्ण** .........................**१३ लाख ०२ हजार ८७३**
- **उत्तीर्णतेचे शेकडा प्रमाण** ..............**९१.८८ टक्के**



## संक्षिप्त



### भाजप सिडको मंडल अध्यक्षपदी गणोरे

**सिडको :** विश्वासाची निवड कार्याची शपथ! या भावनेतून कार्यरत असलेल्या राहुल गणोरे यांची भारतीय जनता पार्टी सिडको मंडल अध्यक्षपदी निवड झाल्यानंतर त्यांच्या सन्मानार्थ एक विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात भाजप कामगार मोर्चा महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस रम्मी राजपूत, उत्तर महाराष्ट्र कामगार मोर्चा सरचिटणीस व्यंकटेश मोरे, माजी नगरसेवक राकेश दोंदे आणि धीरज शर्मा यांच्या हस्ते राहुल गणोरे यांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमास कुणाल अजबानी आणि अंकुश वाव्हळ यांचीही उपस्थिती लाभली. या निवडीनंतर प्रतिक्रिया व्यक्त करताना गणोरे म्हणाले, हा सन्मान माझ्यावर विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येक कार्यकर्त्याचा आहे. आता जबाबदारी अधिक आहे आणि सेवाभाव दुप्पट. ते पुढे म्हणाले, आपण सर्वांनी वेळ काढून सन्मानित केल्याबद्दल मी मनापासून आभार मानतो. हा विश्वास मी कृतिशील कार्यातून सार्थ ठरवेन.

### कृषी महाविद्यालयात महाराष्ट्र दिन

**नाशिक :** मराठा विद्या प्रसारक समाज संचलित कर्मयोगी दुलाजी सीताराम पाटील कृषी महाविद्यालयामध्ये महाराष्ट्र दिन व आंतरराष्ट्रीय कामगार दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बापूसाहेब द. भाकरे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी स्थानिक व्यवस्थापन समितीचे सदस्य अशोक पगार यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### सोहम गाडेकरचे स्केटिंग स्पर्धेत यश



**नाशिक :** मराठा विद्या प्रसारक समाजाच्या मखमलाबाद येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज विद्यालयातील सोहम संतोष गाडेकर या विद्यार्थ्याने पुणे येथे झालेल्या राज्यस्तरीय स्केटिंग स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवून सुवर्णपदक व प्रमाणपत्र प्राप्त केले. सोहम यास ज्येष्ठ क्रीडाशिक्षक अनिल पगार, शरद आहेर, सुनीता उशीर तसेच प्रशिक्षक निनाद भडांगे व पालक संतोष गाडेकर यांचे बहुमोल असे मार्गदर्शन लाभले. सोहम गाडेकर याने मिळविलेल्या उज्ज्वल यशाबद्दल मविप्र सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे, मविप्र अध्यक्ष डॉ.सुनील ढिकले, संचालक रमेश पिंगळे, माजी सेवक संचालक डॉ.अशोक पिंगळे, शिक्षणाधिकारी डॉ. भास्कर ढोके, शालेय समिती अध्यक्ष निवृत्ती महाले, पंडितराव पिंगळे, सुरेश पिंगळे, शंकरराव पिंगळे, वाळू काकड, मविप्र सभासद, ग्रामस्थ, प्राचार्य संजय डेर्ले, उपप्राचार्या विमल रायते, पर्यवेक्षक सुनील पाटील, सर्व शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांनी अभिनंदन केले.

## जेलरोडला तिसऱ्यांदा खोदकाम; वाहनधारकांमध्ये संतापाची लाट

**नाशिक रोड : प्रतिनिधी**

जेल रोडवर महापालिकेने तिसऱ्यांदा खोदकाम केल्याने वाहनचालकांनी मनपाच्या कारभाराबद्दल तीव्र संताप व्यक्त केला आहे.

जेलरोड टाकी चौक तसेच कोठारी कन्या शाळेच्या चौकात आता जलवाहिनीसाठी पुन्हा रस्ता फोडण्यात आला. त्याचे काम झाल्यानंतर माती दगड टाकून रस्ता बुजविण्यात आल्याने अपघात होत आहेत. धुळीमुळे नागरिक, वाहनचालक, व्यावसायिकांना आजार जडत आहेत. त्यामुळे नागरिकांनी आंदोलनाचा इशारा दिला आहे.

तीन वर्षांत बिटको ते जेलरोड हा रस्ता तिसऱ्यांदा खोदण्यात आला. सीसीटीव्ही केबल, जलवाहिनी, गॅस पाइपलाइन अशा कामांसाठी रस्ता सतत खोदला जात आहे. आता जेल टाकीच्या भरचौकात रस्ता खोदण्यात आला आहे.

भीमनगर, मध्यवर्ती कारागृहासमोरही रस्ता खोदण्यात आला. कोठारी कन्या शाळा चौकात जलवाहिनी टाकून पंधरा दिवस झाले. परंतु, रस्ता अद्याप दुरुस्त झालेला नाही. खड्ड्यातील मोठे दगड रस्त्यावर आले असून, अपघात होत आहेत. मोठ्या वाहनाच्या चाकाखाली सापडून दगड उडून एखाद्याचा बळी जाण्याचा धोका आहे. महापालिकेने त्वरित जेलरोड नव्याने करावा, अशी मागणी होत आहे. धुळीमुळे नागरिक, वाहनचालक, व्यावसायिक वैतागले आहेत.

## कचऱ्याचे वर्गीकरण न करणाऱ्यांची हयगय नाही!

### १५ मे डेडलाइन, सोसायट्यांना मनपा धाडणार नोटिसा

**नाशिक : प्रतिनिधी**

शहरात अडीचशे घंटागाड्यांच्या माध्यमातून कचरा संकलित केला जातो. मात्र, अद्याप कचऱ्याचे संकलन करताना त्याचे वर्गीकरण होत नसल्याचे चित्र आहे. शहर स्वच्छतेसाठी व नागरिकांच्या आरोग्यासाठी कचरा विलगीकरण करण्यासाठी प्रशासनाकडून प्रयत्न होत आहेत. मात्र, आता महापालिकेकडून कठोर पावले उचलली जाणार आहेत. ओला व सुका कचऱ्याचे वर्गीकरण न केल्यास थेट नोटिसा धाडल्या जाणार आहेत. तरीही कचऱ्याचे वर्गीकरण न केल्यास त्या रहिवासी सोसायट्यांमधील कचराच उचलणार नाही, असा इशारा महापालिकेने दिला आहे.





फेब्रुवारीत मनपा आयुक्त मनीषा खत्री यांनी नवीन नाशिक, इंदिरानगर भागात जाऊन नागरिकांना ओला व सुका कचरा विलगीकरणाचे महत्त्व नागरिकांना पटवून दिले. घंटागाडीत कचरा देताना त्याचे वर्गीकरण करून देण्याचे आवाहनही त्यांनी केले होते, परंतु आयुक्तांच्या या आवाहनाकडे सपशेल दुर्लक्ष केल्याचे चित्र आहे. त्यामुळे शहरातील सहाही विभागांत ओला व सुका कचऱ्याचे वर्गीकरण न करता तो एकत्रच दिला जात असल्याचे चित्र आहे. शहरातील ३१ प्रभागांत घंटागाडी आपल्या दारी संकल्पनेनुसार दररोज आठशे ते नऊशे टन कचरा संकलित केला जातो. कचरा संकलन करताना घंटागाडी त्या-त्या प्रभागात वेळेत जाणे अपेक्षित असून, महापालिकेच्या घनकचरा विभागाकडून यावर देखरेख ठेवली जाते.

### ओल्या कचऱ्यापासून वीजनिर्मिती

ओल्या कचऱ्यापासून वीजनिर्मिती हा देशातील पहिला पायलट प्रोजेक्ट नाशिकमध्ये सुरू करण्यात आला. त्यासाठी आठ कोटी रुपये खर्च केला. शहरातून दिवसाला साधारणत: पंधरा ते वीस टन ओला कचऱ्यातून महिन्याला एक लाख युनिट वीजनिर्मिती होईल, असा मनपाचा अंदाज होता. पण या प्रकल्पासाठी ओला कचराच मिळत नसल्याने हा प्रयत्न फसला. दरम्यान, महापालिकेने कचऱ्याचे विलगीकरण करण्यासाठी कठोर पावले उचलल्यास त्याचा फायदा वीजनिर्मितीसाठी होईल. जेमतेम दीड टन ओला कचरा संकलित होत असल्याने अवघ्या पंधरा युनिटची वीजनिर्मिती होत असल्याचे चित्र होते. त्यामुळे हा प्रकल्प महापालिकेसाठी पांढरा हत्ती ठरत आहे. तत्कालीन आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी शहरातील हॉटेलचालकांची बैठक घेत पन्नास टन ओला कचरा उपलब्ध करून द्यावा, असे आवाहन केले होते. मात्र, तरीही मोठ्या प्रमाणात कचरा उपलब्ध होत नसल्याचे वास्तव आहे.

> **नागरिकांनी घरातील कचरा देताना त्याचे वर्गीकरण करूनच द्यावे. ओला व सुका कचरा वेगळा करून द्यावा. याबाबत नागरिकांमध्ये जनजागृती केली जाईल. मात्र, तरीही कचऱ्याचे वर्गीकरण केले नाही, तर संबंधितांना नोटिसा धाडल्या जातील.**
> **- करिश्मा नायर,**
> अतिरिक्त आयुक्त, मनपा

## हात फ्रॅक्चर, पोटालाही जखम, पण जिद्द कायम

### द्वारकावरील अपघातातील विद्यार्थ्यांची यशाला गवसणी

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

गेल्या काही महिन्यांपूर्वी द्वारका येथे सळई घेऊन जाणाऱ्या वाहनाच्या अपघातात गंभीर जखमी होऊनदेखील जिद्द आणि आत्मविश्वासाच्या जोरावर दोन विद्यार्थ्यांनी कमी कालावधीत अभ्यास करून बारावीत घवघवीत यश मिळविले. साहिल उत्तम काळे आणि ओम विष्णू काळे या दोन विद्यार्थ्यांनी अपघातानंतर केवळ दहा-पंधरा दिवस अभ्यास करून परीक्षेत यश मिळवले.

दरम्यान, बारावीच्या परीक्षेत घवघवीत यश संपादन केले असले तरी आपल्यासोबत असलेल्या मित्रांचा अपघाती मृत्यू झाल्याने या आनंदात ते सहभागी नसल्याचे शल्य बोलून दाखविले.

द्वारका परिसरात झालेल्या एका अपघातात या दोघांना गंभीर दुखापत झाली होती. साहिल काळे याचा डावा हात आणि डावा पाय फ्रॅक्चर झाला होता. विशेष म्हणजे तो डावखुरा (लेफ्टी) असून, लेखनासाठी त्याच हाताचा उपयोग करीत होता. मात्र, याच अवस्थेत त्याने रायटरच्या सहाय्याने परीक्षेत बसून उत्तम यश संपादन केले.

ओम विष्णू काळे याच्या डाव्या हाताला फ्रॅक्चर झाले असून, पोटाच्या भागाला लोखंडी रॉड बसविण्यात आले होते. तरीसुद्धा त्यानेही अपघातावर मात करत चिकाटीने अभ्यास केला आणि परीक्षेत यश मिळवले.या दोघांच्या जिद्दीला आणि चिकाटीला समाजातून मोठा प्रतिसाद मिळत असून, त्यांच्या संघर्षमय प्रवासाची दखल घेण्यात येत आहे. अशा विद्यार्थ्यांनी अपघातानंतरही हार न मानता अभ्यासात लक्ष घालून परीक्षेत यश मिळवल्याने ते खऱ्या अर्थाने तरुणाईसाठी प्रेरणास्थान ठरत आहेत.



## जिल्ह्यातील धरण समूहात फक्त ३१.२७ टक्के साठा

### पाणी जपून वापरण्याचे प्रशासनाचे आवाहन

**नाशिक : प्रतिनिधी**

जिल्ह्यातील धरण समूहात अवघा ३१.२७ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. गेल्या काही दिवसांपासून तापमानात सातत्याने वाढ होत असल्याने जलाशयांत पातळी तळ गाठत आहे. नाशिक शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या गंगापूर धरणातही दिवसेंदिवस पातळी खालावत आहे. गंगापूर धरण समूहात ४० टक्के पाणीसाठा शिल्लक आहे.

| धरण समूह | उपलब्ध पाणीसाठा | टक्के |
|---|---|---|
| गंगापूर धरण समूह | ४०७४ | ४०.०७ टक्के |
| पालखेड धरण समूह | ११४२ | १३,७२ टक्के |
| ओझरखेड धरण समूह | ५४५ | १६.९९ टक्के |
| दारणा | २५५ | ३८.१९ टक्के |
| भोजापूर | ०० | ०० टक्के |
| गिरणा खोरे धरण समूह | | |

अग्रलेख

# बारावीनंतर काय ?

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने यंदा बारावी परीक्षेचा निकाल अत्यंत लवकर जाहीर करुन कमाल केली आहे. फेब्रुवारी/मार्च महिन्यात परीक्षा झाल्यानंतर निकालाची प्रतिक्षा करता करता जून/जुलै महिना उजाडायचा. यंदा मंडळाने सर्व नऊ विभागांचा निकाल मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यात म्हणजे पाच मे रोजी लावून टाकला. यंदा पालक आणि विद्यार्थ्यांना फार प्रतिक्षा करावी लागली नाही. विज्ञान, वाणिज्य, कला, व्होकेशनल (व्यावसायिक) अशा चार शाखांमध्ये बारावीची परीक्षा घेतली जाते. यामध्ये विज्ञान विषयाच्या विद्यार्थ्यांवर अभ्यासाचा अधिक ताण असतो. उच्च शिक्षणासाठी या शाखेतील विद्यार्थ्यांचा कल अभियांत्रिकी, वैद्यकीय, माहिती तंत्रज्ञान इत्यादी अशा शाखांकडे असतो. या अभ्यासक्रमांना प्रवेश मिळविण्यासाठी प्रवेश परीक्षा द्यावी लागते. या परीक्षा विज्ञान शाखा अभ्यासक्रमावर आधारित असल्या, तरी अभ्यासक्रमाबाहेरील भाग असतो. बारावी परीक्षेची तयारी करताना हे विद्यार्थी प्रवेश परीक्षेची तयारी करत असतात. त्यासाठी कनिष्ठ महाविद्यालयांत जाऊन अध्ययन करताना बरेचसे विद्यार्थी खासगी क्लासेसमध्ये जातात. येथे गुणवत्ता यादीला महत्त्व असते. बारावी परीक्षा झाल्यावर काही दिवसांतच प्रवेश परीक्षा घेतल्या जातात. बारावी परीक्षेस बसणारे विद्यार्थी प्रवेश परीक्षांना बसण्यास पात्र असतात. दोन्ही परीक्षा काही ठराविक अंतराने असल्याने विद्यार्थ्यांना अभ्यास करण्यासाठी पुरेसा वेळ मिळत नाही. जेईई, नीट, यांसारख्या प्रवेश परीक्षांची तयारी करण्यासाठी विद्यार्थ्यांना वेळ मिळावा म्हणून मंडळाने यंदा परीक्षा दहा दिवस लवकर घेतल्या. त्यामुळे निकाल लवकर लावणे शक्य झाले. विद्यार्थ्यांनाही प्रवेश परीक्षांची तयारी करण्यासाठीही थोडाफार अवधी मिळाला. यंदा गतवर्षीच्या तुलनेत निकाल कमी लागला आहे. मंडळाच्या पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय घेण्यात आलेल्या परीक्षांचा निकाल ९१.८८ टक्के लागला. सर्व शाखांसाठी एकूण १४,२७,०८५ नियमित विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी १४,१७,९६९ विद्यार्थी प्रविष्ट झाले आणि १३,०२,८७३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. यंदाही मुलींनीच बाजी मारली. ६ लाख २५ हजार ९०१ मुली, तर ६ लाख ७६ हजार ९७२ मुले उत्तीर्ण झाली. मुलींचा ९४.५८ टक्के आणि मुलांचा ८९.५१ टक्के निकाल लागला. कोकण विभागाचा निकाल सर्वाधिक म्हणजे ९७.९९ टक्के लागला, तर लातूर विभागाचा सर्वात कमी ८९.४६ टक्के निकाल लागला. नाशिक विभागाचा निकाल ९१.३१ टक्के लागला असून नऊ विभागांत नाशिक आठव्या स्थानी आहे. परीक्षा म्हटली, तर कॉपी आलीच. कॉपी करण्याचा प्रयत्न विद्यार्थी करत असतात, हे परीक्षा घेणार्या यंत्रणांना माहिती असते. कॉपी करण्याच्या प्रवृत्तीला आळा घालण्यासाठी भरारी पथके तैनात केली जातात, कॉपीमुक्त परीक्षा अभियान राबविले जाते, पोलिसांची मदत घेतली जाते. यंदा मंडळाने कॉपीमुक्त अभियान अत्यंत कडक पध्दतीने राबविल्याचे दिसून आले. त्यामुळे यंदाचा निकाल कमी लागला, असे सांगितले जात आहे. गतवर्षी ९३.३७ टक्के निकाल लागला होता. यंदा ९१.८८ टक्के निकाल लागला. गतवर्षीच्या तुलनेत १.४९ टक्के निकाल कमी लागला आहे. हा निकाल फारच कमी लागला, असेही म्हणता येत नाही. बारावीची परीक्षा आयुष्यातील एक वळणबिंदू असते म्हणून तिला महत्त्व आहे. निकाल लागल्यानंतर विद्यार्थ्यांना वरिष्ठ महाविद्यालये आणि इतर काही व्यावसायिक शैक्षणिक संस्थामध्ये प्रवेश घेण्यासाठी धावपळ करावी लागते. ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया असल्याने गुणवत्तेच्या आधारावरच प्रवेश दिले जातात. परंतु एकही विद्यार्थी प्रवेशाविना राहणार नाही, याची जबाबदारी राज्य सरकारला घ्यावी लागते. गुणवत्तेच्या आधारावर तीन-चार फेऱ्यांमध्ये प्रवेश दिले जातात. अनेक विद्यार्थ्यांना आपल्या पसंतीच्या महाविद्यालयात प्रवेश मिळत नसल्याने ते नाराज होतात. परंतु, प्रश्न गुणवत्तेचा असतो म्हणून एक एक गुण महत्वाचा असतो. परीक्षेत पास झाल्याचा आनंद असला, तरी प्रश्न शेवटी टक्क्यांवर येत असतो. विज्ञान, वाणिज्य, कला या शाखांमध्ये प्रवेशासाठी गर्दी होत असली, तरी विज्ञान शाखेतील गुणवत्त विद्यार्थ्यांचा कल वैद्यकीय, औषधनिर्माण, अभियांत्रिकी, माहिती तंत्रज्ञान, संगणकशास्त्र, तंत्रनिकेतन, फॉरेन्सिक, कृषी, जैवतंत्रज्ञान इत्यादी शाखांकडे असतो. वाणिज्य विद्यार्थ्यांचा कल सहकार, सनदी लेखापाल, कंपनी सेक्रेटरी, कॉस्टिंग, भांडवली बाजार, व्यवस्थापन इत्यादी शाखांकडे असतो. कला शाखेतील विद्यार्थी मराठी, इंग्रजी, हिंदी, संस्कृत अशा भाषा तसेच समाजशास्त्र, अर्थशास्त्र, मानसशास्त्र, राज्यशास्त्र, भूगोल, इतिहास, तत्त्वज्ञान इत्यादी विषय उपलब्ध आहेत. याशिवाय सर्व शाखांच्या विद्यार्थ्यांना कायदा, पत्रकारिता इत्यादी विषय उपलब्ध आहेत. शिक्षक, पालक यांचे मार्गदर्शन आणि स्वतःची इच्छा या आधारावर विद्यार्थी प्रवेश घेऊ इच्छितात. सर्व इच्छुकांना प्रवेश देण्याची जबाबदारी शासनाची असली, तरी गुणही महत्त्वाचे ठरतात. कमी गुण मिळालेल्या विद्यार्थ्यांसाठी अनेक कोर्सेस उपलब्ध आहेत. बिझिनेस अँड मॅनेजमेंट, बीबीए, पीडीडीएम किंवा मार्केटिंग/फायनान्स इत्यादी कोर्सेस उपलब्ध आहेत. माहिती तंत्रज्ञान कंपन्यांत काम करण्याची इच्छा असलेल्या विद्यार्थ्यांना हार्डवेअर आणि नेटवर्किंग, इंजिनिअरिंगला पर्यायी म्हणून हार्डवेअर आणि नेटवर्किंग पदविका अभ्यासक्रम आहेत. कृत्रिम बुध्दिमत्ता म्हणजे आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) हे नवीन क्षेत्र उपलब्ध झाले आहे. निमवैद्यकीय (पॅरामेडिकल) म्हणजे सर्जरी सहायक, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, सोनोग्राफी मशीनशी निगडित, दंत सौंदर्यशास्त्राशी निगडित कोर्सेस आहेत. त्याशिवाय वैद्यकीय क्षेत्रातील उपकरणे आणि सहायक म्हणून अनेक कोर्सेस उपलब्ध आहेत. वैद्यकीय क्षेत्रात फार्मसी हे क्षेत्र खूपच महत्त्वपूर्ण मानले जाते. या क्षेत्रातही चांगले करिअर करता येऊ शकते. बारावीनंतर डी. फार्म आणि बी. फार्म हे अभ्यासक्रम पूर्ण करता येतात. आर्ट डायरेक्टर, चित्रकला शिक्षक, कार्टुनिस्ट, ग्राफिक डिझायनर, सेट डिझायनर, इंटेरियर डिझायनर, ॲनिमेशन, फिल्म मेकिंगसारखे कोर्सेस उपलब्ध आहेत. बारावीनंतर विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रात प्रवेश करण्याच्या संधी आहेत. विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांनी विचारपूर्वक निर्णय घेऊन प्रवेश घेणे महत्त्वाचे आहे. गुणवत्तेला महत्त्व असल्याने मनाप्रमाणे प्रवेश मिळेलच याची खात्री नाही. त्यामुळे काही पर्याय हाताशी ठेवणेही आवश्यक आहे.

# पाकिस्तानच्या 'सिंध देश'चा स्वातंत्र्यलढा!

स्वातंत्र्यप्राप्तीचा महिना ऑगस्ट १९४७ मध्ये सिंध प्रांत पाकिस्तानात सामील झाला. सिंध प्रांतामध्ये मुस्लिम जनसंख्या ७५ टक्के च्या वर होती. फाळणीच्या नियमानुसार, सिंध प्रांत पाकिस्तानातच जाणार होता. २६ जून १९४७ ला सिंध विधानसभेने पाकिस्तानात सामील होण्याचा ठराव मंजूर केला. त्यानुसार सिंध प्रांत पाकिस्तानात गेला. वास्तविक सिंध प्रांतावर पूर्वी तालपूर राजवंशाची राजवट होती. १८४३ ला सर चार्ल्स नेपियरने यास ब्रिटिश साम्राज्याचा भाग केले. त्यानंतर मुंबई प्रेसिडेन्सीमध्ये सिंध प्रांताचा समावेश केला गेला. सिंध प्रांताच्या उत्तरेला पंजाब, पश्चिमेला बलुचिस्तान, पूर्वेला भारतातील राजस्थान व गुजरात राज्ये, तर दक्षिणेला सिंधुसागर अशी भौगोलिक स्थिती. कराचीसारखे मोठे शहर व बंदरसुद्धा. १९४७ नंतर प्रारंभी कराची ही सिंध प्रांताची राजधानी होती. हा प्रांत सिंधू संस्कृतीचे उगमस्थान आहे. मोहेंजोदडो हे प्राचीन शहर याच प्रांतातले.

या प्रांताची प्रमुख भाषा सिंधी. सिंधू या नदीवरूनच प्रांताला हे नाव पडले. धर्म आधारित फाळणीमुळे घात झाला. केवळ मुस्लिमांची लोकसंख्या ७५ टक्केच्यावर आहे; या एकाच निकषावर या प्रांताचा पाकिस्तानमध्ये समावेश करण्यात आला. ही सांस्कृतिक व ऐतिहासिक दृष्ट्या प्रचंड मोठी चूक ठरली. सिंध प्रांताचा महाभारतात सुद्धा उल्लेख आहे. 'सिंधी योद्धे खिळ्यांनी व भाल्यांनी उत्तम लढा देतात, ते शौर्य व सामर्थ्याने संपन्न आहेत', अशी नोंद आहे. हजारो वर्षांपासूनची हिंदू संस्कृती परंपरा सिंधू नदीच्या किनारीच फळल्या फुलल्या. अनेक ऋषी मुनी राजे सिंधू नदीच्या परिक्षेत्रातच झालेले आहेत. आपणा भारतीयांना ज्या नावाने सर्व जग ओळखते ते हिंदुस्थानमधील हिंदू शब्दसुद्धा सिंधूवरूनच प्रचलित झाला आहे. सप्तसिंधूच्या खोऱ्यातील प्रदेश व तेथील विकसित झालेल्या संस्कृती ला 'सिंधू संस्कृती' म्हणून जग ओळखायला लागले. ग्रीक लोकांमध्ये स चा उच्चार ह होतो. त्यानुसार ते सिंधू संस्कृतीऐवजी हिंदू संस्कृती व तेथील हिंदूधर्मीय लोक म्हणून आपला उच्चार करायला लागले. खरे म्हणजे प्रांतातील लोकसंख्या या एकाच तत्त्व निकषावर, त्या प्रांताने कोणत्या देशात समाविष्ट व्हावे, हा विचार मूर्खपणाचा कळस होय. इसवी सन ६०० पूर्वी सिंध प्रांतामध्ये औषधालासुद्धा मुस्लिम व्यक्ती असेल काय? तर शक्यच नाही. कारण इसवीसन ६०० मध्येच मुस्लिम धर्माची स्थापना झाली. व्यक्तीने स्थापन केलेल्या धर्मापेक्षा, हजारो वर्षाच्या संस्कृती परंपरेने जी भूमी ओळखले जाते, ती संस्कारशील भारलेली भूमी येणाऱ्या पिढ्यांवर संस्कार करते. अशा भूमीची तोडणी विशिष्ट धर्माची लोकसंख्या जास्त आहे म्हणून करणे हे खरोखर कोणत्याही दृष्टीने समर्थनीय होऊ शकत नाही

**सिंध प्रांताचा स्वातंत्र्यलढा**

सिंध देश स्वातंत्र्य चळवळ, पाकिस्तानमध्ये बळजबरीने सिंधला सामील केल्यापासूनची ही चळवळ सुरू आहे. पाकिस्तानच्या लोकसंख्येच्या १४ टक्के सिंधी लोकसंख्या सिंध प्रांतात आहे. पाकिस्तानच्या सिंधी बांधवांच्या मनात स्वातंत्र्याच्या मागणीला १९६७ मध्ये सुरुवात झाली. ज्यावेळी त्यांच्यावर पंजाबात असलेल्या उर्दू भाषेचे आक्रमण झाले. उर्दू ही भाषा, सिंधी प्रांतावर लादण्यात आली. त्यानंतर सिंध स्वातंत्र्याच्या चळवळीने १९७१ ला बांगलादेश निर्मितीनंतर पुन्हा जोर धरला. कारण पूर्व पाकिस्तान व पश्चिम पाकिस्तान यामधील लोकसंख्या ही मुस्लिम धर्माचीच होती. मग वेगळे होण्याचे कारण काय? पण केवळ धर्मापेक्षाही इतर बाबी महत्त्वाच्या ठरतात, हे त्या १९७१च्या फाळणीने दाखवून दिले.




संस्कृती, परंपरा व भाषा हे सर्व भिन्न असल्याने केवळ धर्म दोन देशांना बांधून ठेवू शकला नाही. पाकिस्तानातील सिंध प्रांतातील या सिंध देश स्वातंत्र्याचा लढा हा पूर्णतः सिंधी मुस्लिमांचा आहे सिंधी हिंदूंचा नाही. कारण जवळजवळ सर्व सिंधी हिंदू बांधव भारतात फाळणीच्या वेळेसच आलेत. १९७२ ला 'जय सिंध तहरीक' या राजकीय पक्षाची स्थापना झाली. त्याचे नेते होते, जे एम सय्यद. हेच पूर्वीचे पाकिस्तान निर्मितीच्या संस्थापकांपैकी एक. 'सिंध्यांची संस्कृती वेगळी आहे, भाषा वेगळी आहे. पंजाब्यांनी आमच्यावर कोणतेहीआक्रमण करू नये' असा त्यांचा उच्चार होता. अलीकडे १७ जानेवारी २०२१ 'सान' या शहरात सिंधू देशाच्या मागणीसाठी प्रचंड विशाल मोर्चा काढण्यात आला होता. सिंध प्रांतातून नैसर्गिक संसाधनांचा वापर पाकिस्तान फक्त पंजाबसाठीच करते. आणि सिंध प्रांताला उपेक्षित ठेवते. झुल्फिकार अली भट्टो व त्याचे कुटुंबीय सोडले तर देश पातळीवर कुणीही राज्य केलेले नाही. सध्याच्या घडीला अनेक पक्ष स्वतंत्र सिंध देशाची मागणी करीत आहेत त्यामध्ये सिंध कौमी महाज पार्टी, सिंध स्टुडन्ट फेडरेशन, सिंध नॅशनल मूव्हमेंट पार्टी इत्यादी पार्टीचा समावेश आहे. १९७२ पासूनच जय सिंध तेहरीक पक्षाच्या जे. एम. सय्यद यांना आधुनिक सिंधी राष्ट्रवादाचे संस्थापक मानले जाते. आता त्यांचा नातू सय्यद जलाल महमूद शहा यांच्या नेतृत्वात सिंध युनायटेड पार्टी सिंधी स्वातंत्र्याचा विषय घेऊन लढत आहे. इतर अनेक पक्षसुद्धा लढत आहेत. 'सिंध देश मुक्ती सेना' हीसुद्धा सिंध प्रांतातील स्वातंत्र्याचा लढा लढणारी संघटना आहे. या संघटनेला पाकिस्तान, आतंकवादी दहशतवादी संबोधते. या संघटनेने २०१० ला सिंध प्रांतातील हैदराबाद येथे बॉम्बस्फोट घडविले होते. तसेच २०१२ मध्ये सिंध प्रांतातच प्रत्येक जिल्ह्यात बँकांच्या बाहेर बॉम्बस्फोट घडवले. पाकिस्तानच्या मुख्य बँकेसमोरसुद्धा असाच स्फोट केला. ५ ऑगस्ट २०२० ला 'सिंध देश क्रांतिकारक सेने'ने जमात-ए-इस्लामीच्या मोर्चावर, ग्रेनेडचा हल्ला केला. हा मोर्चा जम्मू- काश्मीरच्या ३७० चे कलम रद्द केल्याच्या भारत सरकारच्या निर्णयाच्या विरुद्ध होता. तो दिवस कलम रद्द करण्याचा पहिला वर्धापन दिवस होता.



भारताभोवतालचे अस्वस्थ वर्तमान

हेमंत चोपडे
७३५०७०५०९१

**वर्तमानातील स्वातंत्र्यलढ्याची स्थिती**

१७ जानेवारी २०२५ ला Jeay Sindh Muttahida Mahaz (JSMM) ने सान शहरात मोठा मोर्चा काढला. सिंधु देशाच्या स्वातंत्र्याच्या मागणीसाठी या मोर्चाचे आयोजन होते. प्रदर्शनकर्त्यांनी विविध देशांच्या, त्यात भारताच्याही झेंड्यांचा वापर करून आंतरराष्ट्रीय समुदायाकडून समर्थन मागितले. सिंधू देश क्रांतिकारी सेनेने Sindhudesh Revolutionary Army (SRA) मार्च २०२५ मध्ये, पाकिस्तानच्या National Logistics Cell (NLC) च्या वाहनांवर हल्ला केला. या हल्ल्यात वाहनांचे नुकसान झाले आणि चालक जखमी झाले. या हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली आहे. सिंधच्या संसाधनांच्या शोषणाविरोधात लढा सुरू ठेवणारच, अशी घोषणा केली. जय सिंध स्वातंत्र्य चळवळसुद्धा आजही लढतेच आहे. जी. एम. सय्यद यांच्या तिसऱ्या पुण्यतिथीनिमित्त २५ एप्रिल २०२५ ला सिंधला स्वातंत्र्य हवे आहे. सिंध व बलुचिस्तानमधील बेपत्ता स्वातंत्र्य कार्यकर्त्यांच्या मिळालेल्या मृतदेह विल्हेवाटीला विरोध, अशा आशयाच्या घोषणा होत्या. मानवाधिकाराचे उल्लंघनाचाही आरोप त्यांनी पाकिस्तान सरकारवर केला आहे. सिंधू नदीवरील प्रस्तावित सहा कालव्यांच्या विरोधात आंदोलन झाले. त्यामुळे सिंध व पंजाबमधील महामार्गावर वाहतूक ठप्प झाली. निर्यातीवर प्रचंड परिणाम झाला. ट्रकच्या रांगा लागला. हे आंदोलन स्थानिक वकील व सामाजिक संघटनांनी केले. यामुळे कालव्यांच्या प्रकल्पाला स्थगिती दिली आहे. नैसर्गिक संसाधन पळवणे, हक्काचे व हिस्याचे सिंधू नदीचे पाणी मिळू न देणे आणि लोकांचे जीवनमान उंचावण्यासाठी कोणतेही प्रयत्न न करणे, सिंधी भाषेची उपेक्षा करून उर्दू लादणे, शिक्षण यंत्रणा मागास स्थितीत व प्रचंड बेरोजगारी या सर्व बाबींमुळे सिंध प्रांतात नागरिकांचा प्रचंड रोष आहे. एवढे जरी असले तरी बलुचिस्तान स्वातंत्र्यप्राप्तीच्या दिशेने या सर्वांच्या पुढे आहे, हे मात्र नक्की!

**भारतीय हिंदू सिंधींचे काय?**

सिंध प्रांतीयांना क्रांतीचा सूर गवसेल, पण सात ते आठ दशकांपासून ज्यांना धर्माच्या नावावर परांगदा व्हावे लागले! पळून यावे लागले! आणि संपूर्ण भारतात आश्रय घ्यावा लागला अशा हिंदू सिंधी बांधवांपैकी कुणीही इस्त्रायलचा इतिहास वाचला नसेल काय? इस्त्रायलचे स्वातंत्र्य कसे मिळाले? या हिंदू सिंधी बांधवांना हे समजून घ्यायची इच्छा नसेल काय? आपल्या सिंधी मायभूमीपासून आपण परांगदा आहोत, अशी भावना येत नसेल काय? आपल्या घरादारावर, संपत्तीवर, माझ्या आई-बहिणींवर झालेले बलात्कार याचे स्मरण होत नसेल काय?

# निधी वळताच पित्त खवळले

सन २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत महायुतीला ऐतिहासिक बहुमत मिळाले. तीनही पक्षांना भरभरून जागा मिळाल्या. मात्र, सरकार स्थापनेपासून तीनही पक्षांतील धुसफूस विशेषतः राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना यांचे सूत काही केल्या जुळायला तयार नाही.

लोकसभा निवडणुकीत महायुतीला फटका बसला आणि विधानसभा निवडणूक जिंकण्यासाठी राज्याच्या आर्थिक परिस्थितीचा विचार न करता राज्य सरकारने मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना सुरू केली. सत्तेवर आल्यास एकवीसशे रुपये देऊ, असे जाहीर सांगितले. तीनही पक्षांच्या भावांनी श्रेयवादाची बॅनरबाजी केली. मात्र, सत्तेवर येताच बहिणीचे लाड करताना दमछाक होऊ लागली आहे. मग इतर खात्यांच्या योजनांना कात्री लावली गेली, काही खात्यांचा निधी वळवला गेला. आता आदिवासी विकास खाते, तसेच सामाजिक न्याय विभागाकडील अनुक्रमे ३३५ आणि ४१० कोटी रुपये परस्पर वळविण्यात आले आणि तेदेखील संबंधित खात्याच्या मंत्र्यांना न कळवताच. यावरून सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट यांचे पित्त खवळले आणि नाराजी व्यक्त करत खातेच बंद करून टाका, असे म्हटले, एवढ्यावरच ते थांबले नाहीत तर आदिती तटकरे यांच्या खात्याचा पहिला नंबर आला. मात्र, तो इतर खात्यांचा निधी वळवून, अशीही खोचक टीका त्यांनी केली. भाजप आणि शिंदे यांच्या शिवसेनेचे चांगले चालले असताना २०२३ मध्ये नाहक दोघांत तिसरा घुसला की घुसवला गेला? मात्र, यावरून महायुतीत नेहमीच दोघांत तिसरा अडचणीचा ठरू लागला आहे. मविआ सरकारमधून बाहेर पडताना तत्कालीन शिवसेनेच्या मंत्र्यांनी अर्थमंत्री अजित पवार हे आमच्या खात्यांना निधी देत नव्हते, असा आरोप करत होते. मात्र, २०२३ मध्ये भाजपने अजित पवार यांना केवळ युतीत आणले नाही, तर त्यांच्याकडे राज्याच्या तिजोरीच्या चाव्या दिल्या. पवारांना महायुतीत घेऊन महाशक्तीने शिंदे सेनेची चांगलीच कोंडी केली, हे २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत अधोरेखित झाले. मुख्यमंत्रिपदाची एकनाथ शिंदे यांना अपेक्षा होती. मात्र, तिथे अपेक्षाभंग झाला. निकाल लागताच अजित पवारांनी आपला पाठिंबा देऊन टाकला. त्यावेळी मंत्रिमंडळ बनताना, खातेवाटप होताना शिंदे सेनेची अवस्था सांगताही येत नाही आणि सहनही होत नाही, अशी झाली होती. मात्र, सत्तेचा मोह कुणालाही सुटत नाही म्हणून जुळवून घेतले. अजित पवार शिंदे सेनेची कोंडी करण्याची एकही संधी सोडत नाहीत. हे कमी म्हणून की काय पवारांनी जळगाव जिल्ह्यातील पाच माजी आमदारांना आपल्या पक्षात घेतले. यावर शिवसेनेचे गुलाबराव पाटील यांनी नाराजी व्यक्त केली. पवारांनी पुण्यात माजी मुख्यमंत्र्यांना सन्मानित करण्याचा कार्यक्रम ठेवला. त्याला एकनाथ शिंदे गैरहजर राहिले होते. दादांच्या दादागिरीला कंटाळून मविआमधून बाहेर पडलेली शिवसेना आता महायुतीतून बाहेर पडणार का? निवडणूक निकालानंतर भाजप व शिवसेनेत काहीसा दुरावा, तर भाजप आणि अजित पवार यांच्यात जवळीक निर्माण झाली आहे. मात्र, काहीही झाले कितीही कोंडी झाली तरी कोणी सत्ता सोडेल हे संभवत नाही. दादा-भाईंच्या वादात देवाभाऊंना मात्र मोठी कसरत करावी लागत आहे.

अनंत बोरसे
९१५८४९५०३७

# थांब! निसर्ग अजून श्वास घेतोय..!!

शनिवारी सकाळ. एक आई बाजारात जाते. भाजीवाला विचारतो, "बाई, पिशवी आहे ना?" ती म्हणते, "अरे, राहिली घरी... तूच दे एक प्लास्टिकची." आणि त्या छोट्याशा, केवळ एकदा वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिक पिशवीचा प्रवास सुरू होतो. कुठेतरी ओढ्यात, झाडांवर अडकतो. शेवटी कोणाच्या गळ्यात अडकून त्याचा जीव घेतो...

हा फक्त एक प्रसंग नाही. ही आपल्या शहराची दररोजची सत्यकथा आहे. प्लास्टिक बंदी कायद्यानं आली, पण आपण ती मनापासून स्वीकारली का? आपण अजूनही चल रे एक पिशवी दे म्हणतो, पण एक क्षण थांबा... आणि विचार करा. निसर्ग अजूनही श्वास घेतोय, पण आपण त्याचं फुप्फुस प्लास्टिकने भरतोय!

**प्लास्टिक : आपल्या सवयींचं सावत्र दुःख**

प्लास्टिक स्वस्त, टिकाऊ, आणि अगदी सहज मिळणारं. आपल्या दैनंदिन जीवनात ते इतकं मिसळलं आहे की आपण त्याशिवाय काही विचारूच शकत नाही. पण हेच प्लास्टिक जिथे जातं, तिथं मृत्यूचं निमंत्रण घेऊन जातं. झाडांच्या मुळांना अडकलेलं प्लास्टिक, नद्या-ओढ्यांमध्ये वाहत आलेली थैली, आणि शेवटी सागराच्या पोटात पोहोचून पाण्यातल्या जीवांना गिळणारा शाप ही आपल्या "सवयींची किंमत" आहे!

**शहर बोलतंय, पण आपण ऐकतोय का?**

पुणे, मुंबई, नागपूर, नाशिक अनेक शहरांनी प्लास्टिक बंदीचं स्वागत केलंय. शासनाने ५० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या प्लास्टिक पिशव्यांवर बंदी घातली. पण



दुकानदार अजूनही "चल रे, खालून दे" म्हणून हाताखालचं प्लास्टिक पुढं करतो. आणि आपणही "अरे हो, एकच वेळ आहे" म्हणून ती घेऊन निघतो. हा एक क्षणाचा निर्णय हजारो वर्षं टिकणारं प्रदूषण निर्माण करतो!

**थांब... आता खरंच थांबायला हवं!**

थांब! पिशवी घे

हा एक संदेश नाही, ही एक जबाबदारी आहे. तुमच्या बॅगेत एक कापडी पिशवी ठेवा,

किरण काळे
९९२२९०४१२३

स्कूटरच्या डिकीत दोन ठेवा. एकदा दोनदा विसरलात तरी पुन्हा सवय लागते. बदल तुम्हालाच करायचा आहे कारण शासनाने फक्त नियम बनवले, पण निसर्गाचं श्वसन आपण जिवंत ठेवायचं काम करतोय.

**परिणाम आपल्या आरोग्यावरही!**

प्लास्टिक जाळलं की त्यातून डायॉक्सिनसारखे विषारी वायू निघतात. हे वायू फुफ्फुसांमध्ये जातात, कॅन्सरपर्यंत पोहोचवू शकतात. पाण्यातील प्लास्टिकचे सूक्ष्म तुकडे मायक्रोप्लास्टिक आपल्याच अन्नात परत येतात. म्हणजे आपणच आपल्या जिभेवर विष ठेवतो आहोत आणि त्याचं चविष्ट म्हणतोय!

**प्लास्टिकमुक्ती म्हणजे आधुनिक शहाणपण**

आज जगभरातील प्रगत देश झिरो वेस्ट जीवनशैलीकडे वळत आहेत. सध्या दक्षिण कोरियामध्ये घराघरात कचरा वर्गीकरण आणि प्लास्टिकविरहित जगण्यावर भर दिला जातो. स्वीडन, जर्मनी, नेदरलँड्ससारखी राष्ट्रं रियूज, रिव्होल्यूशन घडवतात. आपणही त्यांचा मार्ग घेऊ शकतो. गरज आहे ती पिशवी घेऊन, विचार घेऊन बाहेर पडण्याची!

**लहान पावलं, मोठा बदल**

आपल्या सोसायटीत 'नो प्लास्टिक' वीकेंड उपक्रम सुरू करू शकतो. शाळा-कॉलेजांमध्ये प्लास्टिक जनजागृतीचे खेळ, पोस्टर स्पर्धा, बाजारात 'कापडी पिशवी स्टॉल' योग्य दरात, आकर्षक डिझाइनमध्ये. लोकल कलाकारांच्या माध्यमातून गाणी, नाटकं 'थांब! पिशवी घे' म्हणणारी, सर्वात महत्त्वाचं आपण स्वतः सुरुवात करू. रोज.

**शेवटी... एक छोटा विचार**

एक दिवसाचा बाजार. तीच ओळखीची प्लास्टिक पिशवी हातात असते. समोर एक छोटा मुलगा आपल्या आईला म्हणतो, 'आई, मी पिशवी आणली... कारण मला मासा खायचा आहे, प्लास्टिक नाही!' त्या एका मुलाने पुढच्या पिढीचा विचार केला.

आपण का थांबतोय?

**पिशवी आपली जबाबदारीही असते**

चला तर मग थांबू, विचार करू आणि स्वतःच्या कृतीतून निसर्गाचा श्वास जपू!

'थांब! पिशवी घे... निसर्ग अजून श्वास घेतोय!'

# व्यक्तिस्वातंत्र्याचे धोरण आवश्यक

आतंकवाद्यांचा बुद्धिभेद (ब्रेनवॉश) करणारे त्यांचे पाकिस्तानी मास्टरमाइंड असतात. सुरक्षा यंत्रणा अशांवर चांगलेच लक्ष ठेऊन असतात. हे मास्टरमाइंड जितके दहशतवादी कटाचे गुन्हेगार आहेत तितकेच ती घटना घडल्यानंतर मुळ समस्येला बगल देऊन लोकांना भ्रमित करणारे राजकारणी आणि मीडियादेखील तितकीच गुन्हेगार आहे, असे मला वाटते.

पहलगाम आतंकवादी हल्ल्यानंतर प्रत्यक्षदर्शींनी रोखठोकपणे सांगितले की आमच्या पुरुषांना धर्म विचारून मारण्यात आले. तरीदेखील भारतातील अनेक राजकीय व्यक्तींनी समाजाला भ्रमित करून हा भाग कसा खोटा आहे आणि असे काही घडलेच नाही, दहशतवाद्यांनी स्त्रियांना काही केले नाही, मग हे किती चांगले आहे वगैरे सांगून आतंकी विचारांना छुपे अभय प्रदान केले. मागे सर्जिकल स्ट्राइकचे पुरावे द्या, असे सांगून सैनिकांवर ह्याच मंडळींनी अविश्वास दाखवला होता. अशा राजकीय व्यक्तींना आणि व्यक्तींच्या पक्षावर याशिवाय लोकांना भ्रमित करणारे बॉलीवूडचे प्रतिष्ठित अभिनेते, कथित समाजसुधारक, लेखक यांना खर म्हणजे वैचारिक दहशतवादी घोषित करून देशद्रोहाचा ठपका ठेवला पाहिजे.

खरंच पहलगामच्या दहशतवादी घटनेनंतर माझे डोळे उघडले आणि आता असे वाटू लागले आहे की, लोकांच्या दृष्टीने हितकारक अशा विचारसरणीचा संविधानाने स्वीकार केला पाहिजे. अहितकारी दहशतवादी विचारसरणीला संविधानाने संरक्षण देणे आता बंद केले पाहिजे ! कोणत्या विचारांना संरक्षण, प्रसार आणि प्रसिद्धी दिली पाहिजे हे आता भारताने ठरवले पाहिजे. खरच व्यक्तिस्वातंत्र्याचे घटनात्मक नैतिक धोरण (पॉलसी) ठरवले गेले पाहिजे.

**-भूषण वाळणूसकर, डोंबिवली**

# बालविवाहाचे दुष्टचक्र संपुष्टात यावे

बालविवाहाला केवळ कायद्याने रोखता येणार नाही, तर समाजाच्या मानसिकतेत बदल घडविणे आवश्यक आहे. शिक्षणाच्या मदतीने मुलींना सक्षम करणे, पालकांना जागरूक करणे आणि पितृसत्ताक परंपरांचा प्रभाव कमी करणे, हे महत्त्वाचे टप्पे आहेत.

'बेटी बचाओ, बेटी पढाओ' यांसारख्या अभियानामुळे समाजाची मानसिकता बदलण्यास मदत झाली आहे. मात्र, अजूनही खूप पल्ला गाठायचा आहे. बालविवाह हा केवळ एक सामाजिक प्रश्न नाही, तर तो मुलींच्या आरोग्यावर, शिक्षणावर आणि भविष्यातील संधींवर गंभीर परिणाम करणारा एक शाप आहे. ही प्रथा थांबवण्यासाठी समाजातील सर्व घटकांनी एकत्र येणे आवश्यक आहे. आर्थिक मदत, शिक्षणाच्या संधी, कठोर कायदे आणि समाजात जनजागृती हे या समस्येवरचे प्रभावी उपाय आहेत. मुलींना शिक्षण आणि स्वातंत्र्य मिळाल्यासच समाजाचा खरा विकास होईल आणि बालविवाहाचे दुष्टचक्र संपुष्टात येईल.

**- प्रभाकर वारुळे (७५८८१७६२७१)**

# स्वार्थ आवरल्याने परस्परप्रेम वाढते

परस्परांत प्रेम वाढविण्यासाठी काही गोष्टी आवश्यक आहेत. बारीकसारीक गोष्टींकडे दुर्लक्ष करून प्रत्येकाच्या स्वभावाला थोडी-थोडी सवलत ठेवावी. म्हणजे द्वेष वाटणार नाही. कोणतीही सूचना सांगायची झाली, तर त्या व्यक्तीविषयक न बोलता, नम्रतेने आणि गोड शब्दांत सांगावी. स्वार्थाला आळा घालणे, म्हणजे, मी स्वतः जितका माझ्याकरिता आहे असे वाटते, त्याच्याहीपेक्षा जास्त मी दुसऱ्याकरिता आहे असे वाटणे ही होय. ही जाणीव ठेवून त्याप्रमाणे वागणे हेच प्रेम वाढवायला मदत करते. स्वार्थाचा विचार करताना असे सहज वाटते की, मी कुठे स्वार्थी आहे? मी कुठे कुणाजवळ काय मागतो? पण एवढ्याने 'स्वार्थदृष्टी नाही' असे म्हणता येणार नाही. अहंकाराइतकाच स्वार्थ जबरदस्त आहे. जे दुसऱ्याने आपल्या बाबतीत करणे आपल्याला बरे वाटत नाही, ते आपण दुसऱ्याच्या बाबतीत न करणे; आणि त्याच्याच उलट, जे दुसऱ्याने आपल्याला केले तर बरे वाटते तेच आपण दुसऱ्याच्या बाबतीत करावे. हेच सर्वांचे सार आहे आणि हाच धर्म आहे.




गांवकरी ('गांवकरी प्रकाशन'चे व्यापारचिन्ह)
संस्थापक संपादक : स्व. द.शं. तथा दादासाहेब पोतनीस
संपादक, मुद्रक, प्रकाशक : वंदन अ. पोतनीस
मुख्य कार्यालय : 'गांवकरी भवन', टिळकपथ, नाशिक-४२२००१. फोन : २३०५०८०, २३०५०८१, २३०५०८२, २५९४५४६
विभागीय कार्यालये :
सिन्नर : हिरालाल टॉवर्स, बसस्टँडजवळ. ०२५५१-२२२५७८.
मालेगाव : पांजरापोळ शॉपिंग कॉम्प्लेक्स, शिवाजी पुतळा. २५५४-२३४२००
दिंडोरी : गाळा नं. २५, मार्केट कमिटीजवळ, निळवंडी रोड. ०२५५७-२२२५५५.
'गांवकरी प्रकाशन'साठी 'गांवकरी भवन', टिळकपथ, नाशिक येथे मुद्रित व प्रकाशित.
e-mail Id :-
1. gavmaha123@gmail.com
2. advtgvk@rediffmail.com
RNI REG. No.1934/57

## बाजार - कंपन्या - मनोरंजन

### विजय निकम झाले 'टायगरभाई'

**मुंबई :** अभिनेते विजय निकम यांनी आजवर वेगवेगळ्या



भूमिकांमधून प्रेक्षकांचं मनोरंजन केलं आहे. त्यांच्या नव्या चित्रपटाची सध्या जोरदार चर्चा सुरू आहे. चर्चेचे कारणही तसंच आहे. 'वीजी फिल्म्स'च्या 'आतली बातमी फुटली' चित्रपटात एका भाईची भूमिका ते साकारणार आहेत. 'टायगरभाई' असं त्यांच्या व्यक्तिरेखेचं नाव आहे. दिग्दर्शक विशाल पी. गांधी आणि जैनेश इजरदार यांचा 'आतली बातमी फुटली' हा नवाकोरा मराठी चित्रपट ६ जूनला प्रदर्शित होणार आहे. मी साकारलेला 'टायगरभाई' हा चित्रपटात खूपच धमाल करताना दिसणार आहे. भमिका ग्रे शेडची असली तरी माझ्या आजवरच्या भूमिकांपेक्षा वेगळी आहे 'आतली बातमी फुटली' या चित्रपटाची निर्मिती विशाल पी.गांधी आणि ग्रीष्मा अडवाणी यांची आहे. सह निर्माता अम्मन अडवाणी तर सहयोगी दिग्दर्शक जीवक मुनतोडे आहेत. चित्रपटाचे छायांकन अमित सुरेश कोडोथ तर संकलन रवी चौहान यांचे आहे. संगीत एग्रेल रोमन यांनी दिले आहे. कथा जैनेश इजरदार यांनी तर पटकथा जीवक मुनतोडे, अम्मन अडवाणी, जैनेश इजरदार, विशाल पी. गांधी यांची आहे. संवाद लेखन जीवक मुनतोडे, व अद्वैत करंबेळकर यांनी केले आहेत. वेशभूषा ग्रीष्मा अडवाणी यांची, नृत्यदिग्दर्शन राहुल ठोंबरे, तिजो जॉर्ज यांचे आहे. प्रॉडक्शन डिझायनर रवी नाईक आहेत. कास्टिंग दिग्दर्शन जोकीम थोरास यांनी केले आहे, तर कार्यकारी निर्माते अब्दुल खान आहेत. फिल्मास्त्र स्टुडिओजने या चित्रपटाच्या वितरणाची जबाबदारी सांभाळली आहे.

### सोने दरवाढीला लागला ब्रेक

**नवी दिल्ली :** आंतरराष्ट्रीय पातळीवर आणि भारतीय बाजारपेठांमध्ये सोन्याच्या दरात मोठी वाढ झाल्याचं पाहायला मिळाले होते. २२ एप्रिलला सोन्याच्या दरानं एक लाख रुपयांचा टप्पा पार केल्यानंतर आता सोन्याच्या दरवाढीला ब्रेक लागला आहे. इंडियन बुलियन असोसिएशन यांनी दिलेल्या माहितीनुसार सोन्याचे दर प्रति १० ग्रॅम ९५५६० रुपयांवर पोहोचले आहेत. आंतरराष्ट्रीय पातळीवर सोन्याच्या दरात १ टक्के घसरण झाली आहे. स्पॉट गोल्डचा दर ०.८ टक्के घसरुन ३३१४.९९ डॉलर प्रति औंसवर पोहोचला आहे. यूएस गोल्ड फ्यूचर्सचा दर ०.७ टक्के घसरुन ३३२५ डॉलर प्रति औंसवर आला आहे. जेव्हा गुंतवणूकदारंची भीती कमी होईल आणि सुरक्षित गुंतवणूक पर्याय म्हणून लोक सोन्यातील गुंतवणूक थांबवतील तेव्हा सोन्याची मागणी कमी होईल. जेव्हा सोन्याची मागणी कमी होईल तेव्हा त्याचे दर घटतील. तज्ज्ञांच्या माहितीनुसा जागतिक बाजारातील मंदीची भीती आणि आंतरराष्ट्रीय बाजारातील अनिश्चिततेच्या कारणानं सोन्याचे दर ३५००.०५ डॉलर प्रति औंस इथपर्यंत पोहोचले होते.

### पाकला मदत थांबविण्याची अर्थनीती

**नवी दिल्ली :** पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर, भारत पाकिस्तानला आंतरराष्ट्रीय निधी कमी करण्यासाठी रणनीती आखत आहे. यासाठी अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आशियाई विकास बँकेच्या (एडीबी) प्रमुखांची भेट घेतली आहे. निर्मला सीतारामन यांनी एडीबीचे संचालक मसातो कांडा यांची भेट घेतली आणि पाकिस्तानला देण्यात येणाऱ्या आर्थिक मदतीत कपात करण्याची मागणी केली. यासोबतच निर्मला यांनी इटलीचे अर्थमंत्री जियानकार्लो जॉर्जेट्टी यांची भेट घेतली आणि पाकिस्तानला निधी थांबवण्याबाबत चर्चा केली. पाकिस्तानला फायनान्शियल ॲक्शन टास्क फोर्सच्या ग्रे लिस्टमध्ये पाठवण्यासाठी भारत युरोपीय देशांशी बैठक घेत आहे. पाकिस्तानला मिळणारा पैसा दहशतवादासाठी वापरला जात असल्याचा भारताचा आरोप आहे. याआधी भारताने पाकिस्तानसोबतचा व्यापार थांबवणे, एरोस्पेसवर बंदी घालणे, व्हिसा निलंबित करणे आणि सिंधू जल करार रद्द करणे असे कठोर निर्णय घेतले आहेत. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीची ९ मे रोजी एक महत्त्वाची बैठक होणार आहे. भारताने पाकिस्तानला दिलेल्या १.३ अब्ज डॉलर्सच्या कर्जावर आक्षेप घेतला होता आणि म्हटले होते की पाकिस्तानला दिलेल्या पैशाचा वापर दहशतवादाला चालना देण्यासाठी होऊ शकतो म्हणून त्याचा पुनर्विचार करावा. तथापि, आयएमएफने भारताची विनंती स्वीकारण्यास नकार दिला आहे.

### अमेझॉन इंडियाकडून रेफरल फीमध्ये कपात

**पुणे : प्रतिनिधी** अमेझॉन इंडियाने देशभरातील लहान व्यवसायांना पाठबळ देण्यासाठी आजवरची सर्वांत मोठी रेफरल फीज कपात जाहीर केली आहे. कंपनीने ३०० रु. पेक्षा कमी किमतीच्या १.२ कोटी हून अधिक उत्पादनांवर शून्य रेफरल फीजचे धोरण स्वीकारले आहे. विक्री होणाऱ्या प्रत्येक उत्पादनासाठी रेफरल फी लागू असते. ती उत्पादन श्रेणीनुसार बदलते आणि उत्पादनाच्या एकूण विक्री किमतीच्या टक्केवारीप्रमाणे मोजली जाते. कंपनीने १ किलोपेक्षा हलक्या वस्तूंसाठी वजन हाताळणी शुल्कात १७ रु. पर्यंत कपात केली आहे.त्यामुळे विक्रेत्यांना अमेझॉनला द्याव्या लागणाऱ्या एकूण शुल्कात कपात होईल.एकाच वेळी एकाहून अधिक उत्पादन युनिट्स शिप करणाऱ्या विक्रेत्यांना दुसऱ्या युनिटवर ९० टक्के पर्यंत विक्री शुल्क बचत होणार आहे. या बदलांमुळे विक्रेत्यांना अधिक विस्तृत निवड देणे, वाजवी किमती राखणे आणि त्यांचा व्यवसाय वाढवणे शक्य होईल. महाराष्ट्रातील एकूण १ लाख ९० हजार हून अधिक विक्रेत्यांपैकी विक्री करणारे पुणे आणि आसपासच्या शहरांमधील होमकिचन,पर्सनलकेअर,वायरलेस प्रॉडक्ट्स, लॉनगार्डन यांमधील ३०० रु. पेक्षा कमी किमतीची उत्पादने विक्री करणारे हजारो विक्रेते आधीपासूनच याचे लाभ घेत आहेत. डायरेक्टर ऑफ प्रॉडक्ट मॅनेजमेंट विक्रम देशपांडे यांनी ही माहिती सांगितली, कोट्यवधी उत्पादनांवर रेफरल फी रद्द करून व शिपिंग खर्चात बदल करून, विक्रेत्यांसाठी वाढीची अधिक आकर्षक संधी निर्माण करत आहोत. हा गतिमान प्रदेश भारतातील १६ लाखांहून अधिक विक्रेत्यांच्या नेटवर्कमध्ये महत्त्वाचा वाटा उचलतो, असे त्यांनी सांगितले.

# प्रशासकीय क्षमता विस्तारण्यासाठी टेकवारी मार्गदर्शक

## उपमुख्यमंत्री पवार : महाराष्ट्र टेक लर्निंग वीकचे उद्घाटन

**मुंबई :**

प्रशासन काळानुरूप बदल स्वीकारणारे असेल तर लोकांना अधिक गतिमान, पारदर्शक व चांगल्या सेवा मिळू शकतात. सामान्य प्रशासन विभागाने आयोजित केलेला 'टेकवारी': महाराष्ट्र टेक लर्निंग वीक' हा उपक्रम राज्यातील प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी प्रशासकीय क्षमता विस्तारण्यासाठी मार्गदर्शक ठरेल. आपण बदलांचा केवळ स्वीकार करत नसून बदलाचे नेतृत्व करत असल्याचा संदेश 'टेकवारी' उपक्रमाच्या माध्यमातून जाईल, असे मत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केले.

मंत्रालयातील त्रिमूर्ती प्रांगण येथे टेक वारी : महाराष्ट्र टेक लर्निंग वीकचे उद्घाटन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते झाले. यावेळी माहिती व तंत्रज्ञान मंत्री आशिष शेलार, प्रभारी मुख्य सचिव




राजेश कुमार, महाराष्ट्र सदनच्या आयुक्त आर.विमला, प्रसिद्ध वक्ते प्रभु गौर गोपालदास यासह ज्येष्ठ सनदी अधिकारी, मंत्रालयातील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, ५ ते ९ मे दरम्यान टेक वारी अंतर्गत हा प्रशिक्षण उपक्रम राबविण्यात येत आहे. प्रशिक्षण कार्यक्रमातील प्रसिद्ध वक्ते प्रभु गौर गोपाल दास यांच्या मार्गदर्शनाचा फायदा सर्वांनाच होईल. ब्लॉकचेन, इंटरनेट ऑफ थिंग्ज्, सायबर सुरक्षा, डिजिटल फायनान्स 'तंत्रज्ञानाच्या माध्यमातून प्रशासनाचे परिवर्तन' 'कृत्रिम बुद्धिमत्ता'', विकसित महाराष्ट्रासाठी फ्रंटियर टेक' अशा क्षेत्रातील तज्ज्ञ विविध मार्गदर्शन सत्रांद्वारे हे विषय सोप्या पद्धतीने समजावून सांगणार आहेत. काळानुरूप बदल सगळ्यांनी स्वीकारून प्रशासन अधिक गतिमान करावे, असे आवाहन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केले.

उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, टेक-वारीमध्ये तणाव व्यवस्थापन, संगीत थेरपी, ध्यानधारणा, कार्य-जीवन समतोल या विषयांवरील मार्गदर्शन सत्रे आयोजित केली आहेत. यामुळे संतुलित व सुदृढ शासकीय कर्मचारी वर्ग घडविण्यास मदत होईल.

माहिती तंत्रज्ञानमंत्री शेलार म्हणाले की, महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमाच्या माध्यमातून लोकाभिमुख काम करणारे महाराष्ट्र राज्य प्रत्येक क्षेत्रात पुढे आहे. 'आय गॉट' वर प्रशिक्षण पूर्ण करण्यात आपले राज्य पहिल्या तीनवरून प्रथम क्रमांक प्राप्त करेल.

प्रशासनाने अधिक गतिमान सेवा देण्यावर भर द्यावा. आपल्या प्रत्येकाच्या कामाच्या मूल्यमापनातूनच एकंदरीत कामाचे मोजमाप होत असते महाराष्ट्र प्रत्येक क्षेत्रात आघाडीवर आहे. प्रत्येक बदलाला सामोराही जात आहे. प्रशासनातील अधिकारी व कर्मचारी देखील हे बदल स्वीकारून आपले काम अधिक गतीमान पद्धतीने करतील, असा विश्वास मंत्री शेलार यांनी व्यक्त केला.

# निफ्टीचा विक्रम, सेन्सेक्सने घेतली २९५ अंकांची उसळी

**मुंबई :**

भारतीय शेअर बाजारात काल (दि.५) मोठी तेजी दिसून आली. सेन्सेक्स २९५ अंकांनी वाढला. परदेशी गुंतवणूकदारांकडून सतत खरेदी आणि कच्च्या तेलाच्या किमतीत घसरण झाल्यामुळे बाजारातील भावना सकारात्मक राहिल्या. यामुळे गुंतवणूकदारांच्या संपत्तीत ४.७८ लाख कोटींची वाढ झाली.

शेअर बाजारात चौफेर वाढ होती. बीएसई मिडकॅप निर्देशांक १.४५ टक्क्यांनी वधारला. तर स्मॉलकॅप निर्देशांक १.२३ टक्क्यांनी वाढला. बँकिंग वगळता इतर सर्व क्षेत्रीय निर्देशांकही वधारले. ऑटो आणि तेल आणि वायू शेअर्समध्ये सर्वाधिक वाढ दिसून आली. व्यवहाराच्या शेवटी सेन्सेक्स २९४.८५ अंकांनी वधारून ८०,७९६.८४ वर बंद झाला. तर निफ्टी ११४.४५ अंकांनी वाढून २४,४६१.१५ वर बंद झाला. बीएसईवर सूचीबद्ध कंपन्यांचे एकूण बाजार भांडवल ५ मे रोजी ४२७.५९ लाख कोटी रुपयांवर पोहोचले, जे मागील व्यवहार दिवशी म्हणजेच शुक्रवार, २ मे रोजी ४२२.८१ लाख कोटी रुपये होते.अदानी पोर्ट्सचे शेअर्स ४.११%, बजाज फायनान्स २.७०%, एसबीआय १.५१% वधारले. इंडसइंड बँक, टाटा मोटर्स, आयटीसी, टाटा स्टील आणि मारुती सुझुकी यांचे शेअर १% ने वाढून बंद झाले. नेस्ले इंडिया, एनटीपीसी आणि कोटक बँकेचे शेअर्स १% पेक्षा जास्त घसरले.

निफ्टीच्या ५० पैकी ३२ समभागांमध्ये घसरण झाली. एनएसईच्या क्षेत्रीय निर्देशांकांमध्ये, धातू, रिअल्टी आणि ग्राहकोपयोगी वस्तूंमध्ये सर्वाधिक घसरण झाली. तर, आयटी, मीडिया आणि बँकिंग समभागांमध्ये किंचित वाढ दिसून आली.

# चौथ्या तिमाहीत महिंद्राचा नफा २२ टक्के वाढला

**मुंबई :**
**देशातील सर्वांत मोठी एसयूव्ही उत्पादक कंपनी महिंद्रा अँड महिंद्रा (एम अँड एम) ने २०२४-२५ या आर्थिक वर्षाच्या चौथ्या तिमाहीत २,४३७ कोटी रुपयांचा नफा (स्वतंत्र निव्वळ नफा) कमावला आहे. वार्षिक आधारावर त्यात २१.८५ टक्के वाढ झाली आहे. गेल्या वर्षी कंपनीला २००० कोटी रुपयांचा नफा झाला होता.**

जानेवारी-मार्च तिमाहीत एम अँड एमने ३१,३५३ कोटींचा महसूल कमावला, जो मागील वर्षाच्या तुलनेत २५% जास्त आहे. जानेवारी-मार्च २०२४ मध्ये कंपनीने २५,१८३ कोटी रुपयांचा महसूल मिळवला. वस्तू आणि सेवांच्या विक्रीतून मिळणारे पैसे म्हणजे महसूल.

कंपनीचा नफा वार्षिक आधारावर २१.८५% ने वाढला आहे, परंतु तिमाही आधारावर तो १७.७८% ने कमी झाला आहे. ऑक्टोबर-डिसेंबरमध्ये महिंद्राला २,९६४ कोटी रुपयांचा नफा झाला. त्याच वेळी, २०२४ च्या आर्थिक वर्षाच्या तुलनेत २०२५ या आर्थिक वर्षात कंपनीचा नफा ११.४०% वाढला आहे.

**कन्सॉलिडेटेड आर्थिक निकाल**

हे कंपन्यांच्या गटाची आर्थिक कामगिरी दर्शवते. हे मूळ कंपनीची तसेच तिच्या सर्व उपकंपन्या आणि संयुक्त उपक्रमांची आर्थिक स्थिती दर्शवते. एकत्रित निकालामध्ये सर्व युनिट्सचे उत्पन्न, खर्च, मालमत्ता आणि दायित्वे समाविष्ट आहेत.

**स्टँडअलोन आर्थिक निकाल**

हे केवळ एकाच कंपनीची (मूळ कंपनी किंवा स्वतंत्र युनिट) आर्थिक स्थिती दर्शवते. त्यामध्ये फक्त स्वतः चालणाऱ्या कंपनीचे उत्पन्न, खर्च, मालमत्ता आणि दायित्वे समाविष्ट असतात. कंपनी तिच्या स्वतंत्र कामकाजातून किती फायद्यात आहे किंवा तोट्यात आहे, हे समजून घेण्यासाठी याचा वापर केला जातो.

**एक वर्षात महिंद्राचा शेअर ३६ टक्के वाढला**

निकालांनंतर, महिंद्राचे शेअर्स सोमवार, ५ मे रोजी ३.३४% वाढून ३,०२४ रुपयांवर बंद झाले. कंपनीच्या शेअर्सनी गेल्या ५ दिवसांत २.७२%, एका महिन्यात २१.३८%, ६ महिन्यांत ४.३०% आणि एका वर्षात ३५.९१% परतावा दिला आहे. या वर्षी म्हणजेच १ जानेवारी २०२५ पासून आतापर्यंत महिंद्राचा वाटा १.८८% ने घसरला आहे. कंपनीचे मार्केट कॅप ३.६२ लाख कोटी रुपये आहे.

# अविवा लाइफ इन्शुरन्स सलग सातव्या वर्षी 'सर्वांत विश्वासार्ह ब्रँड'

**नाशिक :**

विश्वासाचा अतूट वारसा जपत असताना अविवा लाइफ इन्शुरन्सला टीआरएच्या ब्रँड ट्रस्ट रिपोर्टकडून सलग सातव्या वर्षी भारतातील सर्वांत विश्वासार्ह प्रायव्हेट लाइफ इन्शुरन्स ब्रँड म्हणून गौरव करण्यात आला आहे. खासगी जीवन विमा क्षेत्रात आपले नेतृत्व आणखी सक्षम करत असताना अविवा इंडियाने आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्ये ३० दिवसांत १०० टक्के क्लेम सेटलमेंट करून सर्वोत्तम क्लेम सेटलमेंट टर्न अराऊंड साध्य केला आहे.

अविवा लाइफ इन्शुरन्सचे मुख्य मार्केटिंग अधिकारी विनित कपाही यांनी कृतज्ञता व्यक्त करताना सांगितले की, अविवामध्ये आम्ही पारंपरिक संरक्षणापलीकडे जाऊन वचनबद्धता दर्शवतो. आम्ही प्रतिबंध, आरोग्य आणि सर्वांगीण कल्याण यांच्यावर लक्ष केंद्रीत करून लाइफ इन्शुरन्सच्या क्षेत्राची व्याख्या नव्याने करण्यावर भर देत आहोत.

ग्राहकांना सकारात्मक उपाययोजना, आरोग्यासंबंधी माहिती आणि वैयक्तिक मार्गदर्शन देऊन आम्ही त्यांना अधिक सुदृढ आणि संपूर्ण आयुष्य जगण्यास मदत करतो. सलग सातव्या वर्षी भारताचा सर्वांत विश्वासार्ह लाइफ इन्शुरन्स ब्रँड म्हणून मिळालेला गौरव आमचे प्रयत्न खऱ्या अर्थाने त्यांच्या गरजा आणि महत्त्वाकांक्षांशी जुळणारे आहेत हे सिद्ध करतो.अविवा लाइफ इन्शुरन्स जीवनविमा उत्पादनांची एक संपूर्ण श्रेणी देऊन आपल्या विश्वासाच्या वारशावर कार्यरत राहण्यावर भर देत आहे. त्यात गॅरंटीड सेव्हिंग प्लॅन्स, टर्म प्लॅन्स, इन्व्हेस्टमेंट सोल्यूशन्स आणि रिटायरमेंट प्लॅन्सचा समावेश आहे. कंपनीने अलीकडेच अविवा सिग्नेचर ३डी टर्म प्लॅन- प्लॅटिनम आणला आहे. टीआरए रिसर्चचे मुख्य कार्यकारी अधिकारी एन. चंद्रमौली यांनी अविवाच्या या उतम कामगिरीबाबत बोलताना सांगितले की, आम्ही अविवा लाइफ इन्शुरन्सचे पुन्हा एकदा प्रायव्हेट लाइफ इन्शुरन्स श्रेणीत सर्वाधिक विश्वासू ब्रँड म्हणून झालेल्या गौरवाबाबत अभिनंदन करतो. हा सातत्यपूर्ण गौरव अविवावरील ग्राहकांच्या विश्वासाचे व विश्वासू आणि ग्राहककेंद्री विमा उपाययोजना देण्यातील त्यांच्या वचनबद्धतेचे प्रतीक आहे, असे सांगितले.

# दहापैकी सात गंभीर दम्यांचे होईना निदान

## इनहेलेशनथेरपी ठरतेय महत्त्वपूर्ण

**नाशिक : प्रतिनिधी**

दमा हा अतिशय जुनाट श्वसनरोग असून, अजूनही भारतात दहापैकी सात गंभीर दम्यांचे निदान करता आलेले नाही. सर्वांसाठी इनहेलर उपचार उपलब्ध करून द्या. या दम्यासाठी जागतिक पुढाकार या थीमसह, यावर्षीचा जागतिक दमा दिन साजरा करण्याचे आरोग्य विभागाचे नियोजन आहे.

असंसर्गजन्य आजारांशी संबंधित मृत्यूंमध्ये दमा आणि इतर जुनाट श्वसन रोग हे प्रमुख तीन कारणांपैकी एक आहेत, जे देशभरातील एकूण मृत्यूंपैकी निम्मे आहे. तरीही, दम्याची गंभीर लक्षणे असलेल्या अंदाजे ७० टक्के व्यक्तींचे निदान झालेले नाही.

२.५ टक्क्यांपेक्षा कमी लोक दररोज इनहेल्ड कॉर्टिकोस्टिरॉईड्स वापरतात. जे सहसा व्यापक कलंक आणि गैरसमजांमुळे शिफारस केलेले उपचार आहे. या आव्हानांचा सामना करण्यासाठी दीर्घकालीन, सहयोगी दृष्टीकोन आवश्यक आहे. सिप्लाचा बेरोक जिंदगी हा गेल्या अर्ध्या दशकाहून अधिक काळापासून सुरू असलेला आणि टफीज यासारख्या सार्वजनिक कँपेन, कंपनीच्या ब्रीद उपक्रमासह - ज्याने एफवाय २४-२५ मध्ये १ कोटींहून अधिक लोकांचे जीवन जगले आहे, दम्याबद्दल माहितीपूर्ण संभाषणे वाढविण्यास मदत करत आहेत.

इनहेलेशन थेरपीचे महत्त्व आणि सुलभ उपचारांच्या गरजेवर जोर देऊन चेस्टतज्ज्ञ डॉ. दिनेश वाघ म्हणाले, दम्याच्या व्यवस्थापनाची प्राथमिक उद्दिष्टे म्हणजे लक्षणे नियंत्रित करणे, बचाव औषधांवरील अवलंबित्व कमी करणे, रुग्णालयात दाखल होण्यापासून रोखणे आणि फुफ्फुसांचे कार्य राखणे. हे परिणाम साध्य करण्यासाठी वेळेवर निदान करणे, योग्य इन्हेलरचा वापर आणि सातत्यपूर्ण अनुपालन आवश्यक आहे. इनहेलरच्या वापराविषयीच्या गैरसमजांमुळे आणि त्या आजाराचे नाव न सांगण्याची अनिच्छा यामुळे अनेकदा निदान आणि उपचारांमध्ये विलंब होतो. सतत जागरूकता, लवकर शिक्षण आणि सार्वजनिक आणि खाजगी दोन्ही क्षेत्रांकडून सामूहिक प्रयत्नांची आवश्यकता असते जेणेकरून दमा ओळखला जाईल, स्वीकारला जाईल आणि प्रभावीपणे उपचार केला जाईल.

# सर्जिकल रोबोटिक सिस्टिमचे मणिपाल हॉस्पिटलमध्ये उद्घाटन

**नाशिक : प्रतिनिधी**

मल्टिस्पेशॅलिटी सर्जरीजमध्ये दि एसएसआय मंत्रा सर्जिकल रोबोटिक सिस्टिम या अत्याधुनिक अशा पद्धतींची सुरुवात प्रथमच बाणेर येथील मणिपाल हॉस्पिटलमध्ये करण्यात आली आहे. यामुळे रुग्णसेवा विभागात आणखी एक आधुनिक पद्धतीची सुरुवात झाली आहे.

या नवीन पद्धतीमुळे हॉस्पिटल कडून आता अगदी अचूक आणि मिनिमली इन्व्हेझिव्ह शस्त्रक्रिया करता येणार आहेत. यामुळे कार्डिक थोरॅसिस, ऑन्कोलॉजी, युरोलॉजी, गायनॅकोलॉजी आणि जनरल सर्जरी क्षेत्रात नवीन क्रांती झाली आहे.

मणिपाल हॉस्पिटल, बाणेरने आता हा आणखी एक महत्त्वपूर्ण टप्पा पार केला असून यामुळे रोबोटिक असिस्टेड सर्जरी मधील नवीन मार्ग खुला झाला आहे. यामुळे अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याची त्यांची वचनबध्दता अधोरेखित होऊन रुग्णांच्या सेवेकरता असलेली रुग्णकेंद्रित सेवा देण्याची वचनबध्दता सुध्दा अधोरेखित झाली आहे.

यावेळी बोलतांना पुण्यातील बाणेर येथील मणिपाल हॉस्पिटल च्या सर्जिकल ऑन्कोलॉजी आणि सर्जरी चे विभाग प्रमुख आणि कन्सल्टंट डॉ. अमीत पारसनीस यांनी सांगितले रोबोटिक असिस्टेड सर्जरी मुळे अनेक लाभ होतात, यांतील महत्त्वाचा लाभ म्हणजे अजोड अचूकता आणि सटीक पणे सर्जरी करता येते. अगदी छोट्या जखमेतून सर्जरी करता येते यामुळे सर्जन पूर्ण नियंत्रण मिळवून अतिशय नियंत्रितपणे काम करु शकतात, त्यामुळे चांगले निष्कर्श मिळतात. रोबोच्या आधुनिक ३डी क्षमतांमुळे परंपरागत लापारोस्कोपी च्या तुलनेत सर्जन अकि चांगल्या प्रकारे झुम करु शकत असल्याने पेशींची हाताळणी योग्य पध्दतीने करु शकतात. रोबोटिक सिस्टम मुळे सर्जनला सुधारीत रिझॉल्युशन मिळते, चांगल्या प्रकारे काम करता येते ज्यामुळे अधिक चांगली सर्जरी




होऊन रुग्णाला आराम मिळतो. बाणेर येथील मणिपाल हॉस्पिटल चे कन्सल्टंट युरोलॉजी डॉ. आनंद धारसकर यांनी सांगितले रोबोटिक्स मुळे किडनी ट्रान्सप्लान्टेशन मध्ये मोठा लाभ होऊ लागला आहे.

पुण्यातील मणिपाल हॉस्पिटलचे क्लस्टर डायरेक्टर आनंद मोटे यांनी सांगितले, मणिपाल हॉस्पिटल्समध्ये आमचे प्रमुख लक्ष्य म्हणजे रुग्णांना जगभरांत उपलब्ध असलेले अत्याधुनिक आरोग्य सेवांमधील नाविन्य उपलब्ध करुन देणे आहे. अर्गोनॉमिक कंट्रोल्स, ३डी ४ के इमेजिंग आणि जागतिक सुरक्षा पध्दतींमुळे आता सर्जिकल युगात नवीन क्रांती घडणार आहे.

# गुंतवणूक करा आईसारखी : बाळगा संयम, शिस्त अन् दीर्घकालीन दृष्टिकोन

प्रत्येक आई आपल्या जगात विलक्षण पद्धतीने वावरत असते. तिच्या वागण्यात एक अद्वितीय जादू, अपार काळजी, विलक्षण दूरदृष्टी आणि आपल्या प्रियजनांच्या भल्यासाठी दृढ बांधिलकी असते. मर्यादित साधनसंपत्तीचा सुज्ञ वापर करून प्रत्येक गरज पूर्ण करणं असो किंवा मुलांच्या भविष्याची अनेक वर्षे आधीपासून आखणी करण्यापर्यंतचे काम असो; आईचा दृष्टिकोन हा नेहमीच दीर्घकालीन विचारांचा आणि सातत्यपूर्ण कृतीचा उत्तम नमुना अगदी मास्टरक्लास असतो. विशेष म्हणजे, आईमध्ये असलेले संयम, अढळ शिस्त आणि दीर्घकालीन दृष्टीकोन हे गुण हुशार गुंतवणूकदारांमध्येही असतात. कुशाग्र गुंतवणूकदाराची ही वैशिष्ट्ये मानली जातात. हे गुण फक्त पिढ्यान्पिढ्या हस्तांतरित होणारे संस्कार नाहीत; तर संपत्ती निर्मितीचे मूलभूत स्तंभ आहेत. आईच्या प्रेमळ आणि योजनाबद्ध वाढीच्या दृष्टिकोनाशी ते मिळतेजुळते आहेत.

**गुंतवणुकीसाठी आईकडून मिळणारे धडे**

जेव्हा आपण पाहतो की आई घर, कुटुंब आणि आर्थिक व्यवहार कसे हाताळते, तेव्हा हे स्पष्ट होते की आई हे निर्णय विचारपूर्वक आणि अंतःप्रेरणेने घेत असते. जोडीला सातत्य व प्रेम, भावना आणि व्यवहारिकता तसेच वर्तमान आणि भविष्य यांच्यात योग्य तो समतोल राखतात. हे अबोल शहाणपण पैशाची विचारपूर्वक हाताळणी, भविष्याची आखणी आणि आपल्या प्रियजनांच्या आयुष्याला आकार देणाऱ्या निर्णयांबाबतची बांधिलकी याबाबत मौल्यवान धडे देते.

**संयमः प्रक्रियेवर विश्वास ठेवणे**

बालपणीच्या सुरुवातीच्या वर्षांचा विचार करा. एक आई आपल्या बाळाने पहिले शब्द बोलण्याची, पहिले पाऊल टाकण्याची किंवा त्याच्या आवडी-निवडी शोधण्याची संयमाने वाट पाहते. ती घाई करत नाही. फक्त वाढीवर आणि क्षमतेवर शांतपणे विश्वास ठेवते. गुंतवणुकीबाबतही काही वेगळं नसतं. बाजार वर-खाली होतात, पण दीर्घकाळ गुंतवणूक ठेवल्यास संपत्ती शांतपणे वाढते. अल्पकालीन चढ-उतारांमुळे विचलित होणं स्वाभाविक आहे पण बालपणातील महत्त्वाच्या टप्प्यांप्रमाणेच, आर्थिक टप्प्यांनाही वेळ लागतो. एसआयपी ही संकल्पना उत्तमरित्या प्रत्यक्षात आणतात. सातत्यपूर्ण, लहान गुंतवणुकींमुळे कालांतराने संपत्ती वाढते. तांत्रिकदृष्ट्या, एसआयपी हे एक शिस्तबद्ध गुंतवणुकीचे साधन आहे. येथे गुंतवणूकदार नियमित अंतराने म्युच्युअल फंडात निश्चित रक्कम गुंतवतात. त्यामुळे रुपी-कॉस्ट ॲव्हरेजिंग आणि चक्रवाढ व्याजाचा लाभ घेत संपत्ती निर्माण करायला त्यांना मदत होते.

**शिस्तः छोट्या कृती, मोठे परिणाम**

आईच्या दैनंदिन जीवनशैलीत शिस्त हा महत्त्वाचा घटक असतो. तिच्या छोट्या-छोट्या नियमित कृती भविष्यात मोठे परिणाम घडवतात. पालकत्वा प्रमाणे गुंतवणुकीतही हेच लागू होते. भविष्य घडवते आणि लवचिकता निर्माण करते. अगदी मार्केटच्या घसरणीत किंवा वैयक्तिक अडचणींच्या काळातसुद्धा एसआयपी

**रोहित मट्टू**
**नॅशनल हेड - रिटेल सेल्स, ॲक्सिस म्युच्युअल फंड**

च्या माध्यमातून नियमित गुंतवणूक करणे यातून आर्थिक ताकद तयार होते. काही एसआयपी हप्ते वगळणे किरकोळ वाटू शकते, पण यामुळे दीर्घकालीन उद्दिष्टांवर परिणाम होतो. जसे पालनपोषणात सातत्य महत्त्वाचे असते, तसेच गुंतवणुकीतही सातत्य हे यशस्वीतेचे गमक आहे.

**दीर्घकालीन दृष्टिकोनः मोठे चित्र पाहणे**

आई कधीच फक्त आजचा विचार करत नाही. ती नेहमीच भविष्यासाठीही नियोजन करत असते. शाळेच्या फीपासून लेकराच्या लग्नापर्यंत ती कित्येक वर्षे अगोदर नियोजन करते. हा दीर्घकालीन दृष्टिकोन गुंतवणुकीसाठीही महत्त्वाचा आहे. संपत्ती निर्माण करणे म्हणजे केवळ ट्रेंडच्या मागे धावणे नव्हे; तर मार्गावर टिकून राहणे आहे. शिक्षण निधी तयार करणे, घर विकत घेणे किंवा निवृत्तीचा फंड तयार करणे अशी उद्दिष्टाधारित गुंतवणूक करण्यासाठी आईच्या योजनाबद्ध दृष्टिकोनासारखा प्रत्येक महत्त्वाच्या निर्णयात पुढे पाहणारा आवश्यक आहे.

**आईसारखी गुंतवणूक करणे : एक वारसा घडवण्याची प्रक्रिया**

आई फक्त आजची काळजी करत नाही. ती शांतपणे भविष्य घडवते. मग ते मुलाच्या शिक्षणासाठी बचत करणे असो किंवा त्याला पैशाची किंमत शिकवणे असो. तिच्या छोट्या, सातत्यपूर्ण कृती मजबूत पाया निर्माण करतात. एसआयपीदेखील त्याच मार्गाने चालतात. विचारपूर्वक, स्थिर आणि काळजीपूर्वक. अगदी आईच्या प्रयत्नांसारखी काळाच्या ओघात या नियमित गुंतवणुकीचीही ताकद वाढते. गुंतवणूक झटपट नफा मिळवण्यासाठी नसते, तर अनिश्चिततेतही धैर्याने टिकून राहण्यासाठी असते. आईच्या निष्ठेप्रमाणेच, एसआयपीआर्थिक शिस्त आणि लवचिकता रुजवतात. कुटुंबांना त्यांच्या उद्दिष्टांपर्यंत पोहोचण्यासाठी मदत करतात आणि संपत्तीबरोबर शहाणपणही पुढच्या पिढीला हस्तांतरित केले जाते.

आईसारखी गुंतवणूक करणे म्हणजे संयमाच्या शक्तीवर विश्वास ठेवणे, मार्गावर टिकून राहणे, आणि एक सुरक्षित, स्वावलंबी आणि संधींनी भरलेले भविष्य घडवणे. ही केवळ हुशार गुंतवणूक नाही, हा एक अमूल्य वारसा आहे.

## महत्त्वाचे

### फायजा शेखला ९०.६७ टक्के गुण



**वडाळागाव :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने घेतलेल्या बारावीच्या परीक्षेत एस एम आर के महिला महाविद्यालयाची विद्यार्थिनी फायजा सलीम शेख ६०० पैकी ५४४ मार्क घेऊन ९०.६७ टक्के घेत उत्तीर्ण झाली आहे. फायजा शेख हिच्या यशाबद्दल तिचे सर्वत्र कौतुक होत आहे.

### यशवंत क्लासेसचे यश!
#### विज्ञान, कॉमर्सचा शंभर टक्के निकाल

**नाशिक :** बारावीच्या विज्ञान आणि कॉमर्स या दोन्ही शाखांमध्ये १०० टक्के निकाल मिळवून यशवंत क्लासेसच्या विद्यार्थ्यांनी इतिहास रचला आहे. यशवंत क्लासेसचे संचालक प्रा.भालचंद्र पाटील सर्व विषयांचे तज्ज्ञ शिक्षक शिक्षिका, विद्यार्थी आणि पालक या सर्वांनी मिळून या यशाचा आनंद काल यशवंत क्लासेसमध्ये साजरा केला. विज्ञान शाखेचा कार्तिक पुरोहित ९३.२% गुणांसह प्रथम झाला. दर्शना पाटील (८९.१%), हुसैन शेख (८६.२५%), महेश गवळी (८२.१२%), आणि हर्षदा पाडवी (८१.६%) यांनीही उत्तम गुण मिळवून क्लासेसचे नाव उज्ज्वल केले.

**वाणिज्यमध्येही यश**

वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांनी १०० टक्के यश मिळवल्यामुळे प्राचार्यांनी अभिनंदन केलं. हा निकाल फक्त मुलांच्या मेहनतीचा नव्हे, तर पालक आणि शिक्षकांच्या समर्पणाचाही परिणाम आहे, असं त्यांनी स्पष्ट केले.

### सर्वतीर्थ टाकेद महाविद्यालयात मुलींचीच बाजी



**वासाळी :** इगतपुरी तालुक्यातील न्यू इंग्लिश स्कूल व ज्युनिअर कॉलेज टाकेद विद्यालयाचा बारावीच्या विज्ञान शाखेचा निकाल ९८.३३ तर कला शाखेचा निकाल ९१.९७ टक्के लागला. दोन्ही शाखेत मुलींनीच बाजी मारली आहे. विज्ञान शाखेत एकूण २४० विद्यार्थी परीक्षेला बसले होते. त्यापैकी २३८ उत्तीर्ण झाले. उत्कर्षा अजिंक्य झेंडे हिने ७८.५० टक्के गुण मिळवून प्रथम, ओमकार बाळासाहेब बऱ्हे ७३.१७ टक्के गुण मिळवून द्वितीय तर श्रध्दा राजेश होन ७३ टक्के, गुण मिळवून तृतीय आली. धनश्री युवराज क्षीरसागर (७२.१७) दीक्षा शिवाजी गाढवे (७१.५०) यांनी अनुक्रमे चतुर्थ व पाचवा क्रमांक पटकावला. कला शाखेतही मुलींनीच बाजी मारली असून या परीक्षेत १३७ विद्यार्थी प्रविष्ट होते. त्यापैकी १२६ मुले उत्तीर्ण झाले आहेत. या शाखेत कु. आरती गोविंद भोईर (७६.८३), सुप्रिया सोपान माळी (७४.३३), करण एकनाथ करवंदे (७२.८३) यांनी अनुक्रमे प्रथम,द्वितीय, तृतीय क्रमांक पटकावला. योगिता मोहन धादवड (७१.८३) रविना पांडुरंग घाणे (६९.१७) यांनी अनुक्रमे चतुर्थ व पाचवा क्रमांक पटकावला. यशस्वी विद्यार्थ्यांचे प्राचार्य संजय पाटील, प्रा. अशोक म्हस्के, विलास खापरे, संस्थेचे अध्यक्ष राजेंद्र नलगे, सचिव प्रकाश जाधव, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष तथा संचालक प्रा. डॉ. अशोक तुवर,माजी प्राचार्य एस. जी. आभाळे,प्रमोद परदेशी,कदम भाऊसाहेब, जायभाये, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

### प्रोग्रेसिव्ह कॉलेजचा निकाल शंभर टक्के

**नाशिक रोड :** जेलरोड येथील प्रोग्रेसिव्ह सायन्स अॅन्ड कॉमर्स ज्युनिअर कॉलेजचा निकाल शंभर टक्के लागला. विज्ञान शाखेत निनाद गाढे (६३.५०) प्रथम तर आज्ञा शिंदे (६०.८३) व्दितीय आली. वाणिज्य शाखेत यश रत्नपारखी (८६.६७) प्रथम, तन्वी भोले (८६५.८३) व्दितीय आणि दिया पटेल (८२.८३) तृतीय आली. विज्ञान शाखेचे २३ तर वाणिज्य शाखेचे २० विद्यार्थी परीक्षेला बसले होते. सर्व उत्तीर्ण झाले.

### डॉ. गुजर सुभाष महाविद्यालयाचा निकाल ९७ टक्के

**देवळाली कॅम्प :** येथील शैक्षणिक वर्ष २०२४-२५ डॉ. गुजर सुभाष हायस्कूलच्या हिंदी मीडियम व ज्यु. कॉलेज ऑफ कॉमर्सचा निकाल ९७.८७ तर सायन्सचा ९७.८२ टक्के लागला. कॉमर्स शाखेमध्ये मन्सुरी फलक जफर ९०.५०% गुण मिळवून प्रथम , शेख सामिया व बसरानी श्रुती रमेश ९०.३३ टक्के गुण मिळवून द्वितीय, चावला लविना जयराम ८९.००% गुण प्राप्त करुन तृतीय आली. विज्ञान शाखेत अंजली विनोद तिवारी ७८ टक्के गुण मिळवून प्रथम, विद्या सोमनाथ धोंगडे ७४.टक्के गुण मिळवून द्वितीय तर श्रेया रविंदर कुमार कोरी ७३.टक्के गुण मिळवून तृतीय आली. यशस्वी विद्यार्थ्यांचा संस्थेचे अध्यक्ष तिरथ वासवानी, उपाध्यक्ष अनिल ग्यानचंदानी, चेअरमन नवीन गुरनानी, उपकार्याध्यक्ष मुलचंद आहुजा, सचिव रतन चावला , सहसचिव चंद्रकांत वेन्सियानी, विजय चावला, तेजपाल चावला, डॉ. विजय चावला, सुंदरसिंघ नरसिंघानी, घनश्याम केवलानी, सचिन चाफेकर, प्रकाश लखवानी, हिरो रिझवानी, रवी मेवानी, सुदेश अमेसार, सुनिल बालानी, राजेश मंगतानी यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देत सत्कार करण्यात आला. यावेळी मुख्याध्यापक बन्सीलाल गाडीलोहार, शितल मेहेरोलिया, सिमरन चावला, सोपान कांगणे, प्रियंका अहुजा, ज्योती फोकणे, विजय पाटिल, शिल्पा जाधव, भाग्यश्री चावला, गुरप्रित कौर ढिलौ, नरेंद्र सोनवणे, राम धोंगडे, गौरव अमेसार, सागर घोरपडे, भाऊसाहेब घनदाट, राहुल ससाने उपस्थित होते.

### आडगाव टप्पा येथे आज खंडेराव महाराज यात्रोत्सव

**सोग्रस :** आडगाव टप्पा (ता. चांदवड) येथील श्री खंडेराव महाराज यात्रोत्सवानिमित्त मंगळवारी (दि.६) विविध कार्यक्रम आयोजित केले आहेत. दुपारी तीन वाजता काठी व श्री खंडेराव महाराज रथ मिरवणूक काढण्यात येईल. सायंकाळी पाच वाजता बारा गाड्या ओढण्याचा कार्यक्रम होईल. याप्रसंगी बारा गाड्या ओढण्याचे मानकरी नवनाथ एंडाईत व कारभारी घुले असतील. सायंकाळी सहा वाजता महाप्रसाद, रात्री नऊ ते पहाटेपर्यंत शिवमल्हार शिवाजीराव चव्हाण पाथर्डीकर यांचा जागरण गोंधळाचा कार्यक्रम, लंगर तोडण्याचा कार्यक्रम, उत्तरपूजा व आरती होऊन या सर्व कार्यक्रमांची सांगता होईल. या कार्यक्रमांस ग्रामस्थांनी उपस्थित राहावे, असे आवाहन श्री खंडेराव महाराज मंदिर यात्रा समितीच्या आयोजकांनी केले आहे.

### दिव्यांग विद्यार्थ्याचे विक्रमी यश

**नाशिक : प्रतिनिधी**

दिव्यांग विद्यार्थ्यांमध्ये विद्यार्थी अभिनव गांगुर्डे याने अपूर्व यश संपादन केले आहे. त्याने ऑपरेटिंग सिस्टिम (OS) आणि सिस्टिम प्रोग्रॅमिंग (SP) या विषयांमध्ये तब्बल ९० टक्के गुण मिळवत एक नवा शैक्षणिक रेकॉर्ड प्रस्थापित केला आहे. अभिनवच्या या उल्लेखनीय यशाबद्दल त्याचा सत्कार करण्यात आला. या गौरव समारंभप्रसंगी अभिनवचे आई-वडील व शिक्षक प्रा. सीए लोकेश पारख उपस्थित होते. शिक्षकांनी अभिनवच्या मेहनतीचे आणि चिकाटीचे कौतुक केले, तसेच इतर विद्यार्थ्यांसाठी तो प्रेरणादायी ठरेल, असा विश्वास व्यक्त केला.

# सिडको महाविद्यालयाचा विज्ञान विभागाचा निकाल ९९.७१ टक्के

**सिडको : विशेष प्रतिनिधी**



**उत्तमनगर सिडको येथील कर्मवीर शांतारामबापू कोंडाजी वावरे कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयाने बारावीच्या परीक्षेत घवघवीत यश मिळवत यशाची नवी शिखरे गाठली आहेत. विज्ञान विभागाचा निकाल ९९.७१ टक्के वाणिज्य विभागाचा ९६.६७ टक्के तर कला विभागाचा निकाल ९५ .७ टक्के लागला.**

या उल्लेखनीय यशाचे श्रेय महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सोपान कुशारे, उपप्राचार्य प्रा. सोमनाथ घुले, तसेच ज्युनिअर कॉलेजचे इंचार्ज प्रा. दीपक देवरे यांच्या योग्य मार्गदर्शनाला जाते. सर्व शाखांतील विद्यार्थ्यांचे आणि शिक्षकांचे अभिनंदन केले.

विज्ञान विभागात जयेश ईश्वर पाटील याने ८९ टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. अनुजा भानुदास निकम (८२.५०%) आणि वैशाली गणेश गांगुर्डे (८२.५०%) यांनी अनुक्रमे द्वितीय आणि तृतीय क्रमांक मिळवले.

कला शाखेत अर्पिता शेषराव सुलताने हिने ८७.३३ टक्के गुणांसह प्रथम क्रमांक मिळवला. श्रद्धा सोमनाथ निगळ (८२.१७) आणि श्वेता भीमा शेलार (७९.५०) या अनुक्रमे दुसऱ्या व तिसऱ्या क्रमांकावर राहिल्या.

वाणिज्य विभागात सिद्धी साहेबराव खैरनार हिने ९१ टक्के गुण मिळवत विभागात अव्वल स्थान पटकावले. निकिता आधार माळी (८८ टक्के) आणि भाग्यश्री जितुभाई जाधव (८७.५०टक्के) यांनी अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांक मिळवले.

या यशस्वी विद्यार्थ्यांचे महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष अण्णासाहेब पाटील, मविप्र समाजाचे संचालक अॅड. लक्ष्मण लांडगे, कार्यालयीन अधीक्षक दत्तात्रेय दुसाने, आबा थोरात, सोपान बिडगर आदींनी अभिनंदन केले.

## महात्मा फुले संस्थेतील विज्ञान शाखेचा १०० टक्के निकाल

**नाशिक : प्रतिनिधी**



द्वारका, पखाल रोडवरील महात्मा फुले समाज शिक्षण संस्था संचलित मातोश्री सावित्रीबाई फुले विद्यालय, गुरुवर्य मो.सों. शिंदे कॉमर्स व एन. एम. जाधव सायन्स जुनिअर कॉलेजचा विज्ञान शाखेचा निकाल १०० टक्के लागला.

प्रथमेश थोरवत ८०.८३ टक्के मिळवून प्रथम, हर्षद बागूल ७४.६७ टक्के मिळवून द्वितीय व आवेज शेख ७२ टक्के मिळवून तृतीय आला. तसेच कॉमर्स शाखेचा निकाल ९२.३१ टक्के लागला. गायत्री नजान ६७.३३ टक्के मिळवून प्रथम, जया राजभर ६७ टक्के मिळवून द्वितीय व गायत्री चव्हाण ६३.५० टक्के मिळवून तृतीय आली. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थाध्यक्ष भाऊराव बच्छाव, सरचिटणीस पुरुषोत्तम फुलसुंदर, कार्याध्यक्ष डी. डी. खैरनार, शिक्षणाधिकारी मधुकर बच्छाव, चिटणीस सुनिता खैरनार, खजिनदार बाळासाहेब पुंड, शालेय समितीचे अध्यक्ष माधव मोरे,शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष वसंत अहिरे, यांसह संचालक ,प्राचार्य गजानन घरटे, पर्यवेक्षक निवृत्ती कमोदकर, पर्यवेक्षिका रोहिणी गवळी, वरिष्ठ लिपिक कैलास गायकवाड, प्राध्यापक हर्षद गांगुर्डे, पुष्पा कटारे, ज्योती थेटे, विद्या गायधनी, रूपाली विसपुते, जयश्री सातपुते, मुकुंद अहिरे यांनी अभिनंदन केले.

# मेहनतीला मिळाले 'फळ'
## फळविक्रेत्याची मुलगी बारावीत कला शाखेत प्रथम

**सातपूर : प्रतिनिधी**



**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षेत जनता विद्यालय व ज्युनिअर कॉलेजची विद्यार्थिनी साक्षी बारोड ८२ टक्के गुण मिळवून कला शाखेत प्रथम येण्याचा मान मिळवला.**

इयत्ता पाचवीपासून ती जनता विद्यालय शिक्षण घेत असून तिची घरची परिस्थिती अत्यंत हलाखीची आहे. साक्षीचे वडील दारोदारी गाड्यावर फळविक्रीचे काम करतात. आई घर गृहिणी आहे. सातपूर येथील अशोक नगर भागात त्यांचे भाड्याचे घर असून, दोन बहिणी व एक भाऊ व आई-वडील असा परिवार आहे. मागच्या वर्षी देखील जनता विद्यालय ज्युनिअर कॉलेज येथे तिच्या मोठ्या बहिणीने वाणिज्य शाखेत ८१ टक्के मिळून प्रथम क्रमांक मिळवला होता.

साक्षीस गायनकला, मिमिक्री, वाचन स्पर्धा, निबंध स्पर्धा, वादविवाद स्पर्धा, मॅरेथॉन स्पर्धा अशा अनेक कलागुणांत तिला आवड असून तिने त्यात विशेष नैपुण्य मिळविले आहे.

शालेय जीवनापासून तिला अभ्यासाची गोडी असल्याने शिक्षकांचे तिला मार्गदर्शन मिळत होते. पुढे भावी काळात कला शाखेचा अभ्यास करून स्पर्धा परीक्षा देण्याचा तिचा मानस आहे. प्राचार्य प्रमोद कांगुणे यांनी तिला मार्गदर्शन व मदत केली. साक्षीला प्रा. राजोळे, प्रा. बाळासाहेब मोगल, प्रा. डॉ. संतोष वाघ, प्रा. अशोक जाधव, प्रा. हिरा खुटे, प्रा. देशमुख यांचे मार्गदर्शन लाभले.

## सावंत महाविद्यालयात जान्हवी कांबळे प्रथम

**नाशिक : प्रतिनिधी**



गोदावरी शिक्षण मंडळ संचालित जी.डी.सावंत कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालयाने बारावी निकालाची परंपरा कायम राखली.

विज्ञान शाखेचा निकाल १०० टक्के लागला. जान्हवी योगेश कांबळे हिने ७६.५० टक्के गुण मिळवत प्रथम, साक्षी योगेश त्रिभुवन हिने ७४.३३ टक्के गुण मिळवत द्वितीय, तर पायल रामहरी मुंगसे हिने ७३.१७ टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक पटकावला.

वाणिज्य शाखेचा निकाल ९७ टक्के लागला. भूमिका मदन . पाटील हिने ८० टक्के मिळवत प्रथम, दिया संजय चौधरी हिने ७९.१७ टक्के गुण मिळवत द्वितीय तसेच साक्षी शिवाजी पितळेवाड हिने ७७.५० टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक पटकावला. कला शाखेचा निकाल९७% लागला. वैष्णवी राजेंद्र धात्रक (७३.६७), हर्षदा अनिल खडसे (७०.००) श्रद्धा प्रदीप सोनार (६७.५०) यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांक पटकावला.

## निफाड महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे एचएससी परीक्षेत यश

**निफाड : विशेष प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र इ.१२ वी परीक्षेचा निकाल मंगळवार दि.५ मे रोजी ऑनलाइन जाहीर करण्यात आला. त्यात मविप्र समाज संस्थेच्या कर्मवीर गणपतदादा मोरे कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले.

विज्ञान शाखेचे १८८ पैकी १८८ विद्यार्थी उत्तीर्ण होऊन १००% निकाल लागला, वाणिज्य शाखेचे ९० पैकी ९० विद्यार्थी उत्तीर्ण होऊन १००% निकाल लागला तर कला शाखेचे १७७ पैकी १७१ विद्यार्थी उत्तीर्ण होऊन ९६.६१% निकाल लागला,

यात अनुक्रमे विज्ञान विभागात कापसे कृष्णा (८८.१७%), शिंदे प्रेरणा (८५.३३%), जाधव कावेरी (८४.३३%) वाणिज्य विभागात शेख जिशान (८७%), काहाने कल्याणी (८३.३३%), साळवे साक्षी (७८.५०%) कला विभागात गवळे शालिनी (८७.८३%), मौर्य प्रीया (८१%), सोनवणे रोहित (७५.३३%) हे विद्यार्थी प्रथम,द्वितीय व तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाले.

या यशाबद्दल मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुनील ढिकले, उपाध्यक्ष विश्वासराव मोरे, सभापती बाळासाहेब क्षीरसागर, उपसभापती देवराम मोगल, सरचिटणीस ड. नितीनजी ठाकरे, चिटणीस दिलीप दळवी, निफाड तालुका संचालक शिवाजी गडाख, महिला संचालक श्रीमती शोभाताई बोरस्ते, मविप्र शिक्षणाधिकारी प्रा डॉ. नितीन जाधव, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष डॉ. उत्तम डेरले, प्राचार्य डॉ. ज्ञानोबा ढगे, डॉ. प्रवीण ढेपले, प्रा. अभय वडघुले, प्रा. सुनील जाधव, प्रा. प्रकाश आहेर, प्रा. प्रवीण शेलार, प्रा. राजेंद्र जाधव, श्रीमती सविता कापसे, आदीसह सर्व शिक्षक - शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

## ग्रामोदयचे इयत्ता बारावीच्या परीक्षेत शत-प्रतिशत यश

**इंदिरानगर : वार्ताहर**



ग्रामोदय माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय नवीन नाशिक या विद्यालयाचा कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेचा निकाल शंभर टक्के लागला.

वाणिज्य विभागातून प्रथम खदिजा मतीन शेख (८३.८३) अहमद सब्रीन नासिर (८३.१७) आहिरे कनिष्का काशिनाथ (८२.१५) यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांक पटकावला. कला शाखेत संचिता जनार्दन खंडीझोड (८७.१७), दीक्षा बजरंग भोले (८४ ५०), वैष्णवी सुरेश कणसे (७९.८३), तर विज्ञान विभागात गार्गी जीवन जाधव (८२. ६७), प्राजक्ता अजय सोनवणे (८१.३३), युक्ती सुनील जगताप (८०.१७) यांनी प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांक पटकावला. सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे ग्रामोदय शिक्षण संस्थेचे अध्यक्ष योगेश हिरे, संस्थापक सरचिटणीस कृष्णराव नेरे, आमदार सीमाताई हिरे, कोषाध्यक्ष महेश रामराव हिरे, व्यवस्थापक प्रवीणकुमार कृष्णराव नेरे, प्राचार्य दीपक सखाराम व्याळीज, केंद्र संचालक जयवंत बागूल यांनी अभिनंदन केले.

## मेट इन्स्टिट्यूटच्या विद्यार्थ्यांचे राष्ट्रीय प्रकल्प स्पर्धेत यश

**नाशिक : प्रतिनिधी**

येथील मेट इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग, मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागातील विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय प्रकल्प स्पर्धेत विभागात प्रथम क्रमांक पटकावला.

व्ही. बी. कोलते कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, मलकापूर यांनी ही स्पर्धा आयोजित केली होती. अथर्व येवले, आर्यन आहेर, प्रणव कुटे, आदित्य कापसे या विद्यार्थ्यांनी डिझाइन अँड मॅन्युफॅक्चरिंग ऑफ टेस्ट रिग फॉर बस बार टेस्टिंग या विषयावर प्रकल्प सादर केला. तापमान वाढीमुळे बस बारचे होणारे प्रसरण या प्रकल्पामुळे मोजणे शक्य होणार आहे. त्यांना डॉ. शरद निरगुडे यांचे मार्गदर्शन लाभले. विभागप्रमुख डॉ. श्यामकुमार काळपांडे, प्राचार्य डॉ. व्ही. पी. वाणी यांनी त्यांचे अभिनंदन केले व शाश्वत विकासासाठी प्रकल्प बनवण्यावर संक्षिप्त मार्गदर्शन केले.



**राष्ट्रीय अभियांत्रिकी प्रकल्प स्पर्धेत प्रथम पारितोषिक विजेत्या विद्यार्थ्यांसोबत मार्गदर्शक डॉ. शरद निरगुडे, विभागप्रमुख डॉ. श्यामकुमार काळपांडे, आणि प्राचार्य डॉ. व्ही. पी. वाणी.**

# शिंदे महाविद्यालयात मुलींचीच बाजी



**शिंदे : प्रतिनिधी**

येथील श्री छत्रपती शिवाजी एज्युकेशन सोसायटीच्या श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज्युनिअर कॉलजचा उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षेत कला व वाणिज्य विभागाचा निकाल १०० टक्के लागला आहे.

कला शाखेत आर्या तानाजी भिसे ८४.१७ टक्के मिळवून प्रथम, वैष्णवी कैलास ढेरिंगे ८१.६७ टक्के द्वितीय, दीपाली श्रीकृष्ण ढाले ८०.५० टक्के तृतीय, गौरी त्रंबक भिसे ७९.१७ टक्के चतुर्थ व संध्या लक्ष्मण भोलनकर ७८.३३ टक्के पाचवी आली. वाणिज्य शाखेत आस्मा इक्बाल शेख ७३ टक्के मिळवून प्रथम, माहेश्वरी खंडु खंदारे ७१ टक्के द्वितीय, श्रुती मंगेश घनदाट ६७.३३ टक्के तृतीय, सुप्रिया श्रीकांत शेवरे ६६.५० चतुर्थ व सोनाली योगेश कानवडे ६४.३३ टक्के मिळवून पाचवी आली.

विद्यालयात कला व वाणिज्य दोन्ही शाखेत प्रथम पाचही क्रमांक मुलींनीच पटकावल्याने परीक्षेत पुन्हा मुलींचाच बोलबाला बघावयास मिळाला. यशस्वी विद्यार्थ्यांना वर्गशिक्षक विजय बडे, श्रीमती काळे, विषय शिक्षक प्रा. बाळासाहेब देसाई, माधुरी जाधव यांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थ्यांचे प्राचार्या एस.आर.वाळेकर, शिक्षक पालक संघाचे उपाध्यक्ष हरिष जाधव, सहसचिव गणेश जाधव, माता पालक संघाच्या रोहिणी तुंगार, आदींसह शिक्षक, पालकांनी अभिनंदन केले.

## एन अँड जे दिनानी कॉलेजचा निकाल शंभर टक्के

**नाशिक :** श्री पंचवटी एज्युकेशन सोसायटी संचलित एन. अँड जे. दिनानी सायन्स व कॉमर्स या दोन्ही विभागांनी बारावीच्या परीक्षेत घवघवीत यश संपादन केले. विज्ञान शाखेचा निकाल शंभर तर वाणिज्य शाखेचा निकाल ९९ टक्के लागला. विज्ञान शाखेमध्ये तनिष्क उमेश झारेकर या विद्यार्थ्यांने ८५.३३ टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पार्वती जेवराज मेरा हिने ८५% गुण मिळवून द्वितीय क्रमांक पटकावला. विराज हरीश वाघ या विद्यार्थ्याने ८०.३३ % गुण मिळवून तिसरा क्रमांक मिळविला. वाणिज्य शाखेत आश्लेषा अभय शिंदे या विद्यार्थिनीने ८५ टक्के गुण मिळवून प्रथम. निशा रमेशभाई पोकार या विद्यार्थिनीने ८४ % गुण मिळवून द्वितीय तर कुमार दीपेश देवासीस मुल्लो या विद्यार्थ्याने ८३.५० % गुण मिळवून तिसरा क्रमांक पटकावला. या सर्व विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे पंचवटी एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष नरेंद्रभाई ठक्कर,सेक्रेटरी देवेंद्रभाई पटेल, चेअरमन कानुभाई जोशी,सेक्रेटरी सचिनभाई शाह आणि संस्थेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी तसेच प्राचार्य गणेशकुमार पंडीधर यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.



**वासाळीजवळील मांडवकडा येथील शेतकरी रामकृष्ण कचरे यांना जीवनावश्यक वस्तू देताना राजू देवळेकर, काशीनाथ कोरडे, अनिकेत यादव आदी.**

## नुकसानग्रस्त शेतकरी कुटुंबाला मदतीचा हात

**वासाळी : वार्ताहर**

वासाळी (ता. इगतपुरी) येथील मांडवकडा येथे दोन दिवसांपूर्वी एका शेतकऱ्याच्या घराला आग लागून जीवनावश्यक वस्तूंचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते.

घरातील संसारोपयोगी वस्तू जळाल्याने हे कुटुंब हतबल झाले होते. याची माहिती प्रभुनयन फाउंडेशन, अंधेरीचे संस्थापक अध्यक्ष आनंद मवाणी, छत्रपती शिवाजी महाराज स्मारक राष्ट्रीय समिती नाशिक, साई सहाय्य समिती इगतपुरी यांना मिळताच एक हात मदतीचा या उपक्रमातून नुकसानग्रस्त शेतकरी कुटुंबाला जीवनावश्यक वस्तूंची मदत करण्यात आली.

> वासाळी येथील शेतकरी कुटुंबाला केलेल्या मदतीमुळे आत्मिक समाधान मिळाले. माझ्या सामाजिक कार्यात मदत करणाऱ्या सर्व सहकाऱ्यांचे आभार मानतो. त्यांच्या सहकार्यातून वंचित घटकांपर्यंत पोहोचता येते. यापुढेही अधिक घटकांना मदत करणार आहोत.
> **- आनंद मवाणी,**
> संस्थापक अध्यक्ष, प्रभुनयन फाउंडेशन, अंधेरी

याप्रसंगी श्री साई सहाय्य समितीचे राजूभाऊ देवळेकर यांनी स्वतः मांडवकडा येथे जाऊन नुकसानग्रस्त शेतकरी कुटुंबाची भेट घेऊन दिलासा दिला. लवकरात लवकर पंचनामा करून या कुटुंबाला भरपाई मिळावी, यासाठी शासन दरबारी पाठपुरावा करू, असे देवळेकर, अनिकेत यादव यांनी सांगितले. यावेळी सरपंच सुनीता कोरडे, शांताराम भांगे, लक्ष्मण कोरडे, बाळू कचरे, सीताराम आंबेकर, भोरू धोंगडे आदी उपस्थित होते.